विषय निबंध
सं. नं. ७८२.

# पद्य-मीमांसा

REFBK-0006259

लेखक :

वि. ज. सहस्त्रबुद्धे.

# पद्य-मीमांसा

लेखक:

वि. ज. सहस्रबुद्धे,

मिरज.

REFBK-0006259

प्रस्तावनाकार:

प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी,

नागपूर.

शके १८६३ | किंमत १। रु. | जून १९४१

प्रकाशक :

गोविंद वामन कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथ-भांडार,
कोल्हापूर.

पुनर्मुद्रणाचे वगैरे अधिकार लेखकाचे स्वाधीन.

मुद्रक :

बाळकृष्ण नारायण ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस,
कोल्हापूर.

# निवेदन

कविता करण्याचा नाद असल्यामुळे छंदःशास्त्राविषयी मला पहिल्यापासून आवड आहे. मराठी शाळेंत कै. गोडबोले यांचें वृत्तदर्पण शिकलों होतों. पुढें पद्यरचने ( मात्रा-वृत्ता ) संबंधी थोडी बहुत चर्चा प्रसंगोपात्त कै. कबाडेशास्त्री यांच्याबरोबर झालेली आठवते. त्यानंतर या विषयांत विशेष लक्ष जाण्याला कारण प्रा. माधवराव पटवर्धन यांचें छंदोरचना हें पुस्तकच होय. " छंदोरचनाकारास सूचना " या शीर्षकाखाली श्री. गोविंदराव खासगीवाले यांनी केसरीमध्ये ता. २।८।३२ रोजीं लेख प्रसिद्ध केला. त्यांतील कांही गोष्टीबद्दल मला शंका आल्यावरून त्या शंकासंबंधी एक लेख ता. ८।१२।३३ च्या ज्ञानप्रकाशांत मी लिहिला व अशा प्रकारें छंदःशास्त्राच्या शास्त्रीय विवेचनात मी गुंतलों व त्या विषयाचा माझा अभ्यास थोडाथोडा अधिक होत गेला. असा थोडक्यांत पूर्वेतिहास आहे.

या पुस्तकांतील सर्वच लेख पूर्वी निरनिराळ्या नियतकालिकांतून येऊन गेले आहेत. तेच एकत्र करून आता पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहेत. श्री. खासगीवाले यांच्या लेखासंबंधी ज्ञानप्रकाशमध्ये मी प्रसिद्ध केलेला लेख केवळ शंकास्वरूप असल्यामुळे यांत समाविष्ट केला नाहीं. तसेंच " अक्षरछंदाचें मात्रा-मापन " नांवचा लेख " सकाळ " पत्रामध्ये ता. १०।९।३५ च्या अंकांत आला आहे, तोहि यांत घेतला नाहीं. कारण, " अभंगाचा छंद कोणता ? " या लेखांत त्या लेखांतील महत्त्वाचा भाग आलेलाच आहे. पुस्तकाच्या परिशिष्टामध्ये दिलेला " भजनपद्धतींत सुधारणा " हा लेख प्रत्यक्षपणें छंदोविषयक नाहीं; तथापि पद्य आणि संगीत यांचा परस्परसंबंध असल्याने आणि विशेषतः अभंग—गायनाबद्दल त्यांत विवेचन केलें असल्यामुळे तो लेख आनुषंगिक म्हणून परिशिष्टांत अन्तर्भूत केला आहे. यांतील लेख प्रसंगानुरूप वेळो-

वेळीं लिहिलेले असून ते जसेच्या तसे पुनर्मुद्रित होत असल्याकार- णाने त्यामध्ये आता कांहीं ठिकाणीं द्विरुक्ति झाली असल्याप्रमाणे आढळून येणें संभवनीय आहे तथापि तेवढी ती द्विरुक्ति अपरिहार्यच मानावी लागेल.

छंदोरचना पुस्तक प्रा. माधवरावांच्या सारख्या व्यासंगी लेखकाने परिश्रमपूर्वक लिहिलेलें असलें तरी त्यायोगें मराठी छंदःशास्त्राची पूर्णता झाली आहे असें मुळीच म्हणवत नाहीं. विशेषतः जातीच्या ( मात्रावृत्तांच्या ) लक्षणाबद्दल पुष्कळच सुधारणा व्हावयास पाहिजेत. तसेंच तात्त्विक मतभेदाचे कित्येक मूलभूत प्रश्न आहेत त्यांची निर्णायक चर्चा होण्याची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टी विचारवन्त लोकांच्या नजरेपुढें पुनः प्रामुख्याने याव्यात हीच मुख्य अपेक्षा हें पुस्तक प्रसिद्ध करतांना मी धरलेली आहे.

छंदोरचनेंतील दिंडी, गीति, आरती वगैरे पद्याच्या लक्षणासंबंधी यांत जे लेख आहेत ते सर्व प्रा. माधवराव पटवर्धन हे दिवंगत होण्यापूर्वींच प्रसिद्ध झालेले आहेत. त्यापैकी फक्त दिंडीच्या लेखाबद्दलच त्यानी सविस्तर उत्तर दिलें आहे. व आरतीबद्दल आपलें मत अजून निश्चित झालें नाहीं असें त्यांनी आपल्या दिंडीवरील लेखाच्या उत्तरांत प्रांजलपणें म्हटलें आहे.

प्रा. माधवराव यांचा व माझा प्रत्यक्ष परिचय झाला होता व मिरजेंत द. म. साहित्य संमेलन भरल्यावेळीं दोन दिवस त्यांचा सहवास लाभल्याने पूर्व परिचयांत अधिकच भर पडलेली होती. माधवरावांचा स्वभाव उमदा व वृत्ति खेळाडू होती. त्यांची विद्वत्ता, विद्याव्यासंग व मराठी भाषेच्या उत्कर्षाबद्दल त्यांना वाटत असलेली तळमळ ही मला पूर्ण माहीत असून त्यांचेविषयी मला आदर वाटत होता व आहे. हें खरें असलें तरी शास्त्रीय विषयाच्या वादविवादाच्या वेळीं मतभेदासंबंधी आपली बाजू मांडतांना योग्य ती टीका करणें क्रमप्राप्तच होतें. माधवरावांच्या प्रमाणेच श्री. आ. रा. देशपांडे, श्री. वा. ना. देशपांडे, श्री. रा. म. आठवले

वगैरे इतर विद्वान् लेखकांच्या मताविरुद्ध मी लिहिलें असलें तरी त्या त्या लेखकांची विद्वत्ता व योग्यता मी जाणत आहे हें या प्रसंगीं सांगून ठेवणें उचितच ठरेल.

"सताल पद्यरचना" या विषयावर स्नेहसंवर्धक संघानें ता. १५।६।१९३६ रोजीं मिरज येथें चर्चा घडवून आणिली त्या प्रसंगीं प्रा० श्रीनिवास नारायण बनहट्टी हे अध्यक्ष होते. त्या चर्चेचा समारोप प्रो. बनहट्टी यांनी फारच सुंदर रीतीने केला. त्यांना छंदःशास्त्राची माहिती व गोडी असल्याचें त्यावेळीं दिसून आलें व पुढें अधिक परिचयाअन्तीं त्यांचा त्या बाबतींतील अधिकार माझ्या निदर्शनास आला. आणि त्यामुळे या पुस्तकाची योजना ठरवितांच प्रस्तावना लिहून घेण्यासाठी माझ्या मनामध्ये त्यांचेंच नांव प्रामुख्याने आलें. माझ्या विनंतीवरून त्यांनी वेळांत वेळ काढून या पुस्तकास महत्त्वाच्या मुद्याचा परामर्ष घेणारी विवेचक व विस्तृत प्रस्तावना लिहून देण्याचा आपलेपणा व्यक्त केला याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

माझ्या विचारसरणीला अनुकूल अशीं मतें ज्या अनेक विद्वान् गृहस्थांच्या लेखांतून आढळून आलीं त्यांतील अवश्य तेवढा भाग पादटीपांत ठिकठिकाणीं उद्धृत केला आहे व त्याबद्दल त्या सर्व लेखकांचा मी आभारी आहे. या पादटीपांचा वाचकांना त्या त्या ठिकाणचा विषय अधिक कळण्यास उपयोग होईल अशी मला उमेद आहे.

आचार्य काकासाहेब कालेलकर यांच्याशीं छंदोविषयाबद्दल माझा थोडासा पत्रव्यवहार झाला आहे. काकासाहेबांच्या आलेल्या पत्रांपैकी एक महत्त्वाचें व चर्चात्मक पत्र या पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्ट म्हणून जोडलें आहे. गुजरात–साहित्य–सेवकामधील काकासाहेबांचें स्थान उच्च आहे हें सर्वश्रुतच आहे. एवढ्याचसाठी नव्हे तर त्यांची छंदोविषयक आवड लक्षांत घेऊन मी हें पुस्तक त्यांनाच अर्पण करण्याचें ठरविलें व त्यांनीहि माझ्यावरील लोभा-

मुळे तसें करण्यास मला संमति दिली याबद्दल मी त्यांचे अन्तःकरणपूर्वक आभार मानतों.

श्री. गोविंदराव खासगीवाले हे माझे स्नेही आहेत. त्यांच्याकडे बसावयास गेले म्हणजे संगीत-विषयावर केव्हां केव्हां चर्चा पूर्वी होत असे. अलीकडे छंदोरचना प्रसिद्ध झाल्यावर तोच विषय चर्चेमध्ये अधिक व वारंवार येऊं लागला. त्यांच्याशीं झालेल्या विचारविनिमयाचा मला या कामीं बराच उपयोग झालेला आहे हें कृतज्ञतापूर्वक व साभार नमुद करणें हें माझें कर्तव्य आहे. श्री. खासगीवाले हे संगीतज्ञहि असल्यामुळे त्यांचा या विषयांत माझ्यापेक्षां जास्त अधिकार आहे.

लेखकाने पुस्तक लिहिलें तरी तें छापून निघून वाचकांच्या हातीं पडेपर्यंत अनेकांची अनेक प्रकारें मदत होणें आवश्यक असते; इतकेंच नव्हे तर त्या मदतीच्या अभावीं पुस्तक प्रकाशित होणें अशक्यच होऊन बसते म्हणून अशांच्या मदतीचा उल्लेख करणें आवश्यक आहे. श्री. भाऊराव आपटे व दे. भ. पुंडलीकजी कातगडे यांनीं मला या कामीं अशाच प्रकारची विशेष मदत केली असून त्यांचे आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतों.

कादंबरी लघुकथा या सारख्या पुस्तकांचा खप समाधानकारक नाहीं अशा स्थितींत शास्त्रीय विषयाचें पुस्तक प्रकाशित करण्याचें काम अंगावर घेणें धाडसाचेंच होय. परंतु तें धाडस करणारे प्रकाशक मला सुदैवानें लाभले आहेत म्हणून प्रकाशक श्रीयुत गोविंद वामन कुलकर्णी यांचा मी फार आभारी आहे.

शेवटीं, या चर्चात्मक पुस्तकाने मराठी छंदःशास्त्राच्या उन्नतीस अल्पस्वल्प हातभार लावण्याचा प्रयत्न केल्याचें श्रेय मिळालें तर अधिक आनंद होईल अशी आशा व्यक्त करून हें आत्मनिवेदन संपवितों.

शके १८६३ श्रीहनुमज्जयंती<br>स्नेहसंवर्धक संघ मिरज

वि. ज. सहस्रबुद्धे.

इति शम्

सन्माननीय आचार्य

## काकासाहेब कालेलकर

यांचे सेवेशीं

विनम्रभावपूर्वक

**सादर समर्पण**

तात्योबुवा

# अनुक्रमणिका :—


१ प्रस्तावना.

२ मुक्तछंदाचा वाद.

३ आरती हा अक्षरछंद कीं मात्रावृत्त

४ अभंगाचा छंद कोणता ?

५ प्रो. माधव ज्यूलियनांची दिंडी.

६ दिंडीच्या लक्षणाची आणखी चिकित्सा.

७ गीतीचें लक्षण.

८ साकीचें लक्षण.

९ शिथिल पद्यरचनेची इष्टानिष्टता.

१० मात्रा-गणविचार.

११ भूपती जातिलक्षण.

१२ छंदाचें स्थान स्वतंत्रच कां ?

१३ मुक्तछंद हें प्रगतीचें लक्षण काय ?


## परिशिष्टें


१४ परिशिष्ट १ लें व्याख्यांची तुलना केलेलें टिप्पण.

१५ ,, २ रें भजनपद्धतींत सुधारणा.

१६ ,, ३ रें काकासाहेब कालेलकर यांचा लेख.

# प्रस्तावना.

But it was soon evident that no such simple formula was possible, that metrists have assumed a degree of homogeneity which is not actually found, that there was more complexity than their generalisations would lead me to expect, that there is an underlying law, but something at once less rigid and more comprehensive than any they had yet stated.

—Egerton Smith.

( *Principles of English metre—Preface* )

श्री. वि. ज. उर्फ तात्याबुवा सहस्रबुद्धे यांच्या छंदोविषयक लेखांच्या संग्रहाला प्रस्तावना लिहिण्याला मी कांहीशा हौसेने, परंतु बऱ्याचशा संकोचाने तयार झालों. हौस वाटली ती एवढ्या-करितां, की या विषयावरील माझे विचार व्यक्त करण्याची आज-वर कधीच न मिळालेली संधि या निमित्ताने थोडी तरी मिळाली. परंतु हौसेपेक्षा संकोचाची भावना कांही काळ तरी बलवत्तर झाली, ती दोन कारणांस्तव. संकोचाचें एक कारण हें की ज्यांच्या कृती-संबंधी या प्रस्तावनेंत लिहिण्याचा प्रसंग येणार ते डॉ. माधवराव पट-वर्धन निधन पावलेले आहेत. ते आज जिवंत असते तर प्रस्तुत लेखकाला हे चार शब्द लिहितांना अतिशय आनंद वाटला असता. परंतु तसा योगायोग नव्हता, त्यास उपाय नाही. ते गेले असले, तरी त्यांचीं मतें, त्यांचें प्रतिपादन, त्यांचे ग्रंथ हे मागे आहेत. सत्यान्वेषणबुद्धीने त्यांचें परीक्षण झालेंच पाहिजे. ज्ञानाची प्रगति इच्छिणाऱ्याने आपणास जें सत्य व यथार्थ वाटतें तें पुढे मांडण्यास कचरतां कामा नये. व्यक्तीच्या शोचनीय मृत्यूमुळे वाटणारा संकोच बाजूस ठेवणें हेंच त्याचें अशा प्रसंगीं कर्तव्य होय.

संकोच वाटण्याचें दुसरें कारण, प्रस्तुत लेखकाचा असल्या

विषयावर लिहिण्याचा अधिकार काय असा प्रश्न वाचकांकडून उपस्थित केला जाईल, हें होय. ज्याने जन्मांत कवितेची एक ओळही लिहिलेली नाही, दुसऱ्यांनी लिहिलेल्या कवितेची एकही ओळ कधी कोणास म्हणून दाखविली नाही, अशा माणसाने छंदःशास्त्रीय विवेचनांत ढवळाढवळ करावी, हा अव्यापारेषु व्यापार होय, असें कोणासही वाटण्याचा संभव आहे. यावर प्रस्तुत लेखकाची कैफियत एवढीच की, त्याने छंदोरचना जरी केलेली नसली तरी छंदांचें आस्वादन पुरत्या छांदिष्टपणाने केलेलें आहे; तो काव्यगायक नसला तरी काव्यश्रावक खास आहे; त्याच्या कानाला सुरेल–बेसूर, सताल–बेताल यांचें ज्ञान होण्याइतपत विवेचक शक्ति ब्रह्मदेवाने दिली असण्याचा संभव आहे, असें वाचकांनी मानून चालण्यास हरकत दिसत नाही. आतापर्यंत मराठींत पद्यरचनेवर आणि छन्दांवर लिहिणारे सर्व लोक कविच होते व आहेत, यामुळें छंदःशास्त्र हें मुख्यतया कवींच्या उपयोगाचें शास्त्र नसून काव्यवाचकांच्या उपयोगाचें शास्त्र आहे, ही मूलभूत गोष्ट आपण विसरतों. सोनाराने कान टोचावे, त्याप्रमाणे एका इंग्रज लेखकाचा यासंबंधीचा उतारा दाखल केल्याशिवाय आमच्या महाराष्ट्रीय वाचकांना कदाचित् ही गोष्ट पटणारही नाही, यास्तव तो उतारा येथे देतों.

" It is clear then that the function of prosody is not to serve the poet. As a guide to composition it is unnecessary to him and usless to others...Most of us, however, approach poetry, not as makers, but as readers. And it is with the reader that the function of prosody lies, as an aid to criticism, and to the keener enjoyment of exact appreciation. "

—Enid Hamer ( The Metres of English Poetry—Preface. )

आता प्रस्तुत लेखकासारख्याने छंदोविषयक विचारांत मन घालणे

हा केवळ अव्यापारेषु व्यापार नसून ती योग्य अशीच गोष्ट आहे, हें वाचकांना खात्रीने पटेल !

प्रस्तुत पुस्तकांत संगृहीत करण्यांत आलेल्या लेखांपैकी बरेचसे लेख नियतकालिकांमधून प्रथम प्रसिद्ध झाले, त्याच वेळीं मी वाचले होते, व त्यांतील विचारसरणी मला पसंत होती. किंबहुना हे लेख लिहिले जात असतांना श्री. सहस्रबुद्धे व ज्यांचा या पुस्तकांतील लेखांत अनेकवार नामनिर्देश झाला आहे ते श्री. गोविंदराव खासगीवाले, यांच्याशीं प्रस्तुत लेखकाची अनेकवार चर्चाही झाली होती. 'छन्दोरचने'ची दुसरी आवृत्ति त्यावेळीं नुकतीच प्रसिद्ध झालेली होती; तिच्यांतील विषयावर आम्हां तिघांमध्ये विचारविनिमय होऊन असाही संकेत ठरला होता कीं 'छन्दोरचने' वर मी एक सविस्तर व मूलगामी परीक्षण लिहावें. परंतु कार्यव्यापृतत्वामुळें तो विचार कृतींत उतरणें लांबणीवर पडत गेलें. पुढे माधवरावही गेले, तेव्हा मनास खिन्नता येऊन त्याने हा विषय बाजूस सारून दिला. त्यालाही कांही काळ लोटल्यानंतर तात्याबुवांनी आपल्या लेखांचा संग्रह मुद्रित करण्याचा अत्यंत प्रशंसनीय संकल्प योजून त्यासाठी प्रस्तावनेची मागणी केली, तेव्हां पुनः या विषयांतील कुतूहल जागृत होऊन मी ती मागणी मान्य केली. त्या नंतरही मजकडून कित्येक महिने चालढकल झाली. परंतु तात्याबुवांची चिकाटी दांडगी; खेरीज माझी प्रस्तावना न मिळाल्यास पुस्तकाचें प्रकाशन होणें अशक्य होईल, असा पेचप्रसंगही त्यांनी मजसमोर उभा केला. इतक्यावर गोष्ट आली, तेव्हा पराणी टोचावी त्याप्रमाणे मनाची स्थिति होऊन तें कामास लागलें.

छंदःशास्त्रावर माधवराव पटवर्धनांचें एवढें लिखाण असतां व इतरही बरेच लोक अलीकडे त्यावर लिहूं लागले असतां, सहस्रबुद्धे यांच्या या लेखांचें विशेष महत्त्व तें काय ? ते एकत्र करून पुस्तकरूपाने प्रसिद्ध करणें ही त्यांच्या वैयक्तिक हौसेची गोष्ट होय, इतरांना त्याचें काय ? — असें कोणासही वाटण्याचा संभव आहे.

परंतु माधवराव पटवर्धनांचें छंदःशास्त्रावर एवढें थोरलें लिखाण आहे व इतर छन्दःशास्त्रावरील लेखक त्या लिखाणाच्या आधाराने चालतात, म्हणूनच सहस्रबुद्धे यांचे हे लेख प्रसिद्ध होणें इष्ट आहे, नव्हे अत्यंत जरुरीचें आहे, असें मी म्हणतों. दांडगे परिश्रम करून छन्दःशास्त्राचें नियमन करण्याचा मोठा प्रयत्न माधवराव पटवर्धन यांनी केला खरा; परंतु शास्त्रीय दृष्टि व आत्मचिकित्सेची वृत्ति यांची मिळावी तशी जोड त्यांच्या परिश्रमक्षमतेस न मिळाल्याकारणाने या क्षेत्रांत भ्रामक विचारांचा घोटाळा माजविण्यास त्यांचें लिखाण कारणीभूत झालें आहे असें म्हणणें भाग पडतें. माधवरावांचें अन्तःकरण कवीचें होतें. एखाद्या कल्पनेच्या आहारीं ते गेले की तिने ते भारल्यागत होत व चिकित्सावृत्ति त्यांच्या मनांत राहावी तितकी जागरूक राहत नसे. हा गुण काव्याला जितका उपकारक तितकाच शास्त्रीय विचारास अपकारक होय. परंतु आपल्या प्रकृतीनुसार मुसतें काव्य करूनच न थांबतां शास्त्रज्ञ, पंडित, स्वतंत्रविचारनिर्माता म्हणून आपण पुढे यावें अशी महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनांत प्रादुर्भूत झाली. त्या महत्त्वाकांक्षेचीं जीं फळें लोकांपुढे आलीं तीं दुर्दैवाने काव्याइतकीं आल्हाददायक ठरलीं नाहीत.

छन्दःशास्त्राच्या विचारांत माधवराव ज्या एका कल्पनेच्या आहारीं गेले आहेत, ती कल्पना त्यांनी ‘पद्य,’ ‘छन्द’ या शब्दांच्या ज्या व्याख्या दिल्या आहेत, त्यांवरून आपणांस प्रतीत होते. पिंगलाचार्यांसारख्या प्राचीन शास्त्रकारांनी केलेल्या घरसोडी (?)चें उद्घाटन करणाऱ्या माधवरावांनी या मूलभूत घटकांच्या व्याख्या देतांना कमालीची घरसोड करावी हें किती चमत्कारिक! ‘पद्य म्हणजे लयबद्ध अक्षररचना होय’ (पृ.२) असें माधवराव आपल्या ग्रंथाच्या प्रारंभीं म्हणतात. पुढें ‘छन्द म्हणजे अक्षरांची तालबद्ध जुळणी होय’ अशी व्याख्या देतात. (येथे छन्द हा शब्द त्यांनी पुढे केलेल्या संकुचित अर्थाने न वापरतां

पद्यरचनापद्धति या व्यापक अर्थानें वापरलेला दिसतो. ) त्यानंतर पृ. १६ वर ' पद्य म्हणजे लयबद्ध पद्यरचना ' असें माधवराव आणखी एकवार लक्षण देतात. या तिसऱ्या लक्षणांतून काय अर्थ निष्पन्न होतो हा मोठा प्रश्नच आहे! कदाचित् येथें ' पदरचना ' याऐवजी ' पद्यरचना ' असा शब्द मुद्रणदोषानें पडला असेल! तसें मानलें तरी घोटाळा नाहीसा होत नाहीच. पहिली व्याख्या धरून चालल्यास प्रत्येक तराण्याला किंवा ' लला ललाला, लला ललाला ' अशा अर्थशून्य परंतु ' लयबद्ध ' अक्षररचनेस पद्य म्हणण्याचा प्रसंग येतो! दुसऱ्या व्याख्येंत हा दोष आहेच; शिवाय ' लय ' या शब्दाच्या ऐवजी ' ताल ' हा शब्द वापरून एक निराळाच घोटाळा निर्माण केला आहे. ' लय ' म्हणजे काय व ' ताल ' म्हणजे काय ? दोन्ही शब्दांचा अर्थ एकच असेल तर भिन्न शब्द योजून शास्त्रीय विचारांत न खपणारें गौरव कां पतकरिलें ? अर्थ भिन्न असेल तर दोहोंपैकी कोणती तरी एक व्याख्या चुकीची ठरणार ! तिसऱ्या व्याख्येंत ' अक्षर ' या ऐवजी ' पद्य ' (पद?) हा शब्द घातलेला दिसतो. परंतु पद्य ( पद ? ) याचा अर्थ कोठेंच स्पष्ट केलेला नाही.

शास्त्रास मूलभूत अशा घटकांची ' छंदोरचनें ' तील लक्षणें पाहिलीं तर त्यांची ही दशा! मग एकंदर पुस्तकांतील विवेचनांत किती अशास्त्रीयता व तर्कदुष्टता भरलेली असेल याची कल्पनाच केलेली बरी! परंतु असें तपशीलवार निरीक्षण येथे करण्याचा हेतु नाही. ज्या एका कल्पनेच्या आहारीं गेल्यामुळे माधवरावांचें विवेचन मूलतःच अशास्त्रीय व अलक्ष्यवेधी झालें आहे, तिचा उल्लेख करून तिजमुळे झालेले अनिष्ट परिणाम वाचकांच्या निदर्शनास आणून दिल्यानें माझें काम भागणारें आहे. कारण त्या योगानेच सहस्रबुद्धे यांनी प्रस्तुत लेख लिहून जी कामगिरी बजावली आहे तिचें महत्त्व वाचकांच्या लक्षांत येईल.

माधवरावांच्या सर्व विवेचनास व्यापणारी, त्यांनी रचिलेल्या

सर्व सांगाड्यास प्राणभूत अशी कल्पना म्हणजे 'सर्व मराठी कविता लयबद्ध आहे' ही होय. हाच आपण शोधून काढलेला महान सिद्धान्त असें ते समजतात. हें तत्त्व पूर्वीच्या कोणत्याहि (एक अस्फुट अपवाद खेरीज करून) शास्त्रकारास सुचलें नसून तें मीच स्वतंत्रपणें शोधून काढलें असें बजावण्यास ते कमी करीत नाहीत.

ज्या आपल्या सिद्धान्ताचा एवढा बडेजाव त्यांनी केला आहे, त्यांतील मुद्याचा शब्द जो 'लय' त्याचा अर्थ ते काय करितात हें पाहूं गेलें असतां वाचकांच्या पदरीं निराशाच येते. कारण 'लय म्हणजे काय?' या मथळ्याखाली पृ. १६ ते २० पर्यंत जो मजकूर त्यांनी लिहिला आहे त्यांत 'लय' या शब्दाचें स्पष्ट व रेखीव असें लक्षण त्यांनी दिलेलें नाही. 'लय' म्हणजे 'चाल' नव्हे, तर लय म्हणजे टाळीच्या योगाने पद्यास येणारी विभागात्मकता, असा त्यांच्या एकंदर प्रतिपादनाचा आशय दिसतो. अर्थात् लय म्हणजे पद्यामधील समकालिक विभाग पुनः पुनः आवृत्त होण्याचा धर्म, किंवा थोडक्यांत म्हणावयाचें झाल्यास 'आवर्तनात्मकता' असें म्हटल्यास चालेल.

हा लयबद्धतेचा सिद्धान्त मला स्वतंत्रपणें सुचला, असें पटवर्धन सांगतात (पृ. ५६३). तथापि 'छन्दोरचने'ची इंग्रजी प्रस्तावना पाहिली व त्यांत वापरलेला 'Rhythm' हा शब्द पाहिला की या 'लय' शब्दाचें मूळ लक्षांत येतें. 'Rhythm' ज्या कल्पनेचा अभावितपणें माधवरावांच्या मनावर परिणाम होऊन अबोधपूर्व (unconscious) मानसिक प्रक्रियेने त्यांस 'लयी'ची कल्पना सुचली असावी.

इंग्रजी छन्दःशास्त्रांतील Rhythm ची कल्पना मुख्यत्वेंकरून आघाता (accent) वर आधारलेली आहे. 'साघात व निराघात किंवा लघु व गुरु अशा उच्चारविभागांची नियमित व सममात्रक आवृत्ति' अशा आशयाची Rhythm या शब्दाची

व्याख्या इंग्रजी भाषेच्या आक्सफोर्ड बृहत्कोशांत दिलेली आढळते. * ही व्याख्या अगदी सामान्य व व्यापक आहे. यापैकी 'साघात व निराघात विभागांची आवृत्ति' हा भाग इंग्रजी छंदांस लागू पडणारा आहे. मराठींत असे आघात नाहीत. गद्यांत आघात किंचित् भासमान होत असले तरी पद्यांत ते मुळींच दृग्गोचर होत नाहीत. तेव्हा मराठी छंदःशास्त्रांत Rhythm ची कल्पना आणावयाची म्हटल्यावर आघाताची बाजू सोडून देऊन लघुगुरु उच्चारांची समप्रमाण आवृत्ति एवढाच अर्थ घेणें भाग झालें. आणि हाच अर्थ 'लय' या शब्दावर लादून हें 'लया' चें तत्त्व मराठी छंदःशास्त्राच्या मानगुटीवर बसविण्यांत आलें.

अशा रीतीने इंग्रजींतील कांही विशिष्ट कल्पना आपल्या इकडील शास्त्रांत विशिष्ट अर्थाने योजिलेल्या शब्दांवर लादणें कितपत उचित होय, हा मोठा प्रश्न आहे. 'लय' व 'ताल' हे आपल्या संगीतशास्त्रांतील पारिभाषिक शब्द आहेत. पटवर्धन आपल्या छन्दोरचनेंत हे दोन्ही शब्द वापरतात आणि दोन्हीही जवळ जवळ एकाच अर्थी, म्हणजे Rhythm या अर्थी, वापरतात, असें दिसतें. यामुळे दुहेरी दोष उत्पन्न झाला आहे. दोन संज्ञा कांही कारण नसतांना एकाच अर्थी वापरणें व त्यांचें नीटसें स्पष्टीकरण न करणें हें मुळांत अशास्त्रीय होय. असला घोटाळा 'मुक्तछन्दा' चे प्रणेते श्री. आ. रा. देशपांडे यांनी केलेला नाही. ते ताल हा एकच शब्द वापरतात, आणि तो Rhythm या अर्थी वापरतात. परंतु विशिष्ट पारिभाषिक अर्थाने शास्त्रांत पूर्वीपासून रूढ असलेली संज्ञा निराळाच स्वकल्पित अर्थ दर्शविण्याकरितां

---

* ही व्याख्या मुळांत येणेंप्रमाणे आहे:—

The measured recurrence of arsis and thesis determined by vowel quantity or stress, or both combined.

वापरणें हें बरें नव्हे. 'लय' व 'ताल' या शब्दांना संगीत शास्त्रानुसार विशिष्ट ठरीव अर्थ आहेत व त्या अर्थांनी त्यांचा आज घटकेस सररास प्रयोगही होत असतो. तेव्हा हे शब्द निराळाच कांही इंग्रजींतून घेतलेला अर्थ व्यक्त करण्याकरितां वापरल्याने सर्व घोटाळा माजून एकाचें म्हणणें काय, हेंच दुसऱ्यास समजूं नये असा अनवस्था प्रसंग उत्पन्न होईल. सहस्रबुद्धे यांनी हा घोटाळा उघडकीस आणून तो न करण्याबद्दल जो इषारा दिला आहे तो अगदी प्रसंगोचित आहे.

असो! 'सर्व पद्य 'लय' बध्द असतें' हा जो पटवर्धनांचा आवडता सिद्धांत, त्याचा उगम वर दर्शविल्याप्रमाणे इंग्रजी छंदःशास्त्रामधील Rhythm च्या कल्पनेंत असलेला आपणांस आढळतो. कसेंहि असो, हा सिध्दांत गृहीत धरून तो मराठींतील सर्व वृत्त–जाति –छंदांस लावूं पाहण्याचा जबरदस्तीचा खटाटोप केल्याकारणाने पटवर्धनांचें विवेचन अथपासून इतिपर्यंत अशास्त्रीय पायावर उभारल्यासारखें झालें आहे. शास्त्र हें केव्हांही प्रत्यक्षानुगामी असलें पाहिजे. उदाहरणें अथवा घटना तपासून त्यांवरून सामान्य नियम काढणें (Inductive Method) ही शास्त्ररचनेची खरी पद्धत होय. पटवर्धनांनी याच्या उलट जी सिद्धान्तानुसारी किंवा आदर्शानुगामी (deductive) पद्धत, तिचा अवलंब केला आहे. विशिष्ट स्वरूपाचा 'लय' सिद्धान्त अगोदर गृहीत धरून तो सर्व वृत्त–जाति–छन्दांना लावून दाखविण्याच्या खटाटोपांत ते पडले आहेत. त्यामुळे पटवर्धनांचें एकंदर प्रतिपादन ज्या पिंगलाचे ते वाभाडे काढतात, त्याच्या मानाने अधिक अशास्त्रीय झालें आहे. पिंगलाने पटवर्धनांप्रमाणे स्वतंत्र सिद्धान्तांचे 'शोध' लावले नसतील; पण तो बिचारा प्रत्यक्षानुगामी पद्धतीचें तरी अवलंबन करितो. त्यामुळे त्याने जेवढें काम केलें तेवढें तरी भक्कम झालें आहे. याच्या उलट 'मूलभूत सिद्धान्ताचा स्वतंत्रपणें शोध लावणाऱ्या' पटवर्धनांनी दिलेल्या आर्या, दिण्डी, साकी, भूप-

तिवैभव यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या छंदांच्या व्याख्या, अल्पावधींतच चुकीच्या अथवा अपुऱ्या ठरल्या व आपणच एकवार केलेल्या व्याख्या, गुपचुपपणें कां होईना, बदलून पुनः पिंगलाची कास कित्येक ठिकाणीं धरण्याची त्यांना पाळी आली.

पटवर्धनांनी आपला 'लय' सिद्धांत प्रत्यक्षानुगामी पद्धतीवरूनच कशावरून बांधला नसावा, अशी शंका कोणी घेतल्यास त्याचें उत्तर अगदी सोपें आहे व तें त्यांच्या ग्रंथांतच आढळणारें आहे. 'पद्य म्हणजे लयबद्ध अक्षररचना' असें लक्षणच बांधून टाकल्यानंतर व लय म्हणजे आवर्तनात्मकता असें स्पष्टीकरण (पृ. १६–१८) केल्यानंतर प्रत्येक पद्यप्रकारांत आवर्तनात्मकतेचा धर्म असला पाहिजे, अशी कोणीही साहजिक अपेक्षा करील. परंतु पद्यप्रकारांपैकीं अत्यंत विस्तृत, लोकप्रिय व प्राचीन असा जो वृत्तविभाग त्याला आवर्तनात्मकतेचा धर्म लागू पडत नाही! खुद्द पटवर्धनांनाही ही गोष्ट, कचरत कां होईना, कबूल करणें भाग पडलें असून त्यांनी वृत्तांचा 'अनावर्तनी' असा निराळा विभाग केला आहे (पृ. ९५–९७)! त्यांच्याच मतें अनावर्तनी विभागांत पुढील वृत्तें येतातः—

इन्द्रवज्रा, उपेन्द्रवज्रा, इन्द्रवंशा, वंशस्थ, रुचिरा, प्रहर्षिणी, रथोद्धता, स्वागता, प्रमिताक्षरा, द्रुतविलम्बित, वसन्ततिलका, शालिनी, मालिनी, मन्दाक्रान्ता, स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित, हरिणी, शिखरिणी, सुवदना, पृथ्वी.

आणि आवर्तनी वृत्तांत कोणचीं अंतर्भूत होतात हें पहाः—

तोटक, विद्युन्माला, दोधक, जलोद्धतगति, जलधरमाला, मत्तमयूर, मदिरा, हंसगति, हेमकला, विबुधप्रिया, सुरनिम्नगा, प्रमाणिका, कलिन्दनन्दिनी, देवराज, भुजङ्गप्रयात, स्रग्विणी, मन्दारमाला, अमृतध्वनि.

मराठींतील अक्षरगणवृत्तांशीं ज्याचा परिचय आहे, अशा कोणीही वरीलपैकी अनावर्तनी वृत्तांचा प्रचार मराठींत जास्त

आहे की आवर्तनी वृत्तांचा जास्त आहे, हें सत्यास स्मरून सांगावें. अनावर्तनी वृत्तेंच इतकीं प्रचलित व लोकप्रिय आहेत की मराठींतील वृत्तात्मक रचनेपैकी कमींत कमी शेंकडा ९० इतकी रचना या वृत्तांत झालेली आढळेल. तात्पर्य, आवर्तनात्मकता हें पद्याचें लक्षण म्हणून माधवराव एकीकडे दाखल करितात, आणि पद्यांपैकी वृत्तांचा जो एक मोठा विभाग तो बहुतेक अनावर्तनी असल्याचें तेच दुसरीकडे कबूल करतात ! या तर्कदुष्टतेस काय म्हणावें !

बहुतेक सर्व महत्त्वाच्या अक्षरगणवृत्तांची आवर्तनात्मकता तर पटवर्धनांस सिद्ध करतां आलीच नाही. पद्याचा तिसरा प्रकार जो 'छंद' (लगत्वभेदातीत पद्यप्रकार) तोही लयबद्ध होण्याचें नाकारूं लागला. तेव्हा त्याला आवर्तनाच्या चौकटींत बसविण्यासाठी एका विलक्षण उपायाचा अवलंब त्यांनी केला आणि सर्व 'छन्दां' ना मारुन मुटकून 'लयबद्ध' अथवा 'आवर्तनी' बनविलें. त्यांनी असा दंडक घालून दिला की छन्दांतील प्रत्येक अक्षर गुरु म्हणजे द्विमात्रक मानावयाचें, मग तें मुळांत छन्दोनियमानुसार गुरु असो वा लघु असो (पृ. २०, २७, ५१२). छन्दाला मुळांत अक्षरसंख्येचें बंधन असतेंच. त्यावर छन्दांतील प्रत्येक अक्षर द्विमात्रक मानावयाचें असें आणखी बंधन घातलें की प्रत्येक चरणांतील मात्रांची संख्या नियमित झाली ! मग त्यास आवर्तनाच्या विटाळ्यांत बसविण्यास काय उशीर !

आपल्या लाडक्या आवर्तन सिद्धान्ताच्या चौकटींत सर्व पद्यप्रकार बसवितां यावे, यासाठी केवढा हा खटाटोप ! कोणत्याही अक्षरछन्दांत सारीं अक्षरें गुरुच उच्चारायचीं व समजायचीं असें माधवराव निक्षून सांगतात व हा छन्दाचा मूलभूत नियम आहे असें बजावतात (पृ. ५१२). कोठून व कसा काढला हा नियम ? हा नियम माझ्या स्वतःच्या कधीच अनुभवास आलेला नाही. तात्याबुवा सहस्रबुद्धे यांनी आपल्या अभंगावरील लेखांत यासंबंधाने सुंदर विवेचन केलें आहे, व हा नियम ज्यांना पटत नाही अशा इतर

लेखकांच्या लेखांतील उतारेही दिले आहेत. श्री. वा. ना. देशपांडे, आ. रा. देशपांडे हे पटवर्धनांप्रमाणेच छन्दांतील सर्व अक्षरें गुरु मानतात. ही कल्पना त्यांनी पटवर्धनांच्या प्रतिपादनावरून घेतली की त्यांचें हें मत स्वतंत्रपणें बनलें हें समजावयास मार्ग नाही. तथापि या बाबतींतील त्यांचे लेख पटवर्धनांच्या छंदोरचनेच्या प्रथमावृत्तीच्या नंतरचे असल्यामुळे वरीलपैकी पहिलाच तर्क खरा असावा, असें वाटतें. मी स्वतः 'भग्नमूर्ति' हें मुक्तछंदांतील काव्य त्याचे रचयिते आत्मारामपंत देशपांडे यांच्या तोंडून अनेकवार ऐकलें आहे. परंतु त्यांतील सर्व अक्षरें सारख्याच (द्विमात्रक) काळांत उच्चारलीं जातात असा मला कधीच भास झाला नाही. खरा प्रकार असा दिसतो, की पटवर्धनांच्या 'ताल' किंवा 'लय' सिद्धान्ताचा या देशपांडेद्वयाच्या मनावर मोठा पगडा बसला असल्यामुळे व त्या सिद्धान्ताच्या सिद्धीसाठी हा द्विमात्रकत्वाचा उपसिद्धांत मानणें जरूर असल्यामुळे, त्याच्या सत्यत्वाचा भास त्यांस होत असावा.

या बाबतींतल्या मतभेदाचें निराकरण एकाच उपायाने होऊं शकेल. मुखगत उच्चारांचें स्वरूप आपणास बरोबर रीतीने आकलन व्हावें यासाठीं Kymograph नांवाचें यंत्र भाषाशास्त्रज्ञांनी निर्माण केलें आहे. त्यांतून उच्चारांचे आलेख कागदावर आपणास मिळूं शकतात. अभंग, ओवी इत्यादि छंद भिन्न भिन्न व्यक्तींकडून त्या यंत्रासमोर म्हणवून त्यांचे आलेख घेतल्यास या द्विमात्रकत्वाच्या वादाचा निकाल लागेल. कारण ऱ्हस्व व दीर्घ स्वरांचे आलेख निराळे मिळतील.

एकीकडे छंदांना लगत्वभेदातीत पद्यप्रकार म्हणावयाचें व दुसरीकडे छंदांतील सर्व अक्षरें गुरु उच्चारावयाचीं असा नियम करावयाचा यांत एक प्रकारची विसंगति आहे. ती श्री. सहस्रबुद्धे यांनी व इतरांनी उघडकीस आणली आहेच. परंतु त्यापेक्षाही मूलगामी आक्षेप 'सह्याद्री' त लिहिणाऱ्या श्री. ना. ग. जोशी

यांनी आणिला आहे. छंदांतील अक्षरें नियत असतात व तुम्ही प्रत्येक अक्षरास गुरु ठरवून त्यांचा लगक्रमही एकप्रकारें निश्चित करतां; तेव्हां छंद हा अक्षरगणवृत्तांचाच एक प्रकार कां मानूं नये, त्यांचा स्वतंत्र प्रकार मानण्याचें कारण काय? असा सवाल श्री. जोशी करतात. जोशी हे पटवर्धनांचे मोठे चहाते असूनही त्यांच्या लक्षांत पटवर्धनांची या बाबतींतली तर्कदुष्टता आली ही गोष्ट अभिनंदनीय होय. श्री. सहस्रबुद्धे यांनी अर्थात् जोशांना उत्तर दिलें आहे व तें ‘ छंदांतील प्रत्येक अक्षर गुरु मानणें हें मुळांतच चूक आहे ’ या रास्त मतावर आधारलेलें असल्या- कारणानें योग्य दिशा दर्शविणारें झालें आहे.

स्वकपोलकल्पित आवर्तनसिद्धान्ताच्या आहारीं गेल्यामुळे पटवर्धनांनी पूर्वाचार्यांनी कल्पिलेले अक्षरगण व मात्रागण अव्हे- रिले आहेत. गणांसंबंधी समाधानकारक विवेचन त्यांनी कोठेच केलेलें नाही. आपल्या आवर्तनकल्पनेस अनुसरून तालाचें एक आवर्तन म्हणजेच एक गण अशी त्यांनी कल्पना केलेली दिसते व या कल्पनेनुसार अष्टमात्रक, सप्तमात्रक, षण्मात्रक व पंचमात्रक असे गण मानिलेले दिसतात. परंतु आवर्तनानुसार गण मानणें हें अत्यंत अशास्त्रीय आहे. मात्रावृत्तांमध्ये गण कोणते मानावेत या- संबंधी सहस्रबुद्धे यांनी जो लेख लिहिला आहे, त्यांत या मुद्याचें त्यांनी समर्पक विवेचन केलेलें असून पूर्वाचार्यांनी मानिलेल्या गणांसच आणखी पांच गणांची पुरवणी जोडून एकंदर दहा मात्रा- गण मानिल्याने सर्व काम कसें भागेल हें उत्कृष्ट रीतीने दर्शविलें आहे. आवर्तनानुसार गण मानण्याची पटवर्धनांची कल्पना अशास्त्रीय आहे, हें पटण्यास फार मोठ्या युक्तिवादाची जरूरी नाही. आवर्तनाचें तत्त्व अगोदर सर्व पद्यप्रकारांस लागू पडत नाही. बहुतेक सर्व प्रचलित अक्षरगणवृत्तें अनावर्तनी आहेत. कांहीं थोडी अक्षरगणवृत्तें व बरींचशीं मात्रावृत्तें आवर्तनी आहेत, असें जरी म्हणतां आलें, तरी आवर्तनाचें माप स्थिर नसतें. बरींच

आवर्तनी वृत्तें निरनिराळया चालींवर म्हणण्यांत येतात. चाल बदलली म्हणजे आवर्तनाच्या मात्रा बदलणें संभवनीय असतें. कवितेच्या शब्दरचनेनुसार तिच्या म्हणण्याच्या चालींतही क्वचित् फरक पडतो. व या फरकानुसार मधले यति, म्हणजे विश्रामाच्या जागाही बदलतात. दिंडी, साकी, चंद्रकान्त, उद्धव, अक्रूर, भूपतिवैभव इत्यादि जाति म्हणावयाच्या तर त्या संगीतशास्त्रोक्त तालावरच म्हटल्या पाहिजेत असा कायदा तर कोणी केलेला नाही व करणें रास्तही होणार नाही. राग व ताल लाऊन कोणत्याही जातीचें जें गायन करण्यांत येतें, त्याखेरीज गायकी चालीचें मुळीच ज्ञान नसणाऱ्या सामान्य लोकांकडून म्हटली जाणारी राग–ताल–निरपेक्ष अशी चाल त्या जातीला असतेच. असें नसेल तर जातिवृत्तांचा विचार म्हणजे संगीतांतील तालशास्त्राचीच एक शाखा होऊन बसेल. तात्पर्य काय, की छंदःशास्त्रामध्ये जातिवृत्ताची रचना अगर व्याख्या सांगतांना तालाचीं आवर्तनें सांगणें किंवा आवर्तनांस अनुसरणारा असा यतिविभाग व मात्राविस्तार सांगणें हें छंदःशास्त्राच्या दृष्टीने इष्ट होणार नाही. भाषेंतील प्रत्येक वृत्ताला राग–ताल–निरपेक्ष असा स्वाभाविक सुरेलपणा असतोच व तो सुरेलपणा लक्षांत घेऊन त्या वृत्ताचें लक्षण बांधलें पाहिजे. हा सुरेलपणा ज्याच्या योगाने साधेल असाच त्या वृत्ताचा लगक्रम व त्यांतील यति ठरविण्यांत यावे. याचा अर्थ असा नव्हे की तालाचा विचार सर्वथैव बाजूस सारण्यांत यावा. जातीचें लक्षण ठरवितांना तालाचा विचार अवश्य केला पाहिजेच. दिंडीचें लक्षण ठरवितांना तालज्ञानाची किती मदत झाली आहे, हें श्री. खासगीवाले व सहस्रबुद्धे यांच्या लेखांवरून स्पष्ट झालेंच आहे. जातींचे गण ठरवितांना तालाचीं आवर्तनें कशीं बसतात, ठेका कोठे येतो वगैरे पाहावें लागेलच. तात्पर्य, त्या त्या जातीची तालबद्ध गाण्याची पद्धत व सामान्य लोकांकडून ती जाति ज्या ज्या पद्धतींनी म्हणण्यांत येत असेल त्या सर्व पद्धति लक्षांत घेऊन त्यांना बाध येणार नाही अशा

रीतीने त्या जातीचे गण व यति ठरविण्यांत यावे. आवर्तनें म्हणजेच गण असें मानून आठ मात्रांचा, सात मात्रांचा, सहा मात्रांचा, पांच मात्रांचा असे गण कल्पिणें हें अशास्त्रीय होय. कारण या योगाने लगक्रमाचा मुळीच बोध होत नाही. गण हे वृत्तरचना (वृत्त हा शब्द येथे सामान्य अर्थाने योजला आहे) बिनचूक व रेखीव रीतीने व्यक्त करण्याचें साधन होय. तें वृत्तें मोजण्याचें एक माप आहे. मापाला जसा निश्चितपणा असणें अवश्य आहे, तसेंच गणाचेंही असलें पाहिजे. गणकल्पनेच्या बुडाशीं दुसरें कोणतेंच तार्किक तत्त्व नाही व असण्याची जरूरी नाही. असें कांही तरी तत्त्व गणकल्पनेच्या बुडाशीं आपण कल्पिलें नाही तर मग आपलें नावीन्य तें काय, असें डॉ. पटवर्धनांच्या मनाने घेतलें असावें. म्हणून आवर्तनें म्हणजे गण असें मानून त्या आधारावर छंदःशास्त्र रचण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे; परंतु यांत त्यांना यश आलें असें म्हणवत नाही. प्रत्येक अक्षरगणवृत्ताचें अथवा जातीचें लक्षण केवळ लघुगुरुक्रम लिहून दाखवून सांगणें आणि अशा रीतीने शेंकडो वृत्तांचा अनाकलनीय असा फाफट पसारा मांडून बसणें हें शास्त्र नव्हे. शास्त्र म्हणजे वर्गीकरण व वर्गीकरणोत्तर संकलन होय. वर्गीकरण करण्याला ठरीव प्रमाणाचें माप लागतें. भलत्याच कल्पनेच्या आहारीं गेल्याने पटवर्धनांना निश्चित व रेखीव माप निर्माण करतां आलें नाही व पूर्वाचार्यांनी निर्मिलेलें त्यांनी स्वीकारलें नाही.

ही विचारसरणी मान्य झाली म्हणजे गण कोणचे व कसे मानावेत हा प्रश्न सोडविण्याची योग्य दिशा श्री. खाजगीवाले व सहस्रबुद्धे यांनी दाखविलेली तीच होय, हें कोणासही सहज पटेल. मात्रागण कोणचे मानावेत याविषयी पायाशुद्ध विवेचन करून खाजगीवाले व सहस्रबुद्धे यांनी छंदःशास्त्राच्या विचारांत मोठी उपयुक्त भर घातली आहे, असें मला निभ्रांत वाटतें.

कोणत्याही पद्यप्रकाराची अक्षरसंख्या (असल्यास), लगक्रम

( असल्यास व असेल तेथें ) व यति ( असल्यास ) यांनी नियत अशी रचना निःसंदिग्ध स्वरूपांत सांगणें हेंच छन्दःशास्त्राचें कर्तव्य होय, त्यांतील आवर्तनें, ताल, ठोका इ० ठरवीत बसणें हें नव्हे. पटवर्धनांनी वृत्तरचना सांगण्यास सर्वथैव उपयुक्त असे पिंगलोक्त गण स्वीकारले नाहीत, आणि ज्या ताल ( लय ) सिद्धान्ताचा त्यांनी अंगीकार केला त्या सिद्धान्तानुसार संगीतांतील तालविचारही सबंध छन्दःशास्त्रांत आणणें त्यांना जमलें नाही ( तें जमणें शक्यच नव्हतें ); असा अर्धजरतीय न्याय स्वीकारल्यामुळे पटवर्धनांचें विवेचन पूर्णतया अशास्त्रीय झालें आहे. खरी घरसोड कोणी केली असेल तर ती पिंगलाने नव्हे पटवर्धनांनी!

आपल्या लाडक्या आवर्तनकल्पनेच्या आहारीं गेल्यामुळे पटवर्धनांनी गीति ( आर्या ) या वृत्ताचें लक्षण चुकीचें करून तें करितांना भ्रमोत्पादक विधानें केलीं आहेत. त्यांचा परामर्श सहस्रबुद्धे यांनी 'गीतीचें लक्षण' या लेखांत फार चांगल्या रीतीने घेतला आहे. दिंडी, साकी, भूपति इत्यादि जातिवृत्तांचें लक्षण करितांना त्यांच्या हातून झालेल्या चुकांवरून शास्त्रीय, रेखीव व बिनचूक व्याख्या करणें हें पटवर्धनांसारख्या कवीचें काम नव्हे, हेंच प्रत्ययास येतें. या अत्यंत महत्त्वाच्या जातिवृत्तांचीं लक्षणें बांधतांना पटवर्धनांच्या हातून कशी घरसोड झाली आहे, याचें उद्‌घाटन सहस्रबुद्धे यांनी चांगल्या रीतीने केलें आहे.

राहतां राहिला एकच विषय : मुक्तछंद. मुक्तछंदाचे एक उत्पादक श्री. आ. रा. देशपांडे यांनी याच छंदांत रचिलेल्या 'भग्नमूर्ति' या काव्याच्या पुस्तकाच्या अखेरीस एक लहानसा निबंध जोडून त्यांत मुक्तछन्दाची कैफियत थोडक्यांत, परंतु भारदस्तपणाने व समर्पक रीतीने मांडली आहे. प्रस्तुत लेखसंग्रहांत सहस्रबुद्धे यांचा जो लेख आहे त्यांत तिऱ्हाइताच्या दृष्टीने मुक्तछंदाच्या वादाचें अवलोकन तितक्याच भारदस्तपणाने व समंजसपणाने केलेलें वाचकांच्या नजरेस येईल. मुक्तछंदाच्या सतालत्वा-

विषयी सहस्रबुद्धे यांनी घेतलेल्या आक्षेपांत बरेंच तथ्य दिसतें. ' अक्षरछंदांत समाविष्ट होणारा मुक्तछंद खुशाल तयार करावा. परंतु तो तालबद्ध मात्र होऊं शकणार नाहीं ! ' हें त्यांचें म्हणणें विचारणीय आहे. देशपांडे यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येक अक्षराच्या दोन मात्रा जरी मानल्या ( असें मानणें विवाद्य आहेच ) तरी प्रत्येक चरणांतील व चरणकांतील मात्रासंख्या अनियमितच राहणार ! कारण चरणांत चरणक वाटेल तितके येऊं शकतील व चरणकांत मात्रा १० अगर १२ येऊं शकतील ! अर्थात् मुक्तछंदांतील चरण जसे लिहिले जातात तसे तालांत बसणें अशक्य आहे. आपल्या ताल या शद्वाचा अर्थ संगीतोपयोगी ताल हा नसून इंग्रजींतील rhythm शब्दाशीं तो समानार्थक मानावयाचा आहे, असें सांगून देशपांडे यांनी आपली या अड-चणींतून सुटका करून घेतली आहे. इंग्रजी कल्पनेच्या आधाराने आपली सुटका करून घेण्यापेक्षा ताल ( अथवा पटवर्धनप्रणीत ' लय ' ) हा शब्दच न वापरतां ' सुरेलपणा ' हा किंवा अशाच अर्थाचा शब्द छन्दाचें गद्याहून वैशिष्ट्य दाखविण्याकरितां योजावा असें मला वाटतें. म्हणजे बराचसा वाद मिटेल.

काव्याचें नवयुग सुरू होण्यास मुक्तछंदाचा स्वीकार होणें जरू-रीचें आहे; नवकाव्याचें वाहन होण्यास मुक्तछंदच योग्य आहे,— असें देशपांडे यांनी ठासून प्रतिपादन केलें आहे. या म्हणण्यावर पुष्कळांनी आक्षेप घेतले असून त्यावर वाद सुरूच आहे. यावर दोन्ही बाजूंनी लिहितां येण्याजोगें आहे, परंतु तसें करण्याचें स्थळ हें नव्हे. इतकें मात्र खरें की अगोदर कालवा खणून तयार करून नंतर त्याच्यांतून पाण्याचा पाट सोडतात, त्याप्रमाणे अगोदर मुक्तछंद तयार करून ठेवला की काव्याचें नवयुग त्यामागून धावत येईल, अशी कल्पना करणें अवास्तविक ठरेल. नवयुगप्रणेत्या कवीला आपल्या विचारांसाठी नवीन वाहन पाहिजेच असलें तर त्याचा तो नवा छंद निर्माण करील. आधी छंद व त्या मागून

काव्याचा नवयुगप्रणेता हा क्रम तितकासा युक्तिसिद्ध वाटत नाही.

कसेंही असो. पटवर्धनांनी मुक्तछंदाविषयी छंदोरचनेंत लिहितांना जी विरोधकाची भूमिका धारण केली आहे, ती तितकीशी योग्य नसून सहस्रबुद्धे यांनी दर्शविलेल्या तटस्थवृत्तींत थोडी सानुकूलतेची भर घातल्यास या प्रयत्नाविषयी तिऱ्हाईत रसिकानें कोणती वृत्ति ठेवावी, याचें बरोबर माप सापडेल असें मला वाटतें. मुक्तछन्दाच्या वादाला बाहेरच्यांकडून पोचणाऱ्या उपसर्गापेक्षा अंतःस्थ मतभेदामुळे उत्पन्न होणारी अनिश्चितताच अधिक बाधक होत आहे, असें वाटतें. तेव्हा मुक्तछंदवादी कवींनी आपली एक मुक्तछन्द परिषद भरवून आपापसांत पूर्ण एकोपा घडवून आणावा म्हणजे मुक्तछन्दाचा प्रसार द्रुतगतीने होईल !

मुक्तछंदाच्या वादाचा निरोप घेऊन पुन्हा मुख्य विषयाकडे वळावयाचें म्हटल्यास अखेर इतकेंच सांगणें उरतें की सहस्रबुद्धे यांचे या संग्रहांतील लेख पटवर्धनांच्या एकांगी व सदोष प्रतिपादनावर उतारा म्हणून निःसंशय उपयुक्त ठरतील. हे लेख पटवर्धन हयात असतांनाच लिहिले होते. त्यांचा कांहीसा परिणामही झाला असावा, असें पटवर्धनांनी अगदी अखेरीस लिहिलेल्या पद्यप्रकाश नांवाच्या पुस्तकांत आर्या, दिण्डी या छन्दांच्या व्याख्या सहस्रबुद्धे यांच्या आशयास अनुकूल अशा रीतीने बदलल्या आहेत, यावरून वाटतें. तथापि हें सर्व गुपचूप, सहस्रबुद्धे अगर खाजगीवाले यांच्या नांवाचा कोठेंही उल्लेख न करितां, त्यांनी केलें आहे. इंग्रजी rhythm चाच तोंडवळा असलेला 'लय' सिद्धान्त मराठींत आणण्यांत आला, तथापि सबंध ६०० पानांच्या ग्रंथांत (केवळ इंग्रजी वाचकांकरितां लिहिलेल्या Introduction खेरीज) rhythm चा उल्लेख नाही ! मग सहस्रबुद्धे यांच्यासारख्या गरीब, कोपऱ्यांतल्या, पदवीहीन लेखकाचा उल्लेख कसा होईल बरें !

हरकत नाही, पटवर्धनांकडून उल्लेख झाला नसला, तरी जनता

सहस्रबुद्धे यांच्या प्रयत्नाचें खचित स्वागत करील. पटवर्धनांच्या जाड्या पांडित्याची छाप ज्यांच्या मनावर पडलेली आहे अशा विद्वानांनी, कवींनी अगर रसिकांनी हे लेख पूर्वग्रहाने मन कलुषित न होऊं देतां वाचले तर त्यांना त्यांत ग्राह्यांश खास दिसून येईल. सहस्रबुद्धे यांची विचारसरणी शास्त्रशुद्ध, सावधगिरीची व प्रत्यक्षानुगामी आहे, असा प्रत्यय वाचकांस आल्याखेरीज राहणार नाही. अशाच रीतीने व्यासंग वाढवून मराठींतील पद्य नि पद्य तपासून पाहून ' मराठीचें छन्दःशास्त्र ' रचण्याचा त्यांनी खासगीवाले यांच्यासारख्या संगीतज्ञांच्या साहाय्याने प्रयत्न केल्यास तें नमुनेदार आणि अभ्यासू रसिकांस मार्गदर्शक होईल, अशी दृढ आशा वाटते. पटवर्धनांनी आपल्या ग्रंथांतून मांडलेल्या सामग्रीचा व विचारांचा त्यांस अमूप उपयोग होईल, यांत शंकाच नाही. आणि पटवर्धनांकडून प्राप्त झालेल्या ऋणाचा ते अत्यंत कृतज्ञ मनाने आदरपूर्वक उल्लेख ठायीं ठायीं करतील, याविषयी तर माझ्या मनांत तिळमात्र संदेह नाही.

नागपूर<br>
चैत्र शु॥ १ शके १८६३ — श्री. ना. बनहट्टी

# पद्य-मीमांसा

## मुक्तछंदाचा वाद

हिंदुस्थान देश परतंत्र असल्यामुळें त्यास स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न कॉंग्रेसच्या जन्मापासून चालू आहे. समाजसुधारणा व्हावी यासाठीं सामाजिक बाबतींत 'बंधनाच्या पलीकडे' जाण्याचे विचार घोळूं लागले आहेत, व त्या विचारांची मजल विवाहसंस्था नष्ट झाल्यास कांहीं हरकत नाहीं, असें प्रतिपादन करण्यापर्यंत आली आहे. बंधमुक्ततेची आकांक्षा आतां काव्यप्रान्तांतहि उत्पन्न झाली आहे, तिचें उदाहरण म्हणजे मुक्तछंदाविषयीं प्रचलित असलेला वाद होय. कांहीं वर्षांपूर्वी यमक नियमक कवितेबद्दल जोराची चर्चा होऊन गेली. त्याच नमुन्यानें हाहि वाद रंगणार आहे असें दिसतें. या वादानें नागपूरपासून रत्नागिरीपर्यंतचा भाग आक्रमिला आहे. हा वाद मुख्यतः सन १९३१ पासून सुरू झाला असून याविषयीं आतांपर्यंत निरनिराळ्या विद्वान लेखकांचे अनेक लेख आले आहेत.

ज्यांना हा मुक्तछंदाचा वाद अजून माहीतच नाहीं त्यांस मुक्तछंदाची आवश्यकता कां उत्पन्न झाली, हें अगोदर कळावयास पाहिजे. या बाबतींत श्रीयुत आत्माराम रावजी देशपांडे यांनीं जो खुलासा केला आहे तो आरंभीं येथें देऊं:—

" आधुनिक काव्ययुगाला नवीन छंदाची जरूरी काय म्हणून आहे असा जर कोणी प्रश्न केला तर त्याला थोडक्यांत उत्तर एवढेंच आहे कीं, आधुनिक काव्यध्येय, काव्यहेतु व काव्यविषय यांना

जुने छंद जुळतच नाहींत. समजा, श्रीयुत माधवराव पटवर्धन यांनीं आपलें ' सुधारक ' काव्य अनुष्टुप, ओवी, आर्या अगर इतर एखाद्या जुन्या छंदांत लिहिलें असतें तर त्या छंदामध्यें त्या काव्य-विषयाचा परिपोष झाला असता काय ? नव्या पद्धतीची कविता लिहिणाऱ्या आधुनिक कवींना नव्या छंदाची जरुरी आहे हें सहज पटण्यासारखें आहे. "

मुक्तछंदाच्या आवश्यकतेचे दुसरे पुरस्कर्ते रा. भ. श्री. पंडित यांचें म्हणणें असें आहे कीं,

" प्रचलित छंद हे ज्याप्रमाणें असंख्य आहेत, त्याप्रमाणेंच ज्या नियमांच्या पायावर त्यांची उभारणी झाली आहे ते नियमहि असंख्य आहेत. त्यांच्या जाचक बंधनांत खंडकाव्याची निर्मिति होणें अशक्य झालें आहे.* नियमांच्या या मर्यादित क्षेत्रांत रचनाकाराच्या स्वच्छंद प्रतिभेस मनःपूत संचार करतां येत नाहीं. तेव्हां या बाब-तींत त्याला कांहीं विशेष सवलती मिळाल्यास त्याच्या हातून उत्कृष्ट कृति निर्माण होण्याचा बराच संभव आहे. "

मुक्तछंद कसा असावा, हा यापुढील प्रश्न आहे. त्या बाबतींत सदर रा. भ. श्री. पंडित म्हणतात कीं, " मुक्तछंद तालबद्ध हवा. कारण तालाशिवाय छंद संभवत नाहीं. ताल व रचना यांच्या दृष्टीनें त्याचा अंतर्भाव ' जातींत ' ( मात्रावृत्तांत ) व्हावा. ताल म्हणजे कालमापनक्रिया. तालाचे प्रकार अनेक आहेत. प्रत्येक तालांत काल व ठोके असतात. त्यामुळें मात्रागण बनतात. "

---

* इंग्रजींतील मुक्तछंदाचें स्वरूप मराठींतील प्रयोगावस्थेंतील कोणत्याहि मुक्तछंदाच्या स्वरूपाहून मूलतः भिन्न आहे. इंग्रजींतील मुक्तछंदाची प्रथा जुनी आहे व ती छंदबद्ध काव्य लिहिणें कठीण झालें म्हणून कवींनीं स्वतःच्या सोयीसाठीं पाडून घातलेली नाहीं. त्याच्या उलट आपल्याकडे माचवे देश-पांडे वगैरे साऱ्यांचीच भूमिका अशी आहे कीं, बद्धछंदात भावनापूर्ण काव्य लिहितां लिहितां तारांबळ होते. **विश्वनाथ रा. डोंगरे**

ज्योत्स्ना मासिक व. ५ अं. ९

मुक्तछंदाच्या लक्षणाविषयीं रा. वामन नारायण देशपांडे यांचें मत कांहीं निराळेंच आहे. त्यांचें म्हणणें असें आहे:—

" मुक्तछंदाच्या छंदःशास्त्रीय बंधनाविषयीं बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, अक्षरसंख्या हें जें छंदाचें प्रमुख बंधन, तेंच या मुक्तछंदालाहि लागूं होईल. हा छंद यमकाच्या जंजाळांतून सुटलेला असेल, हें मुद्दाम सांगितलेंच पाहिजे असें नाहीं."

मुक्तछंदाची कल्पना इंग्रजी छंदावरून सुचलेली आहे. इंग्रजींत ज्याला 'फ्री व्हर्स' म्हणतात, तशा तऱ्हेचा छंद आधुनिक मराठी काव्य लिहिण्यासाठीं प्रचलित करण्यांत यावा, असें रा. आ. रा. देशपांडे यांचें मत आहे. म्हणजे इंग्रजींतील फ्री व्हर्सला अनुलक्षून मुक्तछंद हा शब्द ते वापरतात. याच्या उलट इंग्रजींतील 'ब्लँकव्हर्स'ला अनुलक्षून मुक्तछंद हा शब्द रा. वामन नारायण देशपांडे योजीत आहेत, असें वाटतें.

मुक्तछंद निर्मितीचा प्रथम प्रयत्न करणारे या नात्यानें बॅ. सावरकर यांचा गौरव करण्यांत येतो. तेव्हां स्वतः सावरकरच "वैनायक वृत्ताचा विशेष" या आपल्या निबंधांत काय म्हणतात तें पाहूं.

वैनायक वृत्ताच्या उत्पत्तीचा इतिहास म्हणून जो त्यांनीं दिला आहे त्यावरून इंग्रजींतील ब्लँकव्हर्स या वृत्तासारखें विशेष अनुकूल असलेलें एखादें मराठी वृत्त शोधून काढावें असें बॅ. सावरकर यांना वाटलें व त्या दृष्टीनें त्यांनीं वैनायक वृत्त तयार करण्याचा प्रयत्न केला, हें उघड दिसतें. वैनायक वृत्त हें मात्रावृत्त आहे. त्यांतील प्रत्येक चरण वीस मात्रांचा असतो.

" काव्याचा आत्मा जसा रस, तसा पद्याचा आत्मा ताल. ज्या पद्याचा ताल सुटला, त्याचा ताळच सुटला," हें बॅ. सावरकर यांचे मत विचारांत घेतल्यास ताल संभाळून नवीन वृत्तप्रकार तयार करावा म्हणजे नवीन मात्रावृत्त बनवावें या रा. पंडित यांच्या विधानास बॅ. सावरकर यांची अनुकूलताच आहे असें ठरतें.

आधुनिक काव्यरचनेस जुने छंद जुळतच नाहींत, असा आक्षेप रा. आ. रा. देशपांडे घेतात. परंतु बॅ. सावरकर यांचा जुन्या छंदावर इतका राग मुळींच नाहीं. ते स्पष्ट सांगतात कीं, "हें वृत्त ( वैनायक वृत्त ) सुदीर्घ काव्य-रचनेस कांहीं प्रमाणांत अधिक सोयीचें होतें असें आम्हास जरी वाटत असलें तरी त्यावरून जुनीं वृत्तें मुळीं रसानुकूल नाहींतच किंवा त्यांत दीर्घ काव्यें मुळींच खुलून दिसत नाहींत किंवा हें नवीन वृत्त त्या वृत्तांहून सर्व प्रकरणीं वा सर्वतोपरी अधिक सरस आहेच आहे, असें कांहीं तरी आम्ही समजत आहों असें कोणी समजूं नये."

या एकंदर विचारावरून पाहतां मुक्तछंदाच्या आवश्यकतेविषयीं, त्याच्या लक्षणाविषयीं व इंग्रजींतील मूळ छंदाविषयीं सर्वांची एकवाक्यता असल्याचें दिसून येत नाहीं. मुक्तछंदास कोणाच्या मतें मात्रांचें अथवा कोणाच्या मतें अक्षरसंख्येचें बंधन पाळावयाचें असेल तर मुक्तछंद यांतील 'मुक्त' या शब्दास महत्त्व काय राहिलें ? गणांचें, मात्रांचें वा अक्षरसंख्येचें कशाचेंच बंधन न ठेवतां कोणी पद्यरचना करील तर तो मात्र सर्वतंत्र स्वतंत्र असा मुक्तछंद यथार्थ ठरणार आहे ! मराठींत मात्रावृत्तें, अक्षरसंख्याक वृत्तें अनेक आहेत. त्यांत जर नवीन वृत्तांची भर पडली तर कांहीं बिघडणार नाहीं. परंतु या नवीन वृत्त-प्रकारांस असें काय मुक्तछंदत्व लाभणार आहे कोण जाणे !

मुक्तछंदाच्या अभावीं मराठी प्रदीर्घ काव्यरचनेला यावा तसा बहर येत नाहीं असें मत प्रतिपादणें हेंहि धाडसाचेंच आहे. नवीन वृत्त बनवून त्यांत कोणी काव्यरचना करूं नये असा दंडक कोणी घातला आहे ? मराठींत प्रदीर्घ काव्यरचना होत नसेल तर त्याचें प्रधान कारण मुक्तछंदाचा अभाव हें सयुक्तिक वाटणारें नाहीं. "कित्येक जुन्या मताचे टीकाकार असें म्हणतात कीं, ज्यांना छंदोबद्ध रचना साधत नाहीं ते या नवीन खटाटोपाच्या मागें लागलेले आहेत. त्यांच्या आरोपांत अगदींच तथ्य नाहीं असें नाहीं,"

असें आपलें मत रा. पंडित यांनीं दिलें आहे. त्या मतांत थोडी सुधारणा करून आम्ही असें म्हणतो कीं, सदर आरोपांत पुष्कळच तथ्य आहे. मुक्तछंदप्रवर्तकांना ज्या प्रकारच्या सोयी पाहिजेत त्या सोयी त्यांना जुन्या मात्रावृत्तांतून काव्यरचना केल्यास मिळूं शकतील. तथापि ही गोष्ट वादाची म्हणून सोडून दिली तरी इतकें खास म्हणतां येईल कीं, केवळ मुक्तछंदाच्या अभावीं प्रदीर्घ काव्यरचना मुळींच अडलेली नाहीं.

या छंदाच्या वादांत जीं कांहीं विधानें करण्यांत येत आहेत त्यांतील कित्येक चमत्कारिक व घोटाळ्याचीं दिसतात.

प्रथमतः बॅ. सावरकर यांच्या वैनायक वृत्ताविषयीं बोलावयाचें झाल्यास वैनायकवृत्त नवीन नाहीं असें म्हणतां येईल. वीस मात्रांचे चरण असलेलीं मात्रावृत्तें यापूर्वीं मराठींत आहेत. श्री. माधवराव पटवर्धन यांनीं 'जलधारा' या जातींचें उदाहरण छंदोरचना पुस्तकांत दिलेलें असल्यानें अधिक त्याबद्दल खुलासा करावयास नको.

अक्षरछंद लगत्वभेदातीत असल्यानें त्यांना मात्रानिर्बंध नसतो व तालाच्या तर मात्रा असतात. तेव्हां अक्षरछंद तालरहित आहेत असें म्हणणें रा. वामन नारायण देशपांडे यांस पसंत नाहीं. तसेंच मत रा. आ. रा. देशपांडे यांचेंहि आहे. कारण, अक्षरछंद तालरहित आहेत असा आरोप करणें फोल आहे असें ते बजावून सांगतात. अक्षरछंदाच्या तालबद्धतेचें समर्थन रा. वामन नारायण देशपांडे हे कसें करतात पहा:—ते म्हणतात कीं, "अक्षरछंदांना लगत्वभेदातीत मानण्यांत येत असलें तरी त्यांतील प्रत्येक अक्षराच्या–मग ते लघु असो कीं गुरु असो–दोन मात्रा धरावयाच्या असतात. म्हणजे शैथिल्यानें कां होईना अक्षरछंदांना मात्रांचें बंधन लागलेंच. अभंगादि अक्षरछंदांत लघु अक्षराच्या दोन मात्रा धरावयाच्या असल्यामुळें ते छंद प्रचलित ठक्यांत अगदींच बसत नाहींत असें जें ध्वनित करण्यांत येतें तें अतिशयोक्त आहे." या प्रतिपादनांतील 'प्रत्येक अक्ष-

राच्या दोन मात्रा धरावयाच्या ’ हा आधारच मुळीं छंदःशास्त्रास मान्य होण्यासारखा नाहीं. खरोखर तसा आधार असल्यास कोणत्या पुस्तकांत आहे, तें दाखविणें जरूर आहे. कै. गोडबोले यांच्या वृत्तदर्पणांत ‘लघूची तों एक मात्रा गुरूच्या दोन मानिती’ हा नियम असल्याचें सर्वश्रुत आहे. ऱ्हस्व-दीर्घांचा उच्चार शैथिल्यानें करून अक्षरछंदच काय, गद्यसुद्धां कसें तरी तालांत म्हणून दाखवितां येईल. अभंगादि अक्षरछंद तालांत म्हणतांना ऱ्हस्व दीर्घांची कशी ओढाताण करावी लागते याचें उदाहरण देऊन वृत्तमात्रा व तालमात्रा यांचा परस्परसंबंध बॅ. सावरकर यांनीं दाखविला आहे, तो योग्यच वाटतो.* ऱ्हस्वदीर्घांचे उच्चार अशुद्धपणेंच करावयाचे म्हटल्यास प्रश्नच मिटला ! वृत्तमात्रा व तालमात्रा या एकच होत, ही कल्पना बरोबर नसावी असा जो संशय रा. वामन नारायण देशपांडे यांनीं प्रगट केला आहे तो चूक आहे. आमचें म्हणणें, नवीन अक्षरछंदांत काव्यरचना करूं नये, असें नाहीं. अक्षरछंदांत समाविष्ट होणारा मुक्तछंद खुशाल तयार करावा. परंतु तो तालबद्ध मात्र होऊं शकणार नाहीं; इतकाच आमच्या प्रतिपादनांतील भावार्थ होय ! ‘बॅ. सावरकर व मुक्तछंद’ या शीर्षकाखालीं रा. वामन नारायण देशपांडे यांनीं प्रतिभेंत जो लेख लिहिला आहे त्यांत त्यांनीं बॅ. सावरकर यांच्या तालासंबंधीच्या मतावर घेतलेला आक्षेप योग्य नाहीं हें वरील विवेचनावरून दिसून येईल.

---

* **टीपः**—तालाच्या मात्रा ठराविक पडल्या तरच तो चांगला साधतो. पण ऱ्हस्वदीर्घांचा भेद न करितां त्या तालांत नुसती संख्या मोजून अक्षरें भरलीं तर त्यांचा उच्चार अशुद्धपणें केल्यावाचून त्या तालाच्या ठराविक मात्रांत ती सामावता येत नाहींत. अभंगादि अक्षरवृत्तांत या अडचणीमुळेंच पांडुरंग शब्द अनेक वेळां “पांडूऽऽरंग” असा लांबवावा लागतो किंवा ‘बेलाचें फूल माझ्या महादेवाला’ यासारख्या ठिकाणीं दीर्घ अक्षरें झपकन उच्चारून आगगाडीचे डब्यांत दडपून प्रवासी कोंबावे तशी त्या तालांत तीं कोंबावीं लागतात. **—बॅ. सावरकर—**रानफुलें पान १६७

सदर लेखांत रा. वा. ना. देशपांडे यांनीं दुसरें एक चूक विधान केलें आहे कीं, " चिजेमध्यें समेच्या ठिकाणीं सदैव गुरु अक्षरच योजावयाचें असतें. तेथें लघु अक्षर घालून भागत नाहीं." परंतु समेच्या ठिकाणीं लघु अक्षरें असलेलीं पदें सांपडूं शकतील. उदाहरणार्थ--' परम सुवासिक ' ( सौभद्र ) ' परमगहन ईश काम ' ( एकच प्याला ) ' नयनें लाजवीत ' ( मानापमान ) या पदांत समेच्या ठिकाणीं लघुच अक्षरें आहेत.

प्रतिभेच्या ता. २३।११।३४ इ. च्या अंकांत रा. रा. आ. रा. देशपांडे यांनीं ' मुक्तछंदा ' वर एक लेख दिला आहे. त्यांत ' तेरा अक्षरीं मराठी छंद ' म्हणून " सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची " या प्रसिद्ध आरतीचें उदाहरण निर्दिष्ट केलें आहे. परंतु सदरहु आरती अक्षरछंदांतील नव्हे. तें मात्रावृत्तच म्हणतां येईल. त्याची रचना शिथिल आहे म्हणून त्याच्या मात्रा नीट मोजून जुळणार नाहींत. ' आरती ' सारखी शिथिल रचना पूर्वींच्या कवींच्या कविता-संग्रहांत पुष्कळ सांपडेल. शिथिल रचनेचें उदाहरण घेऊन त्यावरून सिद्धांत बांधणें धोक्याचें होईल.

शेवटीं आणखी एक उल्लेख करून आटोपतें घेतों. यमकाबद्दलचा वादहि अजून संपलाच नाहीं. बॅ. सावरकर यांनीं यमकाची तरफदारी केलेली कित्येकांस रुचत नाहीं. यमकाचें बंधन वाटणें हें खरोखर ज्याच्या त्याच्या काव्यरचनासामर्थ्यावर अवलंबून आहे. रचनासामर्थ्य असूनहि कोणास सयमक कविता करावयाची नसेल तर तशा निर्यमक कवितेला ' काव्य 'च म्हणतां येणार नाहीं असें कोण म्हणतो ? यमक हें मराठी कवितेचें एक वैशिष्ट्य आहे. ' कला-विलास ' ' कला-विलास ' म्हणून हल्लीं फार म्हणण्यांत येतें. त्या दृष्टीनें " वृत्ताला यमकाचें लेणें लाधलें तर तें कला-विलासाचें चिन्ह ठरेल. कला-ऱ्हासाचें नव्हे " असें बॅ. सावरकर यांच्याप्रमाणें कोणी म्हटलें तर त्यांत काय गैर आहे?

मराठी कवितेला नियमक रचना कितपत मानवेल हा प्रश्नच आहे.

सह्याद्रि
फेब्रुवारी १९३५.

---

**टीपः—** श्री. आ. रा. देशपांडे यांनीं "भग्नमूर्ती" नामक काव्य-पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्याच्या शेवटीं मुक्तछंदावर एक प्रबंध दिला आहे. त्यांतील दोषांचें दिग्दर्शन करण्यासाठीं "नयन" मासिकाच्या जून १९४० च्या अंकांत रा. गंगाधर ग. धनवटे यांनीं एक लेख लिहिला आहे त्यांतील दोन अवतरणें या खालीं देत आहे त्यावरून बराच बोध मिळण्यासारखा आहे असें वाटतें.

१ "ताल हेंच छंदलक्षण" हा सिद्धान्त ते (देशपांडे) बिनदिक्कत मान्य करतात मग तालाचें शास्त्रीयत्व स्वीकारण्यास ते कां विचकतात? ते म्हणतात "छंद म्हणजे तालबद्ध अक्षररचना" या ठिकाणीं वापरलेला ताल हा शब्द इंग्रजींतल्या 'ऱ्हिदम्' ह्या शब्दाचा समानार्थी आहे. × × × संगीतोपयोगी ताल वा तालप्रस्तार अभिप्रेत नाहीं. × × × श्री. देशपांडे यांना संगीत शास्त्रांतील ताल हा पारिभाषिक शब्द हवा, परंतु त्याचें शास्त्रीयत्व मात्र नको!

२ प्रबंधाच्या सुरुवातीस ते (देशपांडे) लिहितात 'मुक्तछंदास मात्रांचें वा गणांचें नियोजित बंधन नसतें' परंतु 'ह्यांतील प्रत्येक अक्षराचा उच्चार अक्षरछंदाच्या पद्धतीप्रमाणें दीर्घ करीत हा मुक्तछंद वाचावयाचा आहे' असा खुलासा करून मात्रांच्या बंधनाचा त्यांनीं बोजवारा उडविला नाहीं काय? त्यांच्या दृष्टीनें प्रत्येक चरणक ऊर्फ गण पांच किंवा सहा अक्षरांचा करावयाचा आणि प्रत्येक अक्षराचा उच्चार दीर्घ म्हणजे द्वैमात्रिक करावयाचा. याचा सुस्पष्ट अर्थ असा होत नाहीं काय कीं प्रत्येक चरणक ऊर्फ गण दहा किंवा बारा मात्रांचा असावा. तरीहि देशपांडे लिहिणार, 'मुक्तछंदास मात्रांचें वा गणाचे नियोजित बंधन नसतेंच'!

---

# आरती हा अक्षरछंद कीं मात्रावृत्त ?

प्रत्येक काल–खंडाचा कांहीं एक विशेष असतो. दशवार्षिक काल–विभागणी ठरवून चालू दशकांतील वैशिष्ट्य सांगण्याचें झाल्यास हें दशक वाङ्मयविषयक वादांचें म्हणून सांगतां येईल. 'श्लील वाङ्मय कोणतें व अश्लील कोणतें ?' 'कलेचा नीतीशीं संबंध किती ?' 'वाङ्मय–चौर्य कशाला म्हणावें ?' 'मुक्तछंदाची व्याप्ति कोठपर्यंत ?' इत्यादि प्रश्नांची चर्चा सांप्रत जोरानें चालू दिसते. अशाच एका प्रश्नाविषयीं मी आज दोन शब्द लिहिणार आहे.

'सह्याद्रि' मासिकाच्या फेब्रुवारी १९३५ च्या अंकांत माझा 'मुक्तछंदा' वर लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही आरती अक्षरछंदांतील नसून मात्रावृत्तात्मक * असल्याविषयीं मी आपलें मत दिलें आहे. त्याचें कारण असें आहे कीं, रा. वामन नारायण देशपांडे व रा. आ. रा. देशपांडे या उभयतांनीं सदर आरती अक्षरछंदांत असल्याचें विधान केलेलें होतें तें मला योग्य वाटलें नाहीं. 'प्रतिभा' पाक्षिकाच्या ता. ३ मे १९३५ च्या अंकांत रा. वामन नारायण देशपांडे यांचा लेख 'मुक्तछंदाची व्याप्ति' या शीर्षकाखालीं खुलासेवजा म्हणून आला आहे. त्यांत त्यांनीं सदरहु माझ्या मताचा उल्लेख करून माझें मत चूक असल्याचें दर्शविलें आहे. म्हणजे सदर आरती ही अक्षरछंदात्मकच असल्याबद्दल विधान पुनः ते करतात. हें

---

* 'आरती हें मात्रावृत्त असल्याचें रा. रा. गो. गो. मुजुमदार ऊर्फ साधुदास यांनीं आपल्या 'मराठीची सजावट' या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत म्हटलें आहे.

विधान पुन: करितांना त्यांनीं कांहीं कारणें दिलीं नाहींत. नुसतें मोघम विधान करून प्रो. माधवराव पटवर्धन यांच्या नांवाचा हवाला मात्र दिला आहे. ‘ छंदोरचना ’ या पुस्तकांतील ‘ आरती ’ ही अक्षरछंदात्मक असल्याविषयीं प्रो. पटवर्धन यांचें म्हणणें मला पूर्वींच माहित होतें व तें माहित असूनच मी माझें मत मांडलें आहे. अर्थात् ‘ आरती ’ हा अक्षरछंदच होय असें जर रा. वामन नारायण देशपांडे यांस उत्तर द्यावयाचें होतें तर त्यांनीं प्रो. पटवर्धन यांच्या मताकडे नुसतें बोट न दाखवितां ‘ आरती ’ हा अक्षरछंदच कसा याची उपपत्ति सांगावयास पाहिजे होती. नुसती मतभिन्नता दाखविल्यानें कोणाचें मत खरें व कोणाचें खोटें याचा खुलासा सामान्य वाचकास होणें शक्य नाहीं. यासाठीं ‘ आरती ’ हें मात्रावृत्तच कसें ठरूं शकतें याचें विवेचन मी येथें थोडक्यांत करण्याचें योजिलें आहे.

‘ छंदोरचना ’ पुस्तकांत पान ७६।७७ यांत ‘ सुखकर्ता दुःखहर्ता ’ ही आरती एकादशाक्षरचरणी अक्षरछंदांत असल्याचें प्रो. पटवर्धन यांनीं प्रतिपादन केलें आहे. त्यावेळीं त्यांच्यापुढें आरतीची रचना मात्रावृत्तालाच जुळणारी आहे ही कल्पनाच नसावी. आरती हा अक्षरछंद असें समजूनच त्यांनीं आपलें विवेचन केलें आहे. ( प्रो. पटवर्धन यांनीं छंदोरचनेंत आरतीप्रमाणें आणखीहि कांहीं मात्रावृत्तें अक्षरछंदांत सामील केलेलीं दिसतात ! ) अर्थात् आरती हा अक्षरछंदच कां व मात्रावृत्त कां नव्हे, याची साधकबाधक चर्चा प्रो. पटवर्धन यांच्या विवेचनांत मुळींच नाहीं. व तशी ती नसल्यानें त्यांचें म्हणणें केवळ विधानार्थीच समजणें भाग झालें आहे. या वादांतील कोणाचें मत तात्त्विक दृष्ट्या बरोबर हें दाखविण्याचा प्रसंग आतांच उपस्थित झाला आहे.

सुखकर्ता० ही आरती अकरा अक्षरीं चरणाची, अक्षरछंदांतील आहे असें प्रो. पटवर्धन म्हणतात व रा. आ. रा. देशपांडे ती तेरा अक्षरीं चरणाची आहे असें निराळें मत देतात. सदर आरती

सर्वच यापुढें मी दिली आहे व प्रत्येक चरणावर अक्षरसंख्येचा आंकडा नमूद केला आहे.

॥ सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची[१३] ॥
॥ नुरवी पुरवी प्रेम कृपा देवाची[१३] ॥
॥ सर्वांगीं सुंदर उटी शेंदुराची[१२] ॥
॥ कंठीं झळके माळ मुक्ताफळाची[१२] ॥
॥ जयदेव जयदेव जयमंगलमूर्ती[१५] ॥
॥ दर्शन मात्रें मन-कामनापूर्ती[१२] ॥ १ ॥
॥ रत्नखचितासन तुज गौरी कुमरा[१४] ॥
॥ चंदनाची उटी कुंकुम केशरा[१२] ॥
॥ हिरेजडित मुकुट शोभतो बरा[१३] ॥
॥ रुणझुणती नुपूरें चरणीं घागरिया[१५] ॥ २ ॥
॥ लंबोदर पीतांबर फणिवर-बंधना[१५] ॥
॥ सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना[१३] ॥
॥ दास रामाचा वाट पाहे सदना[१२] ॥
॥ संकष्टीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना[१९] ॥ ३ ॥

( ही आरती सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या पूजेच्या पुस्तकावरून उतरून घेतली आहे व तिचा पाठ सर्वमान्य होण्यासारखाच दिसतो. ) ह्या आरतीवरून कोणताहि एक चरण अकरा अक्षरीं नाहीं हें वाचकांस सहज दिसून येईल. सर्वच चरणांत सारखीं अक्षरें नसलीं तरी बव्हंशानें अकरा अक्षरें पाहिजे होतीं. पण तसेंहि सिद्ध होत नाहीं. प्रत्येक चरणांत १२ पासून १९ पावेतों अक्षरें आलीं आहेत. अक्षरांचें प्रमाण सारखें नाहीं ही गोष्ट प्रो. पटवर्धन यांच्या लक्षांत आली होती व त्याचा खुलासा ' ही शिथिल रचना आहे ' असा त्यांनीं दिला आहे. शिथिल रचना कोणत्या तत्त्वावर समजणेची याचा विचार करतां मात्रावृत्तांत विवक्षित मात्रासंख्येपेक्षां कमी अधिक मात्रा भरणारीं अक्षरें आलीं तर तेथें शिथिल रचना म्हणतां येईल. अक्षरछंदांत ठराविक

अक्षरसंख्येपेक्षां कमी अधिक अक्षरें असतील तर त्यास शिथिल रचना असें न म्हणतां विषम-चरण आहेत असें म्हणणें युक्त होईल. शिथिल रचना हा शब्द वापरला तरी शिथिलतेला सुद्धां मर्यादा असूं शकते. परंतु सदर आरतींत अक्षरसंख्येचा विषमपणा १२ पासून १९ पावेतों गेला असल्याचें वरती दाखविलेंच आहे. इतकी शिथिलता ठेवणारा कवी ' इकडून तिकडून आणलेली वुद्धि दे चक्रपाणी ' हा श्लोक रचणाऱ्या कवीच्या कोटींत ढकलावा लागेल. बहुतेक आरत्या अकरा अक्षरीं चरणाच्या आहेत, असेंहि एक सामान्य विधान प्रो. पटवर्धन यांनीं करून ठेवलें आहे. परंतु तें वस्तुस्थितीला धरून नाहीं हें इतर अनेक आरत्या पाहिल्या असतां दिसून येईल.

चरणांमध्यें नियमित अक्षरसंख्या नसल्याचें वर दाखविलें आहे. त्यावरून आरती हा अक्षरछंद नव्हे, असेंच म्हणावें लागतें. आणि आरती हें मात्रावृत्त असल्याचें विचारांत घेतां अनेक अनुकूल प्रमाणें दृष्टीपुढें येऊन आरतीच्या मात्रावृत्तत्वाविषयीं मत निश्चित होतें.

आरती हें मात्रावृत्त ठरल्यावर त्याची अक्षरमोजणी न करितां मात्रा-मोजणीच केली पाहिजे व शिथिल रचना असल्याचें सांगतांना अमुक अक्षरसंख्या कमी अधिक असें म्हणण्यापेक्षां अमुक मात्रा कमीजास्त भरतात असेंच सांगणें वास्तविक होईल.

सुखकर्ता० ही आरती मात्रावृत्तात्मक असून प्रत्येक चरणांत बावीस मात्रा भरावयाच्या आहेत.× ही आरती विलंबित दादरा ( रूपक ) तालांत म्हणण्यांत येतें. ( मात्रावृत्तात्मक पद्यरचनाच ' सताल ' असूं शकते हें एक सर्वसामान्य गमक आरतीचें मात्रावृत्तत्व ठरविण्यास साधन आहे. ) दादरा तालाच्या मात्रा सहा

---

× टीपः—सह्याद्रि आगष्ट १९४० च्या अंकांत " अपभ्रंश आणि मराठी वृत्तें " या नांवाचा लेख अनुवादक प्रो. र. श्री. जोगळेकर यांनीं दिला आहे. त्यांत आरतीबद्दल खालील मत प्रकट केलेलें आढळून येतें.

××× आरती म्हणजे प्रत्येक चरणांत बावीस मात्रा आणि बाराव्या मात्रेवर यती असलेली द्विपदी होय.

आहेत. या आरतीच्या प्रत्येक चरणांत तालाचीं चार आवर्तनें होतात. पहिलीं तीन आवर्तनें प्रत्येकीं सहा मात्रा भरतील अशा अक्षरांचीं असून शेवटचें आवर्तन चार ( क्वचित् तीन ) मात्रांच्या अक्षरांचें ठेवून भरतीच्या दोन मात्रा म्हणतांना वाढवून घ्यावयाच्या आहेत. अशी ही आरतीच्या चरणाची योजना केलेली दिसते. या आरतीच्या तिसऱ्या कडव्याच्या चवथ्या चरणांत ( संकष्टीं पावावें० ) पांच आवर्तनें होतील अशी शब्दरचना आहे. तथापि तीहि तालदृष्ट्या शुद्ध म्हणतां येईल.

आरतीचें स्वरूप एकंदरींत याप्रमाणें सांगतां येतें. हें या आरतीचें सामान्यस्वरूप लक्षांत घेऊन विचार केल्यास सदर आरतीची रचना शिथिल आहे, हें प्रो. पटवर्धन यांचें म्हणणें मलाहि मान्य आहे. मात्र शिथिल रचना अक्षरें मोजून न ठरवितां मात्रांची मोजणी करून मी निश्चित करतों. हा उभयतांच्या दृष्टींतील फरक आहे. अक्षरांचा उच्चार आखडता व लांबता करावा लागतो हीहि गोष्ट मला मान्य होण्यासारखी आहे परंतु तो उच्चार तसा कां करावा लागतो याचें कारण, विशिष्ट मात्रासंख्या भरून घ्यावी लागते हें होय. या बाबतींत प्रो. पटवर्धन म्हणतात कीं, ‘ असें करण्यांत अक्षरांची संख्या कायम राहून कानाला मधुर स्वरवैचित्र्य अनुभवावयाला मिळतें.’ परंतु ही त्यांची विचारसरणी मुद्याला सोडून असल्यानें ती निरुपयोगी झाली आहे.

अनेक आरत्या पाहून आपण आपल्या इष्ट देवतेवर एखादी आरती रचावी म्हणून विचार मनांत आल्यानें मी पूर्वीं एकदां त्याबद्दल प्रयत्न केला होता. त्यावेळीं ‘अभंगा’ प्रमाणें विशिष्ट अक्षरसंख्या भरेल अशी शब्दयोजना करून आरती जुळणार नाहीं, तर विवक्षित मात्रा भरतील अशा दृष्टीनें शब्दयोजना करावी लागेल ही गोष्ट अनुभवास आली होती. म्हणूनच आरती ही अक्षरछंदात्मक आहे हें विधान मला चमत्कारिक व चुकीचें वाटलें व अजून वाटतें. सह्याद्रि, जानेवारी १९३६

# अभंगाचा छंद कोणता ?

सह्याद्रीच्या जानेवारी १९३६च्या अंकांत 'आरती हा अक्षरछंद कीं मात्रावृत्त ?' या प्रश्नाविषयीं मी अेक लेख लिहून 'आरती' हें मात्रावृत्तच कसें ठरतें तें सोदाहरण दाखविलें आहे. प्रो. माधवराव पटवर्धन यांनीं 'आरती' ची गणना अक्षरछंदांत केली असल्यानें त्यांस माझें तें उत्तर होतें. माझा लेख प्रसिद्ध झाल्यापासून आजपावेतों प्रो. माधवराव पटवर्धन यांनीं माझ्या म्हणण्याबद्दल कोणत्याच प्रकारें कांहीं लिहिलेलें दिसत नाहीं. त्यांच्यामुग्धतेवरून अनुकूल वा प्रतिकूल कसेंहि अनुमान काढतां येण्यासारखें आहे. माझ्या लेखासंबंधीं त्याचें कांहींहि मत असो !

प्रो. भवानीशंकर पंडित यांनीं सह्याद्रीच्या डिसेंबर १९३६च्या अंकांत 'ओवीचा विकास व नियमन' या मथळयाचा लेख (अुत्तरार्ध) लिहिला आहे. त्यांत ते म्हणतात कीं, "त्यांच्या (सहस्रबुद्धे यांच्या) म्हणण्याप्रमाणें ती (आरती) खरोखरच मात्रिक आहे. कारण मात्रिक अभंगांतूनच तिचा (आरतीचा) विकास झाला आहे. ... पटवर्धनप्रभृति तिला (आरतीला) लगत्वातीत अक्षरछंद समजतात तें वास्तविक बरोबर नाहीं." याप्रमाणें श्री. पंडितांनीं माझ्या मतास मान्यता दिली आहे असें होतें. मात्र अशी मान्यता देऊन ते लगेच असें लिहून मोकळे होतात कीं, "पण सारखेपणा राखण्यासाठीं अभंगाप्रमाणेंच तिचें (आरतीचें) नियमनहि लगत्वातीत अक्षरछंदांत होणें इष्ट आहे." यावरून त्यांची मान्यता कितपत खरी मानावयाची अशी शंका उत्पन्न होत असली, तरी 'आरती' विषयीं आतां मला अधिक कांहीं लिहावयाचें नाहीं.

## अभंगाचें छंदत्व

सदर लेखांत पुढें एके ठिकाणीं प्रो. पंडित यांनीं असें म्हटलें आहे कीं, "सहस्रबुद्धे आरतीला मात्रिक व अभंगाला लगत्वातीत अक्षरछंद समजतात. परंतु वास्तविक दोन्हीहि मात्रिकच आहेत." या त्यांच्या विधानाप्रमाणें पाहतां पुनः ते आरतीला मात्रिक म्हणतातच; पण दुसराच एक मतभेद दाखवून 'अभंग हा अक्षरछंद की मात्रावृत्त' या विषयीं त्यांनीं प्रश्न उपस्थित केला आहे. तेव्हां अभंगाच्या छंदत्वाबद्दल या लेखांत मीं थोडें विवेचन करण्याचें ठरविलें आहे.

अभंगाच्या स्वरूपाविषयीं श्री. पंडित यांचा स्पष्ट सिद्धांत काय आहे तो कळण्यासाठीं सदर लेखांतील दोन अवतरणें याखालीं देतोंः—

'मागील विवेचनावरून 'पद्य–ओवी–अभंग' गेय असल्यानें मात्रिक व सताल आहे हें सहज समजेल.'

'सारांश दोन्ही प्रकारच्या दृष्टींनीं अभंग हा लगत्वातीत अक्षरछंद नसून मात्रिकच आहे याविषयीं शंका राहत नाहीं.'

या दोन्ही उताऱ्यांतील स्पष्ट शब्दांवरून श्री. पंडित हे अभंगाला मात्रिक म्हणजे मात्रावृत्तच समजतात याबद्दल वाद नाहीं.

पद्य–ओवी–अभंग ( मोठा प्रकार ) याचें उदाहरण म्हणून 'सुंदर तें ध्यान' हा प्रसिद्ध अभंग त्यांनीं लिहून दाखविला आहे तो असाः—

सुंदऽरऽ तें ध्यानऽ ।
उऽभें विऽटेवऽरी ।
कऽरऽकऽटावऽरी ।
ठेवूनिऽया ॥

वरील अभंगांत जेथें जेथें लघु अक्षर आलें आहे त्या त्या ठिकाणीं त्या त्या लघु अक्षरापुढें अवग्रह चिन्ह देऊन तें गुरु

उच्चारण्याचें म्हणून दाखविलें आहे व शेवटीं निष्कर्ष सांगितला आहे कीं, या प्रकारच्या अभंगांतील पहिल्या तीन चरणांत प्रत्येकीं १२ मात्रा अथवा ६ अक्षरें व चवथ्यांत ८ मात्रा अथवा ४ अक्षरें येतात. 'अक्षरछंदांना लगत्वभेदातीत मानण्यांत येत असलें तरी त्यांतील प्रत्येक अक्षराच्या—मग तें लघु असो वा गुरु असो–दोन मात्रा धरावयाच्या असतात,' असा जो नियम रा. वामन नारायण देशपांडे यांनीं धाडसानें ठोकून दिला आहे तोच नियम श्री. पंडितांना मान्य आहे असें दिसतें. कारण वर लिहिल्याप्रमाणें त्यांनीं सदर अभंगांतील सर्व लघु अक्षरें गुरु समजून प्रत्येक चरणांतील ६ अक्षरांच्या १२ मात्रा हें प्रमाण मांडून दाखविलें आहे. परंतु 'प्रत्येक अक्षराच्या–मग ते लघु असो वा गुरु असो–दोन मात्रा धरावयाच्या' हा सिद्धांतच मुळांत चूक आहे* वास्तविक म्हटलें तर 'लघूची तों एक मात्रा, गुरूच्या दोन मानिती' हा कै. गोडबोले यांचा वृत्तदर्पणांतील नियम बरोबर आहे. मात्रा-

---

* **टीपः**— श्री. मो. स. मोने आध्यापिका शाळा हिंगणें यांनीं प्रो. माधवराव पटवर्धन यांच्या 'पद्य–प्रकाश' पुस्तकाचें परीक्षण ज्ञानप्रकाशमध्यें केलें आहे त्यांतील लागूपुरता उतारा आमच्या म्हणण्याच्या पुष्टीसाठीं देत आहे.

"छंद हा प्रकार प्रो० माधवरावांनीं ज्या प्रकारचा म्हणून प्रतिपादिला आहे त्याप्रकारें तो सर्वांशीं म्हणण्यांत येतो कीं नाहीं याबद्दल मला शंका वाटते. "या लगत्वभेदातीत प्रकाराला छंद म्हणतात" त्याचप्रमाणें "ज्या पद्यांत सारीं अक्षरें गुरुच मानायचीं असतात त्याला छंद म्हणतात." या त्यांच्या व्याख्यांचें अवलोकन केल्यास एकदां "लघुगुरु नाहीं अशी अक्षररचना" असें म्हणावयाचें आणि नंतर पुनः "सारी अक्षररचना गुरुच मानायची" असें म्हणायचें ही भाषा चमत्कारिक वाटते.

तें सोडून दिलें तरी ओवी अभंगादिकांत सर्वच स्थळीं उच्चारणांत म्हणणारा मनुष्य सर्वच अक्षरें गुरु मानतो असें मानतां येत नाहीं. × × × × निरनिराळे अभंग व ओव्या निरनिराळ्या प्रकारें दुसऱ्यांकडून मी म्हणवून घेऊन ऐकल्या. पण म्हणण्यांत सर्वच अक्षरें गुरुच म्हटलीं जातात असें खात्रीलायख म्हणवत नाहीं; मग तीं अक्षरें गुरुच कां मानावयाचीं ?

तसेंच विद्युन्माला या वृत्तांत सर्वच अक्षरें गुरु आहेत आणि 'रूप पाहातां

वृत्ताची रचना शिथिल असल्यास केव्हां केव्हां लघूचा उच्चार गुरु करावा लागतो. पण उलटपक्षीं गुरूचाहि उच्चार लघु करावा लागतो, व हे प्रसंग अपवादात्मक समजण्याचे आहेत.

## सताल म्हणजे काय ?

वरील अभंगांतील प्रत्येक अक्षराच्या दोन मात्रा समजावयाच्या म्हणजे सर्वच अक्षरें गुरु अुच्चारावयाचीं असें ठरतें. परंतु असा सर्व अक्षरांचा गुरु उच्चार करून सदर अभंग कसा म्हणतां येतो व तो श्रवणाला गोड कसा लागतो, हें श्री. पंडित यांनाच माहीत! श्री. पंडित हे अभंगाला नुसते 'मात्रिक' च म्हणून थांबले नाहींत तर 'सताल' हि म्हणतात. 'सताल' म्हणजे काय याचा खुलासा त्यांनीं केलेला नाहीं. ('ताल' 'आंदोलन' आणि 'लय' हे तीन शब्द पारिभाषिक म्हणून छंदोरचनेच्या वादांत वापरले जातात; परंतु त्यांचा निश्चित अर्थ कोणता व ते अेकमेकांचे पर्याय शब्द आहेत कीं काय याचा नीट बोध होत नाहीं.) 'सताल' या त्यांच्या शब्दावरून 'तालमात्रा' व 'अक्षरमात्रा' या एकच होत कीं काय असा प्रश्न उत्पन्न होणार आहे. तालमात्रा व अक्षरमात्रा अेकच होत असें त्यांचें म्हणणें असेल तर वरील अभंगाचा ताल कोणता हें त्यांनीं सांगावयास पाहिजे होतें; म्हणजे त्या तालांत सदर अभंग प्रत्येक चरण १२ मात्रांचा धरून म्हणतां येतो किंवा नाहीं हें पाहतां आलें असतें. अभंग हे गायिले जातात अेवढ्यावरूनच ते 'सताल' आहेत व 'सताल' आहेत त्याअर्थी 'मात्रिक' आहेत असा समज पुष्कळांचा होऊं शकण्याचा संभव आहे. तसाच समज श्री. पंडित यांचा झाला

---

लोचनीं' या देवीवर छंदांतील अभंगांत आणि रा० कोळते यांच्या 'माझ्या छकूलीचे डोळे' या त्याच छंदांतील ओवींत प्रो. माधवरावांच्या म्हणण्याप्रमाणें चरणांत अक्षरें आठच आहेत व तीं सर्व गुरुच आहेत; मग 'विद्युन्माला' हें वृत्त कां? आणि 'देवीवर' हा छंद कां? याची स्पष्टता अधिक व्हावयास हवी.

असावा व म्हणून ते अभंगास ‘ मात्रिक ’ म्हणत असावेत. पण तें चूक आहे. त्यांनीं दिलेला अभंगच उदाहरणादाखल घेऊन मी अधिक स्पष्टीकरण करतों.

‘ सुंदर तें ध्यान ’ हा अभंग ‘ धुमाळी ’ तालांत म्हटलेला पुष्कळांनीं अैकला असेल. धुमाळी तालाच्या मात्रा आठ आहेत. अभंगाचे चार चरण असून प्रत्येक चरण तालाच्या एका आवर्तनामध्यें पुरा केला जातो. तसेंच प्रत्येक चरणांत चार चार मात्रावर विराम घेतला जातो असें दिसून येईल. या खालीं अभंग तसा लिहून दाखविला आहे. तेव्हां त्याची मोडणी सांगितली पाहिजे. चरणामध्यें । अशी एकेरी उभी रेघ दिली आहे ती चार मात्रांवरील विरामाची दर्शक असून, चरणाच्या शेवटीं ॥ अशा अुभ्या दोन रेघा दिल्या आहेत त्या ठिकाणीं तालाचें अेक आवर्तन पुरें होतें, म्हणजे आठ मात्रा भरतात. अक्षरावर ⌣ असें चिन्ह दिलें आहे तें लघूचें म्हणजे अेक मात्रेचें दर्शक असून – हें चिन्ह गुरूचें म्हणजे दोन मात्रांचें समजण्याचें आहे. ज्या अक्षराचा उच्चार निसटता करावा लागतो किंवा अुच्चार जवळ जवळ न केल्यासारखाच होतो त्या अक्षरावर पोकळ टिंब दिलें आहे. त्या टिंबावरून त्या अक्षराची मात्रा शून्यच धरावी लागते असें समजावें.

सुन्दर तें । ध्यान ॥ अुभे विटे । वरी ॥
कर कटा । वरी । ठेवू । निया ॥
मकर कुं । डलें ॥ तळपती श्र । वणीं ॥
कंठी कौस्तुभ । मणी ॥ विरा । जित ॥

या उदाहरणावरून वाचकांच्या लक्षांत येअील कीं ‘ सुंदर तें ’ हे दोन शब्द वास्तविक सहा मात्रांचे ( गोडबोले यांच्या नियमाप्रमाणें ) असून त्यांचा अुच्चार चार मात्रांत करून घ्यावा लागतो. म्हणजे ‘ सुं ’ आणि ‘ ते ’ या दोन गुरु अक्षरांचा अुच्चार लघु

करावा लागतो. ‘ तळपती ’ यांतील ‘ ळ ’ आणि कौस्तुभ ’ या शब्दांतील ‘ भ ’ कसातरी लपेटीनें म्हणण्यांत येतो. म्हणजे तो अनुच्चारित आहे व त्याची मात्रा शून्यच ठरते. ज्या ऱ्हस्व अक्षरांवर — अशी खूण आहे तीं सर्व लघु अक्षरें गुरु म्हणावीं लागतात.

## अशास्त्रीय नियम

वरील पृथक्करणावरून असें सिद्ध होत आहे कीं ‘ अक्षरछंदांतील प्रत्येक अक्षराच्या दोन मात्रा धरावयाच्या असतात ’ हा नियम शास्त्रशुद्ध नाहीं.

प्रो. माधवराव पटवर्धन यांनीं ‘ छंदोरचना ’ पुस्तकांत “ ‘ छंद ’ म्हणजे लगत्वभेदातीत अक्षरसंख्याकरचना ” अशी व्याख्या देऊन ‘ अभंगा ’ला छंदांत गोविलें आहे व श्रीयुत पंडित हे अभंगाला ‘ मात्रिक ’ म्हणतात. या दोन्हींचा मेळ घालावयाचा कसा ? प्रत्येक अक्षराच्या दोन मात्रा धरावयाच्या म्हटलें तरी ‘ लगत्वभेदातीत ’ या विशेषणाला अर्थ काय राहिला ? शिवाय ‘ अक्षरसंख्याकरचना ’ हा पद्यरचनेंतील प्रकार सांगण्याचें तरी कारण काय ? अशी प्रश्नमालिका उत्पन्न होते. श्री. पंडित यांच्या मताप्रमाणें सर्व अभंग, सरसकट प्रत्येक अक्षराचा दोन मात्रा अितका उच्चार करून, आळेंबळें म्हणून दाखवितां येतील कदाचित् ! परंतु तें म्हणणें कृत्रिम व कर्णकटु वाटणार यांत संशय नाहीं. ‘ लगत्वभेद ’ हा भाषेचा स्वभाव आहे. तेव्हां त्या स्वभावाविरुद्ध होतां होईल तो उच्चार न करणेंच चांगलें. शक्य तितका लघुगुरूचा स्वाभाविक उच्चार सांभाळून अभंगाला ‘ ताल ’ लावणें हेंच श्रेयस्कर होणार आहे. भाषेचा स्वभाव, उच्चारसौलभ्य, रसनिष्पत्ति इत्यादि गोष्टी विचारांत न घेतां दडपून अभंग म्हणावयाचे व त्यावरून ते मात्रिकच आहेत असें दाखवावयाचें असल्यास प्रश्नच मिटला ! डफ तुणतुणें घेऊन घरोघर हिंडणारे पोवाडेवाले हे किती शीघ्र कवि असतात याचा अनुभव सर्वांस आहेच. ते लोक वाटेल तेवढा लहान मोठा शब्दसमूह ‘ ताल—

ठेक्यांत ' म्हणून दाखवितात. त्यावेळीं अक्षराच्या उच्चाराचे कसे हाल होतात हेंहि सर्वांच्या परिचयाचें आहे. त्यांच्या पद्यरचनेवरून जर छंदःशास्त्राचा नियम बांधावयाचा म्हटलें तर अनवस्थाप्रसंग प्राप्त होईल. अर्थात् वाद करतेवेळीं कांहीं गृहीत नियम अथवा अक्षरांच्या उच्चारांची विवक्षित काल–मर्यादा उभयपक्षीं मान्य असावयास पाहिजे.

अनेक संगीतशास्त्रज्ञांनीं अभंगांची ' नोटेशनें ' केलेलीं आहेत; तीं अवलोकनांत आणलीं तर अभंगांतील अक्षरांच्या मात्रा कशा मापल्या गेल्या आहेत व त्यावरून ' प्रत्येक अक्षराच्या दोन मात्रा ' हा नियम कितपत सिद्ध होतो तें कळून येईल. वादाकरितां अभंगास मात्रिक म्हणावयासहि हरकत नाहीं. पण मात्रावृत्ताच्या दृष्टीनें अभंगाची रचना शिथिल असल्याची गोष्ट मान्यच करावी लागेल व ही शिथिलता शेंकडा नव्वद अभंगांत आहे असेंहि कबूल करण्याची आपत्ति प्राप्त होईल ! शिथिलता ही अपवादात्मक पाहिजे. तीच बाहुल्यानें आढळून येत असेल तर मग शिथिल समजण्यांत औचित्य कोणतें राहिलें ? त्यापेक्षां अभंगाची गणना अक्षरछंदांत केलेली आहे तीच योग्य नव्हे काय ?

" सह्याद्रि " मार्च १९३७

---

**टीप**—प्रो. पटवर्धन यांनीं घनाक्षरी ही प्रणयप्रभा छंदाची चार सयमक कडवीं मिळून होते असें सांगितलें आहे व प्रणयप्रभा छंदाचें लक्षण देतांना चरणांतील प्रत्येक अक्षराच्या दोन मात्रा धरल्या आहेत; परंतु गोडबोले यांच्या वृत्त–दर्पणांत घनाक्षरीचें लक्षण सांगितलें आहे, त्यांत घनाक्षरीच्या प्रत्येक पदाच्या पोटीं चार चरण असतात. पैकीं पहिल्या तीन चरणांत प्रत्येकीं आठ अक्षरें असून बारा मात्रा असाव्या आणि चौथ्या चरणांत सात अक्षरें असून अकरा मात्रा असाव्या असें म्हटलें आहे. यावरून गोडबोले हे प्रत्येक अक्षराच्या दोन मात्रा धरण्याच्या विरुद्ध आहेत हें स्पष्टच होतें. गोडबोले यांचें मतच विचारार्ह व अधिक सयुक्तिक आहे. छंदोलंकारकर्ते रा. देशपांडे यांनीं कै. गोडबोले यांच्याप्रमाणेंच घनाक्षरीचें लक्षण दिलेलें आहे. ( छंदो-लंकार पान ८० पहा. )

# प्रो. माधव ज्युलियनांची दिंडी

प्रो. माधवराव पटवर्धनकृत 'छंदोरचना' पुस्तकाची दुसरी आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. ही आवृत्ति वाढवून व सुधारून काढलेली असल्याचें दिसून येतें. हें पुस्तक शास्त्रीय आहे. शास्त्र म्हटलें म्हणजे रूक्ष आणि कळण्यास दुर्गम अशी परिस्थिति असल्या कारणानें या ग्रंथाचें साकल्यानें परीक्षण पद्य-रचनाकार, साहित्यिक व तालज्ञ अशा गृहस्थांकडून कसोशीनें व्हावयास पाहिजे.

## दोन लक्षणें

हा लेख सदर पुस्तकाच्या परीक्षणासंबंधीं नसून त्यांतील फक्त दिंडी पद्याच्या लक्षणांविषयीं थोडी चिकित्सा करण्यापुरताच आहे. दिंडी पद्याबद्दल विशिष्टत्वानें लिहिण्याचें मी कां योजिलें हें आरंभीं सांगून ठेवितों. श्री. गोविंदराव खाजगीवाले यांनीं ता. २-८-३२ इ. च्या केसरींत पद्यरचनेच्या बाबतींत नवीन दिशा दाखविणारा जो लेख लिहिला आहे, त्यांत त्यांनीं उदाहरणादाखल दिंडी पद्याबद्दलच विस्तृत विवेचन केलें असून प्रो. माधवराव पटवर्धन यांची दिंडीची व्याख्या सदोष असल्याचेंहि दिग्दर्शित केलें होतें. म्हणून छंदोरचनेची दुसरी आवृत्ति हातांत पडल्याबरोबर मी त्यांतील दिंडी पद्याबद्दलचा मजकूर विशेष आस्थेनें पाहिला. त्यावरून प्रो. माधवराव पटवर्धन व रा. खाजगीवाले यांच्या मांडणींत पूर्वीं असलेला तात्त्विक फरक कायमच असल्याचें दिसून आलें आहे. 'कांहीं विशेष गुंतागुंतीच्या मात्रावली' या सदराखालीं पान ३५९ येथें एकदां व 'जातिजृंभण' नांवाच्या अध्यायांत पान ४०९, ४१० यांत पुन्हां दिंडीचें लक्षण दिलें आहे. वास्तविक दोन जागीं लक्षण द्यावयाचें कारण नव्हतें, व द्यावयाचें होतें तर एकवाक्यतेचें तरी

पाहिजे होतें. दिंडी पद्याचें लक्षण ठरेल तें एकच ठरणें आवश्यक व शक्य आहे असेंच कोणीहि म्हणेल.

## ‘ छंदोरचनें ’ तील उतारे

दिंडीची रचना कशी असते याबद्दल ‘ छंदोरचना ’ पान ३५९ यांत पुढीलप्रमाणें खुलासा आहे.

‘ दिंडीची मात्रावली षण्मात्रकावर्तनी आहे. येथें आद्यतालक पूर्वगण तीन मात्रांचा असल्यानें तो ( ⏑ – ) वा ( – ⏑ ) असाच असावा लागतो. पहिल्या आवर्तनांत षण्मात्रक गणाचा (– – –) हाच प्रकार चालतो. (– ⏑ ⏑ – ⏑ ) वा ( ⏑ – – – ⏑ ) वा (– ⏑ – ⏑ ) हे प्रकार चालत नाहींत. दुसऱ्या आवर्तनांत त्याचे तीन तीन मात्रांचे दोन तुकडे पडत असल्यानें ( ⏑ – ⏑ – ) ( ⏑ – – ⏑ ) (– ⏑ ⏑ – ) ( – ⏑ – ⏑ ) हेच प्रकार चालतात. ( + + + ) हा गण चालत नाहीं. तिसऱ्या आवर्तनांत दोन गुरू अक्षरेंच लागतात. ’

आतां पान ४०९।४१० यांवर कसा खुलासा केला आहे तो पाहा.

‘ दिंडी:—दोन क्रीडा ( ⏑ – – – ) वा पुष्प ( – ⏑ – – ) या गणांच्या मध्यें एक रगण वा तगण घातल्यानें दिंडीचा चरण सिद्ध होतो. अन्त्य व उपान्त्य हीं अक्षरें गुरू हवींत. इतरत्र एका गुरूच्या ठिकाणीं दोन लघु चालतात. ’

वरील दोन्ही लक्षणांचीच तुलना केली तर परस्परांत फरक दिसून येतो. दिंडी पद्याचे एकंदर चार विभाग पडतात. पैकीं पहिला विभाग तीन मात्रांचा आहे. तो तीन मात्रांचा गण (⏑ –) वा ( – ⏑ ) असाच असावा लागतो असें निश्चित विधान ‘ च ’ कार घालून केलें आहे. परंतु प्रो. माधवराव यांनीं दिलेल्याच दुसऱ्या लक्षणावरून पहिल्या विभागांतील तीन मात्रांचा गण (⏑ ⏑ ⏑) असा म्हणजे लघु अक्षरांचा असला तरी चालतो हें निष्पन्न होतें. व तसें दिंडीचें उदाहरण मिळतेंहि.

'पनस जंबू जंबीर विविध निंबें' (नलदमयंती)

दुसरा विभाग षण्मात्रक गणाचा असून त्याचा (– – –) हाच प्रकार चालतो असें म्हटलें आहे. यांतील 'च' कारहि दुसऱ्या लक्षणावरून टिकत नाहीं. या दुसऱ्या विभागांत कोणते प्रकार चालत नाहींत तें सांगतांना तीन प्रकार दाखविले आहेत; परंतु चिन्हांवरून पाहतां वास्तविक ते दोनच प्रकार दिसतात. एका प्रकारची द्विरुक्ति झाली आहे. त्यांच्या मताप्रमाणें आणखीहि दोन प्रकार होऊं शकतात.

असो. ही तुलना दुसऱ्या लक्षणाच्या दृष्टीनें पहिल्या लक्षणाची केली. आंता पहिल्या लक्षणाच्या दृष्टीनें दुसऱ्या लक्षणाची तुलना केली असतां काय होतें पाहूं.

पहिल्या लक्षणांत दिंडीचे चार विभाग असून त्यांतील प्रत्येक विभाग किती मात्रांचा असतो हें दाखवून जी फोड केली आहे ती तशी दुसऱ्या लक्षणावरून कळूं शकत नाहीं, व ती न कळल्यामुळें रचना करतांना पद्यकारास अडचणच पडेल. विभाग कळण्यानें 'यति' कळतो व 'यति' कळला म्हणजे कोणत्या मात्रांचे शब्द कुठें कसे घालावेत हें समजण्यास मार्ग सांपडतो. शिवाय भृंग जातींतील म्हणजे षण्मात्रक पद्याचें लक्षण सांगतांना 'व्रीडा' किंवा 'पुष्प' असे सात मात्रांचे आणि रगण किंवा तगण हे पांच मात्रांचे गण सांगणें अत्यंत अशास्त्रीय आहे. तसेंच दिंडीची मात्रावली गुंतागुंतीची आहे हें म्हणणेंहि योग्य ठरणार नाहीं.

## व्याख्यांतील उणीवा

दिंडींतील दुसरा विभाग सहा मात्रांचा आहे हें वरती सांगितलेंच आहे. त्या विभागांत प्रथम दोन मात्रा व पुढें चार मात्रा भरतील असे शब्द घालून चालणार नाहीं. उदाहरणार्थ पुढील चरण पाहा.

'त्यांत भर पडली अशा संकटाची' (गुप्तमंजूष)

या चरणांतील जाडी अक्षरांतले शब्द सहा मात्रांची भरती करून देणारे असले तरी त्यांचा उच्चार 'लय' सांभाळून करतांच येत नाहीं. तसेंच सदर दुसऱ्या विभागांत प्रथम ' जगणा 'चा शब्द ठेवल्यास वरील प्रकारचीच अडचण येते. म्हणजे दुसऱ्या विभागांत ( २+४ ) मात्रा भरून निघणारे शब्द किंवा ' जगणा 'चा शब्द हे त्याज्य गणाचे शब्द आहेत असें ठरत असून त्याची स्पष्टता असावयास पाहिजे, ती वरील दोन्ही लक्षणांपैकीं कोणत्याच लक्षणांत झालेली नाहीं. म्हणून दोन्हीं लक्षणें अतिव्याप्त आहेत असें म्हणावें लागतें.

## रा. खाजगीवाले यांचें मत

रा. खाजगीवाले यांनीं केसरींतील आपल्या लेखांत दिंडी पद्याचे त्र्यस्र व चतुरस्र गण सांगून त्याज्य गणाचाहि खुलासा केला आहे. त्यांच्या लेखांतील दिंडीच्या विवेचनाचा सारांश पुढीलप्रमाणें निघतो.

" हें पद्य सहा मात्रांचे तालांतील आहे. आवर्तनाच्या दृष्टीनें याचे चार भाग पडतात. पहिल्या व तिसऱ्या भागांत त्र्यस्र गण आणि दुसऱ्या व चवथ्या भागांत चतुरस्र गण येतात. पहिल्या भागांत कोणताहि त्र्यस्र गण चालतो. पण तिसऱ्या भागांत प्रथम (⏑ –) ' उमा ' गण आल्यास म्हणण्यास अडचणीचें पडतें. दुसऱ्या भागांत २ + ४ अशा मात्रांचे शब्द व ' जगण ' त्याज्य आहे. चवथ्या भागांत दोन गुरूच असावे लागतात. "

रा. खाजगीवाले यांच्या सदर व्याख्येवरून त्यांचें म्हणणें कसें निःसंदिग्ध व शास्त्रशुद्ध आहे हें वाचकांच्या सहज ध्यानीं येणार आहे.

छंदःशास्त्रासारख्या ग्रंथांत दिंडी पद्याच्या वरील लक्षणांसारखीं अपूर्ण लक्षणें असणें योग्य ठरणार नाहीं. व्याख्या म्हणजे शास्त्रीय व्याख्या पाहिजे. ती व्याख्या अव्याप्ति, अतिव्याप्ति, असंभव यांपैकीं कोणत्याहि दोषानें युक्त असतां कामा नये असेंच कोणीहि चिकित्सक मनुष्य म्हणेल.

छंदोरचनेच्या पहिल्या आवृत्तींत 'आरती' या छंदाबद्दल प्रो. पटवर्धन यांनीं जें मत प्रतिपादन केलें होतें, त्याविरुद्ध माझें म्हणणें उदाहरणांसहित खुलाशानें 'सह्याद्रि' मासिकाच्या जानेवारी १९३६ च्या अंकांत मी दिलें आहे; म्हणून सदर दुसऱ्या आवृत्तींत 'आरती' संबंधीं सुधारून कांहीं लिहिलें आहे कीं काय हें चाळून पाहूं लागलों पण 'आरतीचें' नांवच कोठें दिसून आलें नाहीं. तिची हकालपट्टीच केली आहेसें वाटतें. हें असें कां झालें कोणास ठाऊक! शास्त्राच्या चर्चेत व्यक्तीचा प्रश्न नसून तत्त्वाचा वाद असल्यानें त्याचा निर्णय लागण्यासाठीं पूर्वीच्या गोष्टीचा उल्लेख करून स्पष्टपणें खुलासा विचारणें भागच पडतें.

केसरी ता. ८ जून १९३७ इ.

# दिंडीच्या लक्षणाची आणखी चिकित्सा

प्रो. माधवराव पटवर्धन यांनीं आपल्या छंदोरचना पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तींत दिंडी-पद्याचीं दोन लक्षणें दिलीं आहेत, पण त्यांच्यांत एकवाक्यता नसून तीं सदोष कशी ठरतात याविषयीं मी एक लेख केसरींत प्रसिद्ध केला होता. त्या लेखास प्रो. पटवर्धन यांनीं २९।६।३७च्या केसरींत उत्तर देऊन माझ्या आक्षेपांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु तो प्रयत्न यशस्वी झाला नाहीं, हें मला आतां या लेखांत दाखवावयाचें आहे.

रा. खाजगीवाले यांच्या मूळ लेखाला प्रो. पटवर्धन यांनीं आज पावेतों उत्तर दिलेलें नाहीं. तथापि माझ्या सदर दिंडीच्या लेखासंबंधीं त्यांनीं लवकरच खुलासा प्रसिद्ध केला हें माझें भाग्यच म्हणावयास पाहिजे. व याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

दिंडीच्या चरणाचे चार विभाग असून पहिला भाग तीन मात्रांचा आहे. या भागांत (– ⏑) वा (⏑ –) असाच गण चालतो, असें प्रो. पटवर्धन यांचें म्हणणें असून त्यावर मी आक्षेप घेतला होता कीं, पहिल्या विभागांत सदर दोन गणांशिवाय तिसरा 'न' गणहि (⏑ ⏑ ⏑) चालतो. या आक्षेपाचा खुलासा त्यांनीं केला आहे कीं "जाति रचनेंत' (–) अशी ज्या ठिकाणीं गुरूची खूण असेल तेथें दोन लघुहि चालतात ही साधी गोष्टहि श्री. सहस्रबुद्धे यांना ठाऊक नसल्यानें त्यांनीं 'न' गणाचा समावेश (– ⏑) मध्यें होतो हें विसरून × × × हाकाटी केली आहे." या उत्तरांतील शाब्दिक गैरमेळ प्रथम दाखवितों. (–) अशी खूण असेल तेथें दोन लघु चालतात ही गोष्ट मला ठाऊक नाहीं तर मी (– ⏑) मध्यें 'न' गणाचा समावेश होतो हें कसा विसरलों ?

ठाऊक असलेली गोष्ट विसरणें शक्य आहे! त्यांच्या आरोपाप्रमाणें आतां तरी मला सदर गोष्ट माहीत झाली आहेच. तरी पण पुनः विचारतां येतें कीं, 'तीन मात्रांचा (– ⏑) वा (⏑ –) असाच गण असावा लागतो' या वाक्यांतील 'च'काराचा अर्थ काय करावयाचा? वरील दोन प्रकारांशिवाय तिसरा प्रकार संभवत नाहीं, हेंच 'च'कार दाखवितो. तिसऱ्या प्रकारचा संभव होता तर 'च'कार घालण्याची जरूर नव्हती. हा 'च'कार 'च वै तुहि' पैकीं समजावयाचा असला तर गोष्ट वेगळी! शास्त्रीय पुस्तकांत आणि तशांतहि एखाद्या पद्याचें लक्षण सांगतांना नको त्या ठिकाणीं 'च'कार घालून संशयास जागा ठेवणें हें अगदीं चूक आहे. 'च'कार कायम ठेवून कोणीहि अर्थ करावा व 'न गण' (तीन लघु) हा तिसरा प्रकार चालत असल्याचें संभवतें का पहावें.

चरणाच्या दुसऱ्या विभागांत चार मात्रांवर स्वल्पविराम आहे, तसाच तिसऱ्या विभागांत तीन मात्रावर स्वल्पविराम आहे. या दोन स्वल्पविरामांच्या दृष्टीनें दोन क्रीडा वा पुष्प गणांच्या मध्यें तगण घातल्यानें दिंडीचा चरण सिद्ध होतो असें म्हटलें तर व्याख्या शास्त्रशुद्ध कां ठरूं नये? असा सवाल प्रो. पटवर्धन करीत आहेत. मात्र त्यांनीं व्याख्या शास्त्रशुद्ध कशी हें अजूनहि सिद्ध केलेंच नाहीं. दिंडीच्या चरणाचे वास्तविक चार भाग असतां तीन भागांची कल्पना करणें अशास्त्रीय आहे. तसेंच षण्मात्रक पद्याचें लक्षण सात मात्रांच्या व पांच मात्रांच्या गणांनीं सांगावयाचें हा कोठला शास्त्रशुद्ध मार्ग? गण म्हणजे केवळ चरणाचा सोयीस्कर विभाग होय, व सोयीस्करपणाकडे पाहून तीन गण सांगून सुटसुटीत व्याख्या दिली आहे असें प्रो. पटवर्धन यांचें समर्थन दिसतें. पण सोयीस्करपणाच्या तत्त्वावर गण पाडणें योग्य कीं तालाच्या आवर्तनाच्या तत्त्वावर गण पाडणें योग्य हें आतां वाचकांनींच ठरवावें. सदर व्याख्या सुटसुटीत व स्मरण–सुलभ आहे म्हणून तिची उपयुक्तता सांगून उपयोग काय? वादाचा मुद्दा निराळाच राहिला!

एकदां शास्त्रशुद्ध व्याख्या देऊन पुन्हां स्मरण–सुलभ व सुटसुटीत अशा निराळ्या व्याख्या दिंडीशिवाय आणखी किती पद्यांच्या दिल्या आहेत ? वाचकांचे दोन भेद करण्यांत आले आहेत. एक सामान्य वाचक व दुसरा चिकित्सक वाचक. सामान्य वाचकां-करितां सुटसुटीत व्याख्या व चिकित्सक वाचकांसाठीं शास्त्रीय व्याख्या सांगण्याची रीत दिंडी पुरतीच असावी. इतर पद्यांच्या लक्षणाचे वेळीं सामान्य वाचकांची सोय प्रो. पटवर्धन यांनीं कित-पत केली आहे हें त्यांचें त्यांना माहीत ! सदर व्याख्या शास्त्रीयच आहे असा आग्रह दिसून येतो तो एकंदरींत टिकण्यासारखा नाहीं.

दिंडी पद्याची मात्रावली गुन्तागुन्तीची असल्याचें प्रो. पटवर्धन यांनीं पुनः म्हटलें असलें तरी मला तर तींत गुन्तागुंत कांहीं दिसत नाहीं. इतर पद्यांच्या दृष्टीनें दिंडीची रचना विशिष्ट तऱ्हेची आहे एवढेंच फार तर म्हणतां येईल. त्यांच्या मताप्रमाणें पाहिल्यास गुन्तागुन्तीची पद्यें बरींच निघतील व त्यांच्याहि दोन दोन व्याख्या द्याव्या लागतील. कोणत्याहि पद्याच्या दोन व्याख्या देण्याचा प्रयत्न केला म्हणजे त्यांची एकवाक्यता राखणें कठिणच जाईल.

दिंडीच्या चरणाच्या दुसऱ्या विभागांत कोणते गण चालतात व कोणते गण चालत नाहींत याबद्दल पान ३५९ वरील व्याख्येंत चिन्हें देऊन खुलासा केला आहे. त्यांत चार मात्रांवर स्वल्पविराम दिला नसल्याचें कोणासहि स्पष्टपणें दिसून येईल. दुसऱ्या विभागां-तील त्याज्य गण जो जगण ( ⏑ – ⏑ ) त्याची खूणहि पुस्तकांत दिलेल्या चिन्हांत नाहीं. हल्लीं मात्र केसरींतील लेखांत जगणाची खूण देऊन सुधारणा केलेली आहे. सदर दुसऱ्या विभागांत प्रथम दोन मात्रांचा शब्द व त्यापुढें चार मात्रांचा शब्द चालत नाहीं हा माझा आक्षेप कायमच असून त्याबद्दल उत्तर देण्याचें टाळ-लेलें आहे.

प्रो. पटवर्धन यांची व्याख्या अतिव्याप्त असल्याचें मी म्हटलें, त्याच नमुन्यानें त्यांनीं रा. खासगीवाले यांची व्याख्या अव्याप्त

म्हणून दोष दिला आहे. चरणाच्या तिसऱ्या विभागांत आरंभीं 'उमा' गण असल्यास अडचणीचें होतें, हें रा. खासगीवाले यांचें विधान चुकीचें ठरतें, या कल्पनेनें प्रो. पटवर्धन अव्याप्तीचा दोष दाखवीत असल्यास यांत त्यांची फसगत होत आहे. 'उमा' गण चालतो यास प्रमाण म्हणून चंद्रशेखरांच्या कवितेचें त्यांनीं उदाहरण दिलें आहे. परंतु मोठमोठ्या कवींच्या रचनेंत चूक मिळणारच नाहीं असा निरपवाद सिद्धांत मांडणें धाडसाचें होईल. 'उमा' गण असलेलीं उदाहरणें मिळत नाहींत असें मी म्हटलेलेंच नव्हतें. रा. खासगीवाले यांनीं 'उमा' गण त्याज्य ठरविला नसून तो म्हणण्यास अडचणीचा होतो इतकेंच सुचविलें आहे. 'उमा' गण त्याज्य म्हटला तरी अव्याप्तीचा दोष येणार नाहीं. उमा-गणाची उदाहरणें मिळतात हा कांहीं अव्याप्तीचा निर्विवाद पुरावा नव्हे.

रा. खासगीवाले यांच्या व्याख्येपेक्षां आपली व्याख्या सुबोध आहे म्हणून प्रो. पटवर्धन हे स्वतःच शिफारस करितात. परंतु व्याख्या सुबोध कां दुर्बोध हा प्रश्न अप्रस्तुत आहे. शिवाय रा. खासगीवाले यांची व्याख्या दुर्बोध कशी हें न दाखवितांच तिला दुर्बोध म्हणून दोष देणें गैरशिस्त आहे.

लेखाच्या शेवटीं श्रीयुत श्रीधर कृष्ण गोखलेकृत 'दिंडीचे' निश्चित लक्षण * देण्यांत आलें आहे. पण तें कां देण्यांत आलें आहे याचा थोडा तरी खुलासा पाहिजे होता. सदर लक्षणांशीं प्रो.

---

* रा. गोखलेकृत दिंडीचें निश्चित लक्षण:—

| (३) + | (६) + | (६) + | (४) = | १९ |
|---|---|---|---|---|
| | ४ + २ | ३ + ३ | २ + २ | मात्रा |
| अ | इ ई | उ ऊ | ऋ | |

वरील चिन्हांचा खुलासा—

( अ ) वाटेल तो तीन मात्रांचा शब्द

( इ ) 'ज' गण ( ⏑ — ⏑ ) वर्ज्य करून वाटेल तो चार मात्रांचा शब्द

पटवर्धन यांची व्याख्या ताडून पाहतां ती सर्वांशीं जुळती नाहीं. प्रो. पटवर्धन यांच्या व्याख्येबाबत रा. गोखले यांनीं आपलें मत ता. ९–७–३७ च्या केसरींत प्रसिद्ध केलेंच आहे. त्यांच्याहि मतानें प्रो. पटवर्धन यांची व्याख्या शास्त्रशुद्ध ठरत नाहीं.

'सुखकर्ता दुःखहर्ता' ही आरती मात्रावृत्तात्मक आहे किंवा कसें याविषयीं प्रो. पटवर्धन यांचें निश्चित मत अजून होऊं नये याचें आश्चर्य वाटतें. आरतीबद्दल वाद असतां 'परिलीना' छंदाचा उल्लेख विनाकारणच केला आहे. आरतीच्या चालीवर परिलीना छंद म्हणतां येतो असें सांगून प्रो. पटवर्धन यांना काय दर्शवावयाचें आहे? एखादा अभंग दोन तीन पदांच्या चालीवर म्हणतां येतो म्हणून छंदाच्या दृष्टीनें अभंग व पद एकच कसें ठरेल?

नवा काळ ता. ८ जानेवारी १९३८.

---

(ई) वाटेल तो दोन मात्रांचा शब्द

(इ) व (ई) मिळून किमान पक्षीं एक अक्षर गुरू पाहिजे.

(उ) वाटेल तो त्रिमात्रक शब्द

(ऊ) ,, ,, ,, ,,

(ऋ) दोन्ही अक्षरें गुरू

सदर व्याख्या देण्याची पद्धत फार सोयीची स्वीकारली आहे. अशा प्रकारची रीत प्रो. पटवर्धन यांनीं अवलंबिली असती तर लक्षांत ठेवावयाला व कळण्याला किती तरी उपयोग झाला असता, असें म्हणावेसें वाटतें.

# गीतीचें लक्षण

साहित्याचार्य श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांनीं सह्याद्रि मासिकामध्यें छंदोरचनेचें प्रथमच समालोचन केलें आहे. ते टीकाकार नात्यानें केलें नसून सदरहू ग्रंथाचें महत्त्व वाचकांच्या निदर्शनास आणण्याच्या हेतूनें केलें. तथापि त्यांनीं आपल्या समालोचनांत छंदोरचनेंतील दोष व उणीवा यांचा उल्लेख मोठ्या कुशलतेनें केला आहे. * छंदोरचनेवर इतरांचे अभिप्राय व समालोचनें येत आहेत. परंतु तीं केवळ गुणवर्णनपर अशींच दिसतात. सदर ग्रंथाचें खरें परीक्षण अजून झालेंच नाहीं.

छंदोरचना वाचून त्यांतील विवेचन समजून घेण्याचा प्रयत्न मी करीत आहें. हें करीत असतांना ज्या कांहीं आक्षेपाई अथवा

---

* **टीपः**—समालोचनांतील कांहीं अवतरणें पुढें दिलीं आहेत.

पटवर्धन यांनीं त्यांच्या ( कै. राजवाडे यांच्या ) ग्रंथावर अशी टीकाच केली आहे कीं, " राजवाडे यांनीं कांहीं कल्पकता दाखविली असली तरी त्यांचें विवेचन साधार सोपपत्तिक आणि निर्णायक वाटत नाहीं. कामांत निष्काळजीपणाहि झाला आहे " कदाचित् पटवर्धन यांच्या ग्रंथांतहि असेच कांहीं दोष निघूं शकतील. पान ४०२

या ग्रंथाला ' छंदोरचना ' हें नांव न देतां केवळ " पद्यरचना " हेंच नांव त्यांनीं दिलें असतें तर तें अधिक युक्त झालें असतें. कारण, वृत्त, जाति, आणि छंद असे मूलभूत वेगळ्या लक्षणांचे तीन पद्य-प्रकार होतात असें मानल्यावर यांतील सर्वांत अल्प-प्रमाण असा जो छंद त्याचें नांव सबंध पुस्तकाला त्यांनीं कां द्यावें ? थोडीशी दिशाभूलसुद्धां वाचकाची त्यामुळें होते.

पान ४०६

कांहीं [ पारिभाषिक ] शब्दांच्या स्पष्ट व्याख्या × × × दिल्या असत्या तर वाचकांची अधिक सोय झाली असती. ४०६

सह्याद्रि जून १९३७.

वादग्रस्त गोष्टी आढळून आल्या त्यांपैकीं दिंडीबद्दल माझें म्हणणें पूर्वी मांडलेंच आहे. प्रस्तुत लेखांत गीतीच्या लक्षणाबद्दल विवेचन करण्याचें योजिलें आहे.

गीति हें मात्रावृत्त मूळ संस्कृतांतील आहे अर्थात् त्याचें लक्षण संस्कृत छंदःशास्त्रकारांनीं पूर्वी सांगून ठेविलें आहे. व तेंच मराठी कवितेंतील गीतीला (आर्येला) लागूं आहे. संस्कृत वृत्तरत्नाकरामध्यें गीतीचें लक्षण दिलें आहे, तें असें:—

लक्ष्मैतत् सप्तगणा गोपेता भवति नेह विषमे जः।
षष्ठोऽयं न लघू वा प्रथमेऽर्धे नियतमार्यायाः॥
षष्ठे द्वितीयलात् परके न्ले मुखलाच्च सयतिपदनियमः।

याचा मराठींत अर्थ मराठी वृत्तदर्पणांत दिल्याप्रमाणें पण थोडी सुधारणा करून देतां येईल, तो असा—

'गीतींतील पूर्वार्धांत (व उत्तरार्धांतही) चार चार मात्रांचे सात गण असून शिवाय शेवटीं एक गुरू अक्षर पाहिजे. मात्र विषम गण जगण नसावेत. सहावा गण जगण असावा अथवा नगण (चार लघु) चालेल. सहाव्या गणांत नगण आल्यास त्यांतील पहिल्या लघु अक्षरापुढें यति येत असून त्या दृष्टीनें शब्दरचना असावी.'

पूर्वाचार्यांनीं दिलेलें सदर लक्षण शास्त्रशुद्ध असून त्यांत कांहीं अपुरेपणा राहिलेला नाहीं. छंदोरचनेंत सदर लक्षणच (फार तर निराळ्या भाषेंत) यावयास पाहिजे होतें. परंतु प्रो. पटवर्धन यांनीं निराळीच मांडणी केली आहे, व ती सदोष झाली आहे. गीतीचें लक्षण वृत्तविचारांत त्यांनीं दिलें आहे, तें पुढीलप्रमाणें:—

'गीति – – – – | – – |

– – – – | ⏑ – ⏑ – – | +

गीति हीसुद्धां चतुष्पदीच आहे. ही पूर्णपणें जातिस्वरूप नाहीं. विषम चरणांतील आद्यगणांत (⏑ – – ⏑ –) अथवा (– ⏑ – ⏑ –) या गणाचा उपयोग अद्यापि होऊं लागला नाहीं. सम चरणांतील

आद्य गणांत हीच स्थिति आहे. परंतु ही उणीव नाहींशी करितांच येणार नाहीं, असें मात्र नाहीं. सम चरणांतील दुसऱ्या गणांत मात्र ( ⏑ — ⏑ — — ) हाच गण लागतो. ”

१ प्रथमतः असा आक्षेप घेतां येतो कीं गीतीचा समावेश वृत्तविचारांत कां केला ? वास्तविक गीतीची गणना जातिविचारांत करावयास पाहिजे. पूर्वाचार्यांनीं आणि मराठी वृत्तदर्पणकारांनीं तिला जातिप्रकारांत घातलें आहे तेंच योग्य आहे. ‘गीति ही पूर्णपणें जातिस्वरूप नाहीं’ असें प्रो. पटवर्धन यांनीं विधान करून ठेविलें आहे. पण तें मुळींच समाधानकारक वाटत नाहीं. प्रो. पटवर्धन यांच्या कल्पनेप्रमाणें दिंडी व इतर कांहीं जातिप्रकार हेंसुद्धां पूर्णपणें जातिस्वरूप नाहींत, असें दाखवितां येईल. मग दिंडी वगैरे जातिप्रकाराची गणना वृत्तविचारांत करावयास काय हरकत होती ? वृत्ताला नियमित अक्षरसंख्या व नियमित लगक्रम असावा लागतो, तसा गीतीचा मुळींच प्रकार नाहीं. हें स्पष्ट असतांना गीति पूर्णपणें जातिस्वरूप नाहीं असें म्हणून तिला वृत्तांत कोंबण्याचा प्रयत्न निष्कारण झाला आहे.

२ चार चार मात्रांचे गणे सांगून पूर्वाचार्यांनीं लक्षण बांधलें आहे. पण प्रो. पटवर्धन अष्टमात्रक गण दाखवून मांडणी करतात. चतुर्मात्रक गण सांगण्यामध्यें खरोखर सोय आहे व त्यांत पूर्वाचार्यांचें विशिष्ट तत्व आहे. हें तत्त्व सोडतांना त्यांतील दोष किंवा गैरसोय दाखवावयास पाहिजे होती. छंदोरचना पान ९६ यांत प्रो. पटवर्धन यांनीं असें म्हटलें आहे कीं ‘चतुर्मात्रक आवर्तनाचीं वृत्तें असूंच शकत नाहींत असें नाहीं. परंतु चतुर्मात्रक आवर्तनाचीं वृत्तें सारींच अष्टमात्रक आवर्तनांत बसतात.’ या त्यांच्या विधानावरून त्यांनीं अष्टमात्रक रचना दाखविली असली पाहिजे असें अनुमान निष्पन्न होतें. पण पुढें त्यांनींच म्हटल्याप्रमाणें “अष्टमात्रक गणाचे चार चार मात्रांचे दोन दोन तुकडे पडूं शकत नाहींत.” ही जी अडचण आहे तीच लक्षांत घेऊन

पूर्वाचार्यांनीं चतुर्मात्रक गण सांगितले आहेत. 'ज' गण कोठें नको व कोठें आला पाहिजे एवढें सांगण्यानें लक्षणाची पूर्तता थोडक्यांत करतां आली. परंतु प्रो. पटवर्धन यांनीं अष्टमात्रक गण सांगून उलटी गैरसोय उत्पन्न करून ठेविली आहे. अष्टमात्रकाच्या मांडणी-प्रमाणें षण्मात्रक गण पाडून गीतीचें लक्षण कोणी एखाद्यानें सांगण्याचें योजिल्यास तसेंसुद्धां सांगतां येण्यासारखें आहे व तें चुकेल असेंहि वाटत नाहीं.

— — — | — — — |

— — — | — ⌣ — ⌣ | — — +

अशा चिन्हांनीं प्रो. पटवर्धन यांच्या पद्धतीला अनुसरून षण्मात्रक गणांच्या मांडणींत गीतीचें लक्षण दाखवितां येईल. फक्त शब्दरचना कशी करावी याविषयीं खुलासा देऊन ठेवला म्हणजे झालें! षण्मात्रक गणाचे गीतीचे चरण पुष्कळच सांपडूं शकतात.

उदाहरणार्थ—

वाद्य असो, नृत्य असो,
हो अभिनय किमपि गीत, अथवा हो।
धर्म म्हणे, आयकिलें,
दूताचें, वचन चांगलें कानें।
पार्थ म्हणे, वैराटा,
रथ कुरुकटकासमीप, राहूं दे। (उत्तरगोग्रहण)

प्रो. पटवर्धन यांस अष्टमात्रक गण सांगतांना दुसरा गण चार मात्रांचा मध्येंच पाडावा लागला आहे. परंतु त्यावरून अष्टमात्रक आवर्तन कसें पूर्ण होतें याचा खुलासा कळून येऊं शकत नाहीं.

३ 'विषम चरणांतील आद्य गणांत (⌣ — — ⌣ —) अथवा (— ⌣ — ⌣ —) या गणाचा उपयोग अद्यापि होऊं लागलेला नाहीं,' असें प्रो. पटवर्धन म्हणतात. त्यावरून वरील गणांचा उपयोग होऊं लागण्याचा संभव आहे असें त्यांचें म्हणणें दिसतें.

पण पूर्वाचार्यांनीं व्याख्या करून कित्येक शतकें झालीं तरी अजून सदर गणाचा उपयोग होत नाहीं त्याअर्थी सदर गण त्याज्य आहेत असें म्हणणेंच अधिक उचित झालें असतें. शास्त्रीय विवेचनांत अशा तऱ्हेचीं पोकळ विधानें करून ठेवणें गैर आहे.

४ 'समचरणांतील आद्य गणांत हीच स्थिति ( म्हणजे ⏑ – – ⏑ – अथवा – ⏑ – ⏑ – या गणाचा उपयोग होत नाहीं ही स्थिति ) आहे, परंतु ही उणीव नाहीशीं करितांच येणार नाहीं असें मात्र नाहीं'* असें पुनः वरील नमुन्याचें विधान प्रो. पटवर्धन यांनीं करून ठेवलेंच आहे. अशा प्रकारच्या अनुमानात्मक लिहिण्याचा उपयोग तात्त्विक दृष्ट्या कांहींच नाहीं. सदर उणीव कशी नाहींशी

---

* **टीपः**—सह्याद्रि मासिक एप्रिल १९४०च्या अंकांत श्रीयुत य. ग. फफे पुणें यांनीं " नकुलालंकार आणि आर्याछंद " या नांवावर एक लेख प्रसिद्ध केला आहे. त्यात नकुलालंकारमधील सदोष आर्या त्यांनीं उद्धृत केल्या आहेत त्यांपैकीं कांहीं आर्या येथें देतो.

त्यांनीं तिज दाखविलें स्वीय पिढीजात पक्वपांडित्य
**मावळणार कां न बुध** येतां उदयास वाग्भटादित्य ॥ ३६८ ॥
व्याख्यान इंग्रजी तें **चहुकडे पहा** दुमदुमे गावीं
गावीं स्तोत्रें किति मग अज्ञजनीं पात्रता महागावी ॥ ४७१ ॥
स्थापुनि विदर्भ वाणीविलास संस्था नवीन जोराची
**थोराचीच ती असे** नाही हुरहूर–चूर पोरांची ॥ १०४९ ॥

लेखाच्या शेवटीं श्री. फफे यांनीं आपला अभिप्राय पुढें लिहिल्याप्रमाणें दिला आहे. ते म्हणतात कीं, " आर्या हा नवीन छंद नसून तो फार प्राचीन काळापासून रूढ आहे. हजारों वर्षांपूर्वींच त्याचें लक्षण निश्चित झालेलें आहे. तेव्हांपासून आजवर त्याचें स्वरूप एकरूप राहिलेलें आहे. व त्यांत लक्षावधि रचना झालेली आहे. असें असतां "त्यांत उणीव आहे व ती भरून काढतां येईल " असें म्हणणें म्हणजे आर्येचें लक्षण शिथिल करावें असें म्हणणेंच होय. छंदोरचनाकारांचें हें म्हणणें कितपत ग्राह्य आहे आणि त्यांच्या नकुलालंकारांतील वर उद्धृत केलेल्या आर्या शुद्ध म्हणतां येतील काय याचा ऊहापोहपूर्वक निर्णय विद्वज्जनांनीं करावा. "

करावयाची हें सांगितलें असतें तर इतरांना विचार करण्यास बरें झालें असतें.

५ समचरणांतील दुसऱ्या गणांत मात्र ( ‿ – ‿ – – ) हाच गण असावा लागतो, असें म्हटलें आहे. येथेंहि थोडा दोष आहे. या अष्टमात्रक गणांतील पूर्वार्धांत चार लघु अक्षरें येऊं शकतात. व तीं तशीं आलीं, तर त्यांतील पहिल्या लघु अक्षरानंतर यति आहे, ही गोष्ट प्रो. पटवर्धन यांनीं सांगितली नाहीं. त्याबद्दल पूर्वाचार्यांनीं 'षष्ठ द्वितीयलात् परके न्ले मुखलाच्च सयतिपदनियमः' असें स्पष्ट सांगून ठेविलें आहे. हें पूर्वाचार्यांचें म्हणणें योग्य आहे, व तसा अनुभवहि आहे. सदर ठिकाणीं यति पडत नाहीं, असें प्रो. पटवर्धन यांचें मत असेल तर त्यांनीं आपली मतभिन्नता नमूद करून त्या प्रकारचीं उदाहरणें द्यावयास पाहिजे होती. पूर्वाचार्यांच्या मताप्रमाणें उदाहरणें नमुन्याकरितां याखालीं देतों, तीं पहा—

प्रेमळ गीत तुम्हांला हरि हरिणापरिस, बहुत वश करितें ।
होय महत्कार्य परी प्रभुचा तो नित्य, सहज हा खेळ ।
कीं नाम स्पर्श–मणी स्पर्शें परि काय, करिल खापर मी ।

वरील उदाहरणांतील 'परिस' 'नित्य' 'काय' या शब्दांपुढें यति आहे हें कोणासही सहज दिसून येईल.

प्रो. पटवर्धन यांनीं गीतीच्या लक्षणाचा खुलासा म्हणून जो केला आहे त्याचें पृथक्करण करून पाहतां विधानाचे दृष्टीनें त्या खुलाशाचे पांच भाग पडतात. पांचहि भाग मिळून सर्वच खुलासा कसा आक्षेपार्ह आहे याबद्दल माझें म्हणणें क्रमवारीनें मी सदरीं नमूद केलें आहे. त्यावरून पूर्वाचार्यांनीं दिलेलें गीतीचें लक्षणच शास्त्रशुद्ध असल्याचें व प्रो. पटवर्धन यांचीं विधानें सदोष असल्याचें कोणाही वाचकाच्या स्पष्टपणें ध्यानीं येईल.

विहंगम फेब्रुवारी १९३८

---

# साकीचें लक्षण

कोणतेंहि शास्त्र म्हटलें म्हणजे त्याचा विषय विवाद्य असावयाचा, हा सर्व साधारण नियम छंदःशास्त्राला हि लागू आहे. त्यांतून प्रा०-माधवराव पटवर्धनकृत "छंदोरचने" च्या बाबतींत हा विवाद्यपणा विशेष आढळून येतो. त्याचें प्रत्यन्तर दाखविण्यासाठीं मागील लेखांत "गीति" विषयीं विचार केला होता. आतां "साकी" बद्दल थोडेसें विवेचन करणार आहे.

मराठी पद्यरचनेचें छंदःशास्त्रदृष्ट्या तीन प्रकार आहेत, त्यांपैकीं मात्रावृत्तें हा एक प्रकार होय. या प्रकारास प्रो. पटवर्धन हे 'जाति' या संज्ञेनें संबोधितात. पूर्वाचार्योंनीं हीच संज्ञा मात्रावृत्ताला दिलेली आहे. मात्रावृत्तांतील चरणांमध्यें ठरीव मात्रा—संख्येचें बंधन असतें. लघुगुरूचा विवक्षित क्रम अपेक्षित नसतो. किंवा चरणांत अमुकच अक्षरें आलीं पाहिजेत असेंहि नसतें. मात्रावृत्ताचे 'पद्मावर्तनी' 'अग्न्यावर्तनी' 'भृंगावर्तनी' व 'हरावर्तनी' असे भेद प्रो. पटवर्धन यांनीं पाडले आहेत. पद्म म्हणजे आठ व पद्मावर्तनी म्हणजे अष्टमात्रकावर्तनी, असा याचा स्पष्टार्थ आहे. पद्मावर्तनी प्रकारांतील 'साकी,' 'चंद्रकांत,' 'भूपति,' 'भीमकबाळा,' 'पादाकुलक' हीं मात्रावृत्तें साधारणतः बहुजनविश्रुत आहेत. या पांच प्रकारच्या मात्रावृत्तांच्या लक्षणांविषयीं चिकित्सा थोड्याबहुत फरकानें एकत्र करतां येण्यासारखी असल्यानें नमुन्यादाखल सदरहूपैकीं 'साकी' हें वृत्त या लेखात विचारार्थ घेतलें आहे. साकीवृत्तांत येणाऱ्या 'पद्म' गणाच्या अंतर्घटनेविषयीं जो नियम ठरेल तोच नियम प्राधान्येंकरून इतर पद्मावर्तनी मात्रा—वृत्तांना लागूं पडण्यासारखा आहे. चर्चेकरितां त्यांतल्या त्यांत 'साकी' च घेण्याचें कारण, साकी हें

मात्रावृत्त सर्वपरिचित आहे हें होय. अर्थात् ही चर्चा सामान्य वाचकालाही कळूं शकेल.

मात्रावृत्ताचें लक्षण सांगावयाचें म्हणजे प्रत्येक चरणांतील मात्रा-संख्याच फक्त सांगावयाची, असा पूर्वींचा परिपाठ होता. परंतु चरणांतील केवळ मात्रासंख्या सांगितल्यानें लक्षण पुरें होत नाहीं हें तत्त्व ' वृत्तदर्पण 'कार व प्रो. पटवर्धन या दोघांनीं मान्य केलें आहे. वृत्तदर्पणाच्या एकोणिसाव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत श्री. नाटेकर म्हणतात कीं, ' संस्कृत मात्राछंदाचीं लक्षणें पूर्वींच्या आवृत्तींतून अपूर्ण होतीं. त्यांत फक्त प्रतिचरणांतील मात्रासंख्याच दिलेली होती. प्रत्येक चरणांतील मात्रासंख्या कशी तरी पुरी केली म्हणजे तो तो छंदःप्रकार रचनेनें व म्हणण्याच्या सौकर्याच्या दृष्टीनें पूर्ण झाला असें होत नाहीं. ' प्रो. पटवर्धन यांचें मत या बाबतींत सांगावयाचें झाल्यास ते ' चरणाच्या अन्तर्गत घटनेचा विचार केला पाहिजे ' असें म्हणतात. मिळून दोघांच्या म्हणण्याचा भावार्थ एकच दिसतो.

आतां साकीचें लक्षण कोणी कसें दिलें आहे तें पाहूं.

" प्रत्येक साकीला दोन चरण किंवा अर्धे असतात आणि दोहोंच्या शेवटीं यमक असतें. प्रत्येक अर्धांत चार मात्रांचा एक गण, असे सात गण म्हणजे अठ्ठावीस मात्रा असतात. चौथ्या गणाच्या अन्तीं म्हणजे सोळाव्या मात्रेवर अवसान असतें. चतुर्मात्रक गणाच्या पांच प्रकारांपैकीं कोणतेही गण असले तरी हरकत नाहीं. "

याप्रमाणें लक्षण वृत्तदर्पणकारांनीं दिलें आहे. प्रो. पटवर्धन यांच्या मताप्रमाणें साकी हें वृत्त अष्टमात्रकावर्तनी ठरतें व तेंच योग्य आहे. तेव्हां चार मात्रांच्या गणनेनें गण सांगण्यापेक्षां अष्टमात्रात्मक गण सांगणें अधिक सयुक्तिक व सोयीचें आहे. हा एक मुख्य आक्षेप वरील लक्षणांवर घेतां येतो. चतुर्मात्रक जे पांच गण आहेत ( वृत्तदर्पणांतील ' मात्रागण ' लक्षणांत सांगितलेले ),

त्यांपैकीं ‘ जगण ’ हा कोठेंहि आला तरी चालतो हें विधान चूक असल्यानें त्या दृष्टीनें सदर लक्षणांत दोष राहिलेला आहे; असा दुसरा आक्षेप येऊं शकतो. या आक्षेपाचें स्पष्टीकरण करावयास पाहिजे, तें पुढें प्रो. पटवर्धन यांच्या साकीच्या लक्षणाची चर्चा करितांना होणार आहे. सबब वृत्तदर्पणकारांच्या साकीच्या लक्षणां-विषयीं एवढेंच सांगून आतां प्रो. पटवर्धन यांनीं दिलेल्या साकीच्या लक्षणांकडे वळूं.

प्रो. पटवर्धन हे छंदोरचनेंत साकीचें लक्षण अगदी संक्षेपानें पुढील प्रमाणें चिन्हांनीं मांडून दाखवितात.

प | प | प | – +

वरील चिन्हांपैकीं – हें चिन्ह व + हें चिन्ह अशीं दोन्हीं चिन्हें प्रत्येकीं दोन मात्रांचीं दर्शक आहेत. ‘ प ’ याचा अर्थ थोडा विस्तारानें सांगावा लागेल तेव्हां ‘ प ’ च्या अर्थासह प्रो. पटवर्धन यांचें साकीचें लक्षण स्पष्ट करून सांगता येईल तें असें–

‘ साकी हें पद्मावर्तनी जातींतील वृत्त आहे. यांत अष्टमात्रक गणाचे तीन भाग व शेवटीं चतुर्मात्रक गणाचा एक भाग आहे, मिळून अठ्ठावीस मात्रा भरतात. अष्टमात्रक गणाचें अन्तर्घटना-दृष्टया भिन्न असे पांच प्रकार होतात. ते म्हणजे ( – – – – ) ( ⏑ – ⏑ – – ) ( ⏑ – – – ⏑ – ) ( – ⏑ – ⏑ – ) ( – – ⏑ – ⏑ ) हे होत. ‘ प ’ ही खूण जेथें असेल तेथें पद्मगणाचा वरीलपैकीं कोणताही प्रकार चालतो. ’

इतकी स्पष्टता केल्यावर आतां सदर लक्षणांचा विचार करण्यास हरकत नाहीं.

साकीच्या प्रत्येक चरणांत किती मात्रा असल्या पाहिजेत एवढें सांगून साकीचें लक्षण पुरें होत नाहीं हें जसें खरें, त्याचप्रमाणें असेंहि म्हणणें प्राप्त आहे कीं, वृत्तदर्पणकारांप्रमाणें चतुर्मात्रक कोण-तेही सात गण किंवा प्रो. पटवर्धन यांच्या म्हणण्याप्रमाणें कोणतेही अष्टमात्रक तीन गण व शेवटीं चतुर्मात्रक एक गण सांगून लक्षणाची

पूर्तता होत नाहीं. चतुर्मात्रक गण सांगा, अथवा अष्टमात्रिक गण सांगा, कसेंहि सांगितलें तरी 'जगण' हा कोणत्या ठिकाणीं चालत नाहीं, हें वृत्तदर्पणकार व प्रो. पटवर्धन या दोघांनींहि सांगितलें नाहीं. चतुर्मात्रक सात गणांच्या दृष्टीनें 'जगणा'विषयीं बोलावयाचें झाल्यास सातापैकीं २ । ४ । ६ यांत 'जगण' चालत नाहीं असें म्हणतां येईल व अष्टमात्रक गणासंबंधीं सांगावयाचें म्हणजे अष्टमात्रक गणाच्या उत्तरार्धांत 'ज गण' चालत नाहीं असें सांगतां येईल. ही गोष्ट मोघम झाली. तीच उदाहरणें देऊन स्पष्ट करूं.

अक्षय वैभव देई अखंड केशव सद्गुरु पायीं

(केशवस्वामी)

वसंत आला नाहीं तरि तो उद्यान-भाग जैसा

(रघुनाथ पंडित)

एका परीस एक सुरम्यें यादव गृहें अपारें

(मोरोपंत)

वरील उदाहरणांत जाड ठशांतील गण हा 'जगण' आहे. तसा त्या ठिकाणीं 'जगण' पडल्यानें साकीचा तो तो चरण म्हणतांना अडखळल्यासारखें होतें. कसें होतें तें वाचकांनीं सदर चरण म्हणून पहावे, म्हणजे स्वानुभवानेंच कळेल. पद्मगणाच्या (– – ⏑ – ⏑) या प्रकारचा उपयोग क्वचित्च होतो असें प्रो. पटवर्धन यांनीं छंदोरचना पान ३५५ यांत म्हटलें आहे. त्यावरून त्यांस 'जगणा'च्या वैशिष्ट्याची जाणीव आहे असें दिसतें. परंतु 'जगणा'चा उपयोग कोठें होऊं शकत नाहीं हें त्यांनीं स्पष्ट सांगणें अवश्य होतें.

चतुर्मात्रक गणाऐवजीं अष्टमात्रक गण देऊन लक्षण सांगण्याची रीत वृत्तदर्पणकारापेक्षां अधिक शास्त्रशुद्ध आहे व ती सुधारणा प्रो. पटवर्धन यांनीं केली. परंतु अष्टमात्रक गण वरील पांच प्रकारांपैकीं कोणतेही चालतात असें म्हणण्यांत सदोषता दोन प्रकारची संभवते. पैकीं 'जगण' कोठें कसा चालत नाहीं हें वर

सोदाहरण दाखविलेंच. तेव्हां दुसरा दोष कोणता ठरतो तें पाहूं.

अष्टमात्रक गण पुरा होण्यासाठीं शब्दरचना कशीहि असली तरी चालते असें अनुमान प्रो. पटवर्धन यांच्या लक्षणावरून निघूं शकतें. त्या दृष्टीनें विचार केल्यास कशीहि शब्दरचना चालत नाहीं असा आक्षेप घेतां येतो. आठ मात्रा भरणाऱ्या एका अथवा अनेक शब्दांचा उच्चार एका सपाट्यांत करतां येत नाहीं, ही मोठीच नैसर्गिक अडचण आहे. ही अडचण लक्षांत घेतल्यास 'यतिर्जिव्हेष्टविश्रामः' या व्याख्येप्रमाणें मध्यंतरी 'यति' संभवतो हें सहजच ठरणार आहे. परंतु प्रो. पटवर्धन यांनीं अष्टमात्रक गणाचे जे पांच प्रकार सांगितले आहेत त्यांत पोटांतला 'यति' मुळीच उल्लेखिलेला नाहीं. पोट--यति मानावा लागतो किंवा नाहीं याची प्रत्यक्ष कल्पना आणून देण्यासाठीं साकीचे चरण उदाहरणादाखल देऊं.

तो **तीर्थरूप** तीर्थांचाही मुनिपादोदक वंदी
ते **एकदा पतीच्या** पाशीं **बहु भीत भीत** गेली ।
**मी धन्य म्हणुनि** जीच्या योगें रत्नाकर बहु गाजे । (**मोरोपंत**)

वरील चरणांत जाड ठशांतील भाग अष्टमात्रक गणाचे आहेत. व ते प्रो. पटवर्धन यांच्या पांच प्रकारांपैकींच म्हणजे 'प' या संज्ञेंत मोडणारे व त्यांना मान्य होतील असे आहेत. परंतु वरील जाड ठशांतील शब्दविभागाचा उच्चार करतांना अडथळा येतो हें उच्चार करून पाहिल्यास कोणालाहि कळून येण्यासारखें आहे. प्रो. पटवर्धन यांच्या मताप्रमाणें 'प' गण असून उच्चारास अडथळा होतो; त्या अर्थी अष्टमात्रक गणाच्यामध्यें 'यति' संभवतो असें म्हणण्यास मुळीच हरकत नाहीं. "ज्या ठिकाणीं शब्दसमाप्ति वा पदसमाप्ति न झाल्यास रचना कर्णकटु लागेल तेथें 'यति' आहे असें समजावें." असें प्रो. पटवर्धनहि सांगतात. पोटयतीच्या दृष्टीनें शब्दरचना नसल्यास उच्चार-सुलभता राहत नाहीं आणि उच्चार-सुलभतेच्या अभावीं कर्णकटुत्व येत असतें.

वरीलप्रमाणें पोट-यति मानावा लागत असल्या कारणानें त्याच्या अपेक्षेनें पोटगणाचा विचार करणें क्रमप्राप्तच होतें. अष्टमात्रकावर्तनी गणाची अंतर्गत रचना पाहिली असतां ती अंतर्गत रचना दोन प्रकारची असूं शकते. पैकीं चतुर्मात्रक किंवा द्विमात्रक पोटगणांनीं होणारी रचना, हा एक प्रकार आणि त्रिमात्रक व द्विमात्रक गण मिळून होणारी रचना, हा दुसरा प्रकार होय. हे दोन्ही प्रकार प्रो. पटवर्धन यांच्या चिन्हांनीं दाखवून पोटयतीचाही निर्देश करूं.

(– – – –) ही रचना चतुर्मात्रक किंवा द्विमात्रक गणांची असून हिच्या पोटीं दोन, चार किंवा सहा मात्रेवर कोठें तरी एक यति अवश्य आहे.

(⏑ – – ⏑ –) (– ⏑ – ⏑ –) ही रचना त्रिमात्रक व द्विमात्रक गण मिळून होणारी आहे. हिच्यामध्यें प्रथमच्या तीन मात्रांवर ‘ यति ’ असतोच. व पुढील तीन मात्रांवरही केव्हां केव्हां यति संभवतो. मात्र द्विमात्रक गण आधी आणि नंतर त्रिमात्रक दोन गण अशी रचना या दुसऱ्या प्रकारांत चालत नाहीं हें लक्षांत घेण्यासारखें आहे. शब्दरचना करितांना सदर पोटयतीच्या ठिकाणीं शब्द पुरा झालेला चांगला. तथापि स्वतंत्र शब्द नसल्यास त्या शब्दाचा उच्चार करतांना यति सांभाळून उच्चार करितां येईल व त्या उच्चारामुळें अर्थाला वैगुण्य न येईल किंवा शब्दभंग कर्णकटु न वाटेल असा तो शब्द असला तरी चालेल.

एकंदरींत वरील विवेचनावरून अष्टमात्रक गणांत पोटयति कां मानावा लागतो आणि ‘ जगण ’ कोठें कसा त्याज्य होऊं शकतो, हें वाचकांच्या लक्षांत येईल. तेव्हां आतां प्रो. पटवर्धन यांचें साकीचें लक्षण अपुरें व सदोष आहे असें म्हणण्यास काय हरकत आहे?

विहंगम जून १९३८.

# शिथिल पद्यरचनेची इष्टानिष्टता

मौजेच्या गेल्या दिवाळी अंकांत एक मौजेचें विधान वाचावयास मिळालें! शास्त्र जाणणारी व शास्त्राचा विचार करणारी विद्वान् मंडळी अशास्त्रीय गोष्टीचें कौतुक व समर्थन करूं लागलेली पाहून आश्चर्य वाटतें व मनास खेद होतो.

सदर दिवाळी अंकांत 'मराठी लोकगीतें व त्यांच्या चाली' या विषयावर ठाण्याचे प्रसिद्ध साहित्यिक श्रीयुत रा. म. आठवले यांनीं एक विचार करण्यासारखा महत्त्वाचा लेख लिहिला आहे. त्यांत 'लोकगीतें हीं गीतें असल्यामुळें छंदोदृष्ट्या तीं मात्रा–छंदात्मक असतात म्हणजे त्यांचे चरण अक्षर–नियमित नसून मात्रा–नियमित असतात.' असा सामान्य नियम प्रथम देऊन पुढें लोकगीताची प्रत्यक्ष रचना कशी झालेली असते या संबंधीं विवेचन करतांना सदर लेखामध्यें श्री. आठवले म्हणतात कीं, 'कोणत्याहि लोकगीताचे प्रत्यक्ष चरण पाहूं गेल्यास त्यांतील मात्रांचा क्रम प्रायः त्या गीताच्या चालीशीं क्वचितच जुळता असलेला आढळेल! बहुधां कोणतेंही लोकगीत त्याच्या परंपरागत चालीनुसार म्हणतांना त्याच्या चरणांतून प्रत्यक्ष ग्रथित असलेल्या मात्रा कित्येक ठिकाणीं असतात त्याहून भिन्न रीतीनेंच उच्चाराव्या लागलेल्या अनुभवास येतात. म्हणजे लोकगीत म्हणतांना त्यांतील कित्येक दीर्घ किंवा गुरु मात्रा ऱ्हस्व म्हणजे लघु उच्चाराव्या लागतात. कित्येक ऱ्हस्व वा लघु मात्रांचे उच्चारांत दीर्घीकरण किंवा गुर्वीकरण करावें लागतें, तर कित्येक मात्रांचें साक्षात् अस्तित्व सुद्धां उच्चाराचे वेळीं नाकारावें लागतें. म्हणजे त्या मात्रा शून्य वा हीन मात्राच मानाव्या लागतात.' याप्रमाणें श्री. आठवले यांचे विवे-

चन असून तें वस्तुस्थितीला धरून आहे व त्यांत आक्षेपार्ह कांहीं नाहीं.

मात्र लोकगीताची रचना अत्यन्त शिथिल असते हें एकदां मान्य केल्यावर उलट ती तशी शिथिल रचना असणेंच इष्ट होय असें म्हणणें विसंगत ठरेल ! परंतु सदर लेखांत पुढें शिथिलतेचें समर्थन करण्याचा प्रयत्न श्री. आठवले यांनीं केला आहे. कसा तो पहा. ते म्हणतात, " लोकगीताच्या चालींनीं त्यांची छांदस गणगोतें बरोबर निश्चित केलीं तरीही त्या गीतांच्या मूळ देहांत व स्वरूपांत तसा पालट मात्र कोणी करावयाचा नसतो.—कोणालाच तो अधिकार नाहीं—अर्थात् लोकगीतें म्हणतांना त्यांच्या चरणांतील प्रत्यक्ष उपस्थित मात्रांची कितीहि ओढाताण करावी लागली तरी तें दोषास्पद गणलें जात नाहीं. " इतकेंच म्हणून ते थांबले नाहींत. याहून विशेष आश्चर्याचें आणखी विधान त्यांनीं असें केलें आहे कीं, " कित्येक वेळां मात्रांची ओढाताण लक्षांत येऊन सुद्धां तीं गीतें कानांना यत्किंचित्हि कटु न लागतां उलट त्या ओढाताणीमुळेंच त्यांच्याठायीं एक प्रकारची निराळीच गोडी उत्पन्न झालेली ऐकणाराच्या प्रत्ययास येते......लोकगीताची मात्रादुष्टतासुद्धां त्यांना अपकर्षक न होतां उलट एका प्रकारें त्यांची सहज-रम्यता वाढविणारीच होते. " असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. पण हें त्यांचें मत योग्य कसें म्हणावयाचें याचें गूढ पडतें.

' स्थितस्य गतिश्चिंतनीया ' या न्यायानें चुकून झालेली शिथिल रचना क्षम्य आहे असें समजून जरूर त्या ओढाताणीनें उद्दिष्ट चालीशीं गीत जुळतें करून म्हणावें असें कोणी म्हटलें तर तें एक वेळ शोभेल. पण शिथिलतेमुळेंच गीत म्हणतांना अधिक गोडी येते हें म्हणणें चमत्कारिक वाटतें. कदाचित् रुचिवैचित्र्याचा हा एक मासला म्हणतां येईल ! तरी पण गोडीच्या दृष्टीनें शिथिलताच उपकारक ठरत असेल तर उलट सिद्धांत असा निघतो कीं, छंदःशास्त्रदृष्ट्या शुद्ध रचनेचें गीत तितकें गोड लागणार नाहीं

किंबहुना कर्णकटुच लागेल व मग शुद्ध रचनेची उपयुक्तता व आवश्यकताही राहणार नाहीं ! अर्थात् नवीन लोकगीतांची रचना करावयाची ती शास्त्रशुद्ध न करितां जाणून बुजून वाटेल तशी शिथिल रचनाच करावी हेंच इष्ट म्हणण्याचा प्रसंग प्राप्त होईल. यासंबंधीं मराठींतील प्रसिद्ध छंदःशास्त्रज्ञ प्रो. माधवराव पटवर्धन यांचे मत पाहिल्यास तें विरुद्ध दिसतें. छंदोरचना पान १५ यांत "रामा मन गेलें तुझ्यावर जडून०, आला खुशींत समीन्दर०, राना–रानांत गेली बाई शीळ० हीं गीतें हृदयंगम वाटतात तीं शैथिल्यामुळें मात्र नव्हे, या गीतांच्या गोड चटकदार चालीमुळेंहि नव्हे, तर या गीतांत भावार्थच तसा रमणीय आहे म्हणून. परंतु यांच्या लोकप्रियतेचें रहस्य या शैथिल्यांत, ऱ्हस्वदीर्घांच्या प्रसरण-संकोचांत आहे अशा भ्रामक समजुतीनें या शैथिल्याचेंच अनुकरण होऊं पाहत आहे. वस्तुतः आधुनिक संस्कृतीच्या काळांत असें शैथिल्य वैरस्यकारकच होतें." असें प्रो. पटवर्धन यांनीं म्हटलेलें आहे. 'चालीनुसार इष्ट त्या मात्राक्रमाप्रमाणें जेथें बरोबर मात्रा आलेल्या असतात तेथें त्यांचा उच्चार स्वभावतःच सुखानें होतो.' हें वास्तविक तत्त्व व सत्य असून तसें तें श्री. आठवले यांनीं एके ठिकाणीं नमूद केलेंच आहे. परंतु त्याची संगति त्यांच्या इतरत्र आलेल्या विधानाशीं लागत नाहीं म्हणूनच हा प्रश्न उद्‌भवतो.

शिथिल रचनेंतील गोडीचें समर्थन करतांना श्री. आठवले यांनीं प्रत्यन्तराकरितां एक उदाहरण दिलें आहे, तें तर सर्वांवर ताण करणारें औरच आहे. मात्रादुष्टतेलाही शोभावयास लावणारा लोकगीताचा प्रभावी गुण–बालबोधभाव–वर्णन करितांना ते म्हणतात कीं, "या प्रकाराचें—लोकगीतांतलेंच कशाला ? तर नागर कवितेंतलें सुद्धां–अगदीं ठळक व चटकन् पटणारें उदाहरण दाखवावयाचें म्हणजे 'नवनीता' च्या द्वारां पुष्कळांना परिचित असलेलें चिन्तामणी कवीचें दिंडी वृत्तांतील 'ध्रुवाख्यान' हें होय.

हें प्रकरण छंदोदृष्टया असेंच पुष्कळ ठिकाणीं मात्रादोषांनीं व्यास आहे. परंतु त्याची ती मात्रा—दुष्टता येथें विवेचिल्या प्रमाणें उलट त्याच्या ठायीं जात्याच असलेल्या त्या नैसर्गिक बाळबोध भावाला शोभविणारी भासते व त्यायोगें त्याची रंजकताही कांहींशी उठूनच दिसतें." याप्रमाणें दिंडीच्या शिथिल रचनेची मोठीच उपयुक्तता श्री. आठवले यांनीं दाखविली आहे. आपल्या दिंडीच्या रचनेला वरील प्रकारें मिळालेलें प्रशंसा—पत्र पाहून स्वर्गांत चिंतामणी कवीला धन्यता वाटल्याशिवाय राहणार नाहीं. चिंतामणी कवीबरोबर आधुनिक कवी प्रो. मायदेव यांच्याहि 'चिलिया' आख्यानांतील शिथिल रचनेचा दाखला आपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ आठवले यांनीं दिला आहे. तोहि चिन्त्य आहे. प्रो. मायदेवांनीं शिथिल दिंडी पद्यरचना कां केली याचें उत्तर ते स्वतः देऊं शकतील. चिंतामणी कवीनें ध्रुवाख्यानांतील सर्वच दिंड्या मात्रादोषांनीं युक्त केल्या असत्या तर त्याची रंज-कता अधिकच वाढली असती असा तर्क श्री. आठवले यांच्या मतावरून सहजच निघतो. मला वाटतें, हा सर्व अनवस्था प्रसंग होईल.

शिथिल रचनेची दिंडी गोड लागते किंवा शुद्ध रचनेची दिंडी गोड लागते हें ठरविण्यास फारसा विचार करण्याची मुळीच जरूरी नाहीं. मासल्याकरितां दोन्ही प्रकारच्या दिंडीचें एक एक उदा-हरणच पुढें देत आहे. त्या दोन्ही दिंड्या म्हणून पाहिल्या असतां सामान्य वाचकालासुद्धां स्वानुभवावरून स्थालीपुलाक न्यायानें या प्रश्नाचा निर्णय सहज करितां येईल.

चिन्तामणिकृत शिथिल रचनेची दिंडी—

"ध्रुवाख्यान ऐकती गाति वाचे
ध्रुवासनीही अढळ वास त्याचे ।
चिंतामणी गावोनि गुण साचे
सौख्य पावोनी हरीपदीं नाचे ॥"

रघुनाथ पंडितकृत शुद्ध रचनेची दुसरी दिंडी—

कथा बोलूं हे मधुर सुधाधारा
होय शृङ्गारा करुणरसा थारा ।
निषधराजा नलनामधेय होता
वीरसेनाचा तनय महा होता ॥

असो. शिथिल रचनेची इष्टता एकदां ठरल्यावर मग कोणी किती शिथिलरचना करावी याला मर्यादा उरणार नाहीं. जर शिथिलतेलाही कांहीं मर्यादा पाहिजे असें म्हणण्याची आपत्ति संभवत असेल तर अमुक इतकी शिथिल रचना इष्ट व त्यापेक्षां अधिक शिथिल असणारी रचना अनिष्ट असा निर्णय मग कोणत्या नियमाधारें करावयाचा ? हें मोठें कोडेंच येऊन पडणार आहे. याचा तरी विचार शिथिल रचनेची इष्टता सांगणारांनीं करावयास नको काय ?

दिंडीची शास्त्रशुद्ध रचना कोणती व तिचे नियम काय आहेत यासंबंधीं सध्यां वाद चालू आहे. अशा स्थितींत दिंडीच्या शिथिल रचनेचा वरील गौरव पाहून मी आश्चर्यचकित झालों. लोकगीतांच्या शिथिल रचनेचें समर्थन करतां करतां वरील दिंडीचें उदाहरण देऊन श्री. आठवले यांनीं आपल्या विधानास बळकटी तर आणली नाहींच; उलट तें विधान किती विचित्र व अशास्त्रीय आहे हेंच सिद्ध करून दिलें आहे यांत संशय नाहीं.

सदर आपल्या लेखाच्या शेवटीं श्री. आठवले यांनीं स्वतःच एक निर्णयात्मक शेरा मारून ठेविला आहे. तो असा— ‘ येथवरच्या या विवेचनावरून लोकगीताच्या संबंधांत मात्रा-दुष्टता हा निषिद्ध असा दोषच कसा नव्हे आणि त्याचा नैसर्गिक बाळबोध भाव मात्र त्या दोषालाही कसा गुणच बनवून सोडतो हें चांगलें स्पष्ट होत आहे. ’ याप्रमाणें त्यांचें सिद्धान्तरूप मत असलें तरी तें चिकित्सक वाचकास समाधानकारक वाटण्यासारखें नाहीं. व बालबोध भाव म्हणजे काय याचाही नीट बोध होऊं शकत नाहीं.

'बालबोध भाव' हा एक नवीन पारिभाषिक शब्द निर्माण करून व वापरून त्याच्या आधारावर शिथिलतेचें गैरवाजवी समर्थन करण्यांत आलें आहे म्हणून त्यासंबंधीं हें थोडक्यांत विवेचन करून लोकांपुढें विचारार्थ मांडलें आहे. याचा योग्य तो परामर्ष तज्ज्ञाकडून घेतला जावा हीच इच्छा !

विहंगम मासिक आगष्ट १९३८ इ.

---

**टीपः—** श्री. न. चिं. केळकर यांच्या लेखांतील ( सह्याद्रि जून १९३७ " छंदोरचना-समालोचन " या लेखांतील ) खालील उतारा उपयुक्त वाटल्यावरून विचारार्थ येथें दिला आहे.

" गद्याची भाषा ही व्याकरणशुद्ध असते. म्हणून ती भाषा हें जर शुद्धाशुद्धतेचें माप असें सामान्यतः घेऊन चालावयाचें तर पद्याच्या सोयीकरितां उपयोगांत आणलेले अपवाद हे कांहीं म्हटलें तरी अपवादच होत, ही जाणीव ठेवून पद्यकारांनीं होतां होई तो हे अपवाद टाळावे आणि जो पद्यकार अशा अपवादांचा स्वीकार आपद्धर्म म्हणूनहि अल्पात अल्प करील तो स्तुतीस अधिक पात्र होईल."

# मात्रा-गण-विचार

मराठी छंदःशास्त्रावर ग्रंथ लिहावयाचा म्हणजे त्यांत मुख्यतः मात्रा-वृत्ताबद्दलच विवेचन पाहिजे. अक्षर-गण-वृत्तें (उ. वसंततिलका, मालिनी, शार्दूलविक्रीडित, शिखरिणी वगैरे) हीं संस्कृतांतून प्रायः मराठींत आलीं असल्यानें त्यांची माहिती संस्कृत छंदः शास्त्रावरून देण्यापलीकडे अधिक कांहीं कार्य करावयास नको. मात्रा-वृत्तें (उ. आर्या, वैतालीय, औपच्छंदसिक वगैरे) संस्कृतांत थोडींच आहेत व त्याबद्दल विवेचन फारसें नाहीं. अलीकडील मराठी कवितेंत मात्रावृत्तांची वाढ पुष्कळच झाली असल्यानें मात्रा-वृत्तांचे प्रकार व त्यांचीं लक्षणें सांगणें हें मोठेंच अवघड काम आहे. प्राध्यापक माधवराव पटवर्धन यांनीं आपल्या छंदो-रचना पुस्तकांत मात्रा-वृत्ताबद्दल (जातीबद्दल) बरीच उद्बोधक चर्चा करून मात्रा-वृत्तांचीं लक्षणें बांधण्याचा दांडगा प्रयत्न केला असला, तरी तो निर्दोष व पूर्ण झाला आहे असें मात्र नाहीं.

छंदोरचनेंतील 'आरती' 'गीति' व 'साकी' यांच्या लक्षणां-बद्दल चर्चात्मक लेख मी यापूर्वी लिहिलेले आहेत. प्रस्तुत लेखांत मात्रा-गणाविषयीं कांहीं तात्त्विक विचार करण्याचें योजिलें आहे. पूर्वीच्या लेखांच्या दृष्टीनें या लेखाचा विषय कांहींसा निराळा आहे.

अक्षरगणवृत्तांची माहिती देतांना प्रथम त्र्यक्षरी आठ गण (म, य, र, स, त, ज, भ, न) कोणते हें सांगून त्या आधारें अक्षर-गणवृत्तांचीं लक्षणें स्पष्ट करावीं लागतात. याच पद्धतीला अनुसरून मात्रावृत्तांचीं लक्षणें सांगणें उपयुक्त होईल. संस्कृत छंदःशास्त्रकारांनीं अक्षरगणाप्रमाणें मात्रा-गण चतुर्मात्रिक (म, स, ज, भ, न) पांच प्रकारचे दिले आहेत; पण त्या गणांचा उपयोग करून आर्येशिवाय कोणत्याच मात्रा-वृत्तांचीं लक्षणें सांगितलेलीं

दिसत नाहींत. कै. परशुरामपंत तात्या गोडबोले यांनीं वृत्तदर्पणांत वरील मात्रा–गण दिले आहेत; परंतु ते केवळ उल्लेखिले आहेत एवढेंच! त्याचा उपयोग पुढें कोठेंच दाखविला नाहीं. प्रो. पटवर्धन यांनीं छंदोरचना पुस्तकांत पूर्वाचार्यांचे वरील मात्रा–गण स्वीकारले नसून त्यांनीं नवीनच चतुर्विध गण निर्माण करून ते भृंगावर्तनी, पद्मावर्तनी, हरावर्तनी व अग्न्यावर्तनी अशा नांवांनीं संबोधिले आहेत.

ही सर्व परिस्थिति विचारांत घेतां मात्रा–गण कोणते मानावेत व किती मानावेत असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होत असून त्या मात्रा–गणांच्या द्वारें मात्रा–वृत्तांचीं लक्षणें सांगणें आवश्यक आहे किंवा नाही याहि प्रश्नाचा विचार करणें क्रम–प्राप्त आहे.

'गण' या शब्दाबद्दल प्रथमतः थोडा खुलासा करावयास पाहिजे. पूर्वाचार्यांनीं मात्रा–गण सांगितले आहेत, तेव्हां त्यांना 'गण' याचा जो कांहीं विशिष्ट अर्थ अभिप्रेत असेल असें वाटतें, त्या अर्थानें प्रो. पटवर्धन यांनीं 'गण' हा शब्द वापरलेला नसून 'आवर्तन विभाग' या अर्थी गण हा शब्द त्यांनीं उपयोगांत आणलेला दिसतो. "गण म्हणजे चरणांचा स्वाभाविकपणें पडणारा भाग होय." असा अर्थहि छंदोरचना पान ८७ यांत त्यांनीं दिलेला आढळतो, पण तो संदिग्ध आहे. त्यांच्या म्हणण्याचा विचार करतां आवर्तन व गण हे दोन शब्द समानार्थक आहेत काय अशी शंका येत असून दोन्हीच्या अर्थाचा घोटाळा झालासा वाटतो. आवर्तन व गण हे दोन शब्द वास्तविक भिन्नार्थक मानले पाहिजेत व आवर्तनाच्या पोटांत दोन अथवा अधिक गण येऊं शकतात. आवर्तनाहून 'गण' हा शब्द कसा भिन्न आहे, याची कल्पना आणून देण्यासाठीं आपल्याला 'यति' बद्दल थोडाबहुत विचार करावा लागेल.

यतीची व्याख्या "यतिर्जिव्हेष्ट विश्रामः" अशी पूर्वाचार्यांनीं केली आहे. प्रो. पटवर्धन हे पान ६३ यांत "पद्य सलगपणें

आणि लयानुरोधानें वाचीत असतांना जो न्यूनाधिक विराम कांहीं ठिकाणीं घ्यावाच लागतो, त्याला ‘ यति ’ म्हणतात. ” तसेंच पुढें पान ३५२ यांत ज्या ठिकाणीं शब्द–समाप्ति वा पद–समाप्ति न झाल्यास रचना कर्णकटु लागते तेथें यति आहे असें समजावें किंवा जेथें एका मात्रेचाहि विराम नसतो पण म्हणतांना स्वाभाविकपणेंच खटका पडतो तेथें यति मानावयास पाहिजे असा विशेष खुलाशाचा दुसरा अर्थ त्यांनीं दिला आहे. यांतील कोणत्याहि अर्थानें यति समजला तरी आवर्तन विभागाच्या पोटांत यति संभवतो इतकी गोष्ट कोणालाहि सामान्यपणें कळून येईल. कारण, सहा मात्रांच्या किंवा आठ मात्रांच्या आवर्तनाचा मध्यंतरीं खटका वा विराम न घेतां उच्चार करतां येणें शक्यच नाहीं. अशी वस्तुस्थिति असतां प्रो. पटवर्धन यांनीं भृंगावर्तनी, पद्मावर्तनी इत्यादि मात्रावृत्तांचीं जीं लक्षणें दिलीं आहेत त्यांत आवर्तनांतील पोटयतीचा उल्लेख कोठेंच केला नाहीं. सहा मात्रांच्या आवर्तनाचा गट, आठ मात्रांच्या आवर्तनाचा गट, या नात्यानें गटाला ‘ गण ’ असें त्यांनीं म्हटलेलें दिसतें; पण येथेंच छंदःशास्त्रदृष्ट्या दोष उत्पन्न झाला आहे. तालशास्त्रदृष्टीनें आवर्तन याचा अर्थ पूर्वींच निश्चित आहे व तालाचा विचार करतां आवर्तनाच्या पोटांत एक अथवा अनेक यति संभवतात, इतकी सामान्यतः पटणारी साधी गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे असें म्हणणें ओघानेंच प्राप्त होतें कीं, आवर्तनाहून गण शब्द भिन्न असून आवर्तनाच्या पोटांतील यति पाहून जे विभाग पडतील त्या त्या विभागाला गण म्हणावें.

अक्षर–गणवृत्तांचीं लक्षणें ज्या त्र्यक्षरी गणानीं पूर्वाचार्यांनीं सांगितलीं आहेत, ते त्र्यक्षरी गण कोणत्या तत्त्वावर ठरविले याची उपपत्ति कांहीं असो; परंतु गणांच्या द्वारानें लक्षणें सांगण्यांत शिकणारांची मोठीच सोय पूर्वाचार्यांनीं केली आहे यांत संशय नाहीं. परंतु ही सोयीची पद्धत मात्रावृत्ताचे बाबतींत प्रो. पटवर्धन यांनीं अवलंबिली नाहीं. त्यांनीं दिल्याप्रमाणें लघुगुरूचीं चिन्हें लक्षांत

ठेवणें कठिणच आहे. म्हणूनहि मात्रा गणाचा विचार आवश्यक वाटतो.

येथपर्यंत विवेचन केल्याप्रमाणें आवर्तनाच्या पोटांत यति संभवतो व त्या यतीच्या दृष्टीनें आवर्तनाचे जे भाग पडूं शकतील त्या त्या विभागास गण म्हणतां येईल. इतकें ठरल्यावर आतां कोणत्या मात्रांचे किती गण ठरवावेत याचा विचार करूं.

आवर्तनाच्या गटाला गण म्हणणें कसें चूक * आहे हें वरील विवेचनांत आलेंच असल्यामुळें प्रो. पटवर्धन यांची भृंगावर्तनी, पद्मावर्तनी गण-योजना निरुपयोगी ठरत असल्याबद्दल निराळें सांगण्याची जरूरच नाहीं. पूर्वाचार्यांनीं चतुर्मात्रिक पांच गण सांगितले आहेत, ते उपयुक्तच आहेत. परंतु तेवढ्यानें सर्व मात्रावृत्तांचीं लक्षणें सांगतांना निर्वाह होणार नाहीं. कसे तें पाहूं.

भृंगावर्तनी जातींतील खालील दोन पद्यें उदाहरणाकरितां घेऊं.

( १ ) लग्नाला जातो मी द्वारकापुरा ।
देतो निज भगिनि राम कौरवेश्वरा ॥ —सौभद्र

( २ ) बघिन स्वप्निं जरि तिला ।
नये झोंप कधि मला ।
पडुनि चित्र दृष्टिला ।
जरी करिन शांतिला ॥ —शाकुंतल

---

* टीपः— श्री. वाळाचार्य खुपेरकर शास्त्री यांनीं लोकशिक्षण मासिकांत छंदोरचनेचें परीक्षण केलें आहे त्यांत त्यांनीं खालीलप्रमाणें मत दिलें आहे.

" गण म्हणजे चरणाचा स्वाभाविकपणें पडणारा भाग होय " अशी गणाची एक नवीनच व्याख्या केली आहे. ही गणाची नवीन बनवलेली व्याख्याच अत्यन्त सदोष वाटते. × × × ×

पद्याच्या रूढ चालीवरून छंदःशास्त्रकार यति ठरवितात. चाल बदलली म्हणजे यति बदलेल.

छंदोरचनाकारांच्या गण आणि यति यांच्या व्याख्यांमध्यें तात्पर्याच्या दृष्टीनें कांहींच भेद दिसत नाहीं.

या दोन्ही पद्यांत षण्मात्रक आवर्तनाचे विभाग आहेत हें स्पष्ट करून सांगण्याची जरुरी नाहीं. यांतील प्रत्येक आवर्तनाचे गण सांगावयाचे झाल्यास दोन प्रकार संभवतात. पैकीं ' लग्नाला ' या पद्यांतील आवर्तनाचे दोन मात्रांचा एक गण व चार मात्रांचा एक गण असे गण पाडावे लागतील. केवळ चतुर्मात्रिक गणांनीं गणमोजणी करतांच येणार नाहीं. म्हणजे चतुर्मात्रिक गणाच्या जोडीला द्विमात्रिक गण घ्यावे लागतात. ' बघिन स्वप्निं ' या दुसऱ्या पद्यांत तीन तीन मात्रांचेच सर्व गण पाडावें लागतील. यामध्यें चतुर्मात्रिक गण मुळींच येत नाहीं. *

भृंगावर्तनीप्रमाणें पद्मावर्तनी, हरावर्तनी अथवा अग्न्यावर्तनी यांपैकीं कोणत्याहि जातीची पद्य–रचना घेतली तरी केवळ चतुर्मात्रिक गणाच्या द्वारें पद्याचें लक्षण सांगतां येणार नाहीं. पूर्वींच्या चतुर्मात्रिक पांच गणांखेरीज त्रिमात्रिक आणि द्विमात्रिक गणहि मानावे लागतील हें वरील उदाहरणावरून स्पष्ट होणार आहे. या बाबतींत श्रीयुत गोविंदराव खासगीवाले यांनीं दिंडीविषयक लेखांत तालशास्त्रदृष्ट्या मात्रा–गणाबद्दल जें नवीन तत्त्व मांडलें आहे, तें विचारार्ह आहे. त्यांच्या मतावरून पाहतां एकंदर मात्रा–गण दहा ठरतील. पैकीं चतुर्मात्रिक पांच गण पूर्वींचे असून शिवाय त्रिमात्रिक तीन गण आणि द्विमात्रिक दोन गण असे सर्व गण मिळून दहा गण होतात. त्यांचा विशेष खुलासा खालीं देत आहे.

पूर्वींचे चतुर्मात्रिक पांच गण वृत्तदर्पणांतील परिभाषेप्रमाणें—

---

* चतुर्मात्रिक व त्रिमात्रिक गणांचें संमिश्र उदाहरण द्यावयाचें झाल्यास दिंडी पद्याचें प्रसिद्ध आहे. नमुन्याकरितां दिंडीची एक ओळ घेऊं

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| " ऐक | राया | तूं | थोर | दया— | सिंधू |
| ३ | ४ | २ | ३ | ३ | ४ |

या ओळींत प्रत्येक शब्दाखालीं वर लिहिल्याप्रमाणें त्या त्या गणाच्या मात्रा अंकानें निर्दिष्ट केल्या आहेत. दिंडी पद्यावरून त्रिमात्रिक गणाची आवश्यकता अधिक स्पष्टपणें कळून येणारी आहे.

| पूर्वीचें गणाचें नांव | नवें नांव | गणाचा लघुगुरूक्रम | गणाचा शब्द |
| --- | --- | --- | --- |
| १ म गण | "व" गण | दोन गुरू | वाणी |
| २ स गण | पूर्वीचें नांव कायम | लघु लघु गुरू | सविता |
| ३ ज गण | | लघु गुरू लघु | जयन्त |
| ४ भ गण | | गुरू लघु लघु | भास्कर |
| ५ न गण | "क" गण | चारहि लघु | कुलगुरू |

सदर गणांचीं नांवें त्र्यक्षरी गणांप्रमाणें ठेविलीं आहेत. परंतु मात्रा-संख्या दृष्टया सदरपैकीं स गण, ज गण, आणि भ गण हे तीन गणच समान आहेत. 'म' गण आणि 'न' गण हे त्र्यक्षरी गण अनुक्रमें सहा मात्रांचे व तीन मात्रांचे आहेत. तेव्हां तीच नांवें चतुर्मात्रिक गणास कायम ठेविल्यास घोंटाळा होण्याचा संभव असल्यानें वरील 'म' गणास 'व' गण आणि 'न' गणास "क" गण अशीं नवीन नांवें दिलीं आहेत. ती निःसंदिग्धपणाचे दृष्टीनें उपयुक्त ठरतील.

त्रिमात्रिक तीन गण—

| गणाचें नांव | लघुगुरूक्रम | गणाचा शब्द |
| --- | --- | --- |
| १ न गण | तीनहि लघु | नमन |
| २ ई गण | गुरू लघु | ईश |
| ३ उ गण | लघु गुरू | उमा |

वरील गणांपैकीं 'न' गण हें नांव त्र्यक्षरी गणांतील आहे. त्याच्या मात्रा तीनच असल्यानें तें त्रिमात्रिक गणांत कायम ठेवण्यास हरकत नाहीं. तेवढें नांव पूर्वींचें घेऊन 'ई' गण आणि 'उ' गण हीं दोन नांवें खासगीवाले यांच्या मताप्रमाणें नवीनच वापरलीं आहेत.

द्विमात्रिक दोन गण—

| गणाचें नांव | लघुगुरूक्रम | गणाचा शब्द |
| --- | --- | --- |
| १ ग गण | फक्त एक गुरू | गी |
| २ प गण | दोन लघु | पद |

या गणाचा त्र्यक्षरी गणाशीं कोणताच संबंध येत नसल्यानें त्या-बद्दल विशेष सांगण्याचें कारण नाहीं. यांपैकीं 'ग' हा गण एक-गुरूसंज्ञक असल्यानें तो स्वतंत्र न मानल्यासहि चालेल. तसेंच वरील नवीन गणांचीं नांवें अन्यप्रकारें कोणी ठरविल्यास त्यामुळेंहि तत्त्वाला कांहीं बाध येणार नाहीं. येथें फक्त त्रिमात्रिक व द्विमात्रिक नवीन गण मानणें उपयुक्त व सोयीचें आहे एवढें दाखविण्या-पुरताच उद्देश आहे.

आतां मात्रावृत्तांचीं लक्षणें सांगतांना वरील सर्व गण प्रत्येक वेळीं उपयोगी पडतील असें नाहीं. कांहीं गण आवश्यक म्हणून तर कांहीं गण वैकल्पिक म्हणून चालतील, आणि कांहीं गण येथें संभवनीय असूनहि त्याज्य म्हणून ठरतील. शिवाय कांहीं गण येण्याचा संभवच उत्पन्न होणार नाहीं हें निराळेंच. सदर गणां-संबंधीं आणखी सांगावयाचें झाल्यास सदरहू पैकीं 'ज' गण हा विशेष महत्त्वाचा आहे. त्याचें वैशिष्ट्य पूर्वाचार्यांच्या लक्षांत आलें होतें, असें पूर्वींच्या 'आर्या' वगैरे मात्रावृत्तांच्या लक्षणा-वरून दिसून येतें.

एकंदरीत मात्रा-गण कोणते मानावेत व किती मानावेत याचा बोध वरील विवेचनावरून होण्यासारखा आहे व त्या दृष्टीनें प्रो. पटवर्धन यांची आवर्तनाच्या सर्व मात्रा मिळून एकच गण मान-ण्याची योजना उपयुक्त ठरत नाहीं हेंहि उघड झालें आहे. चरणांतील नुसती मात्रासंख्या सांगून भागत नाहीं. त्याचप्रमाणें चरणांतील आवर्तन-विभाग, गटानें सांगितल्यानेंहि लक्षणाची पूर्तता होत नाहीं. अर्थात् सबंध आवर्तन-विभागाचे दर्शक असे 'प' 'भृ' गण दाखवून अथवा नुसत्या लघुगुरू चिन्हांनीं मात्रा-वृत्तांचीं (जातीचीं) लक्षणें सांगण्यापेक्षां आवर्तनाच्या दृष्टीनें ज्याना पोट गण म्हणता येतील अशा प्रकारचे वर जे मात्रा-गण निर्दिष्ट केले आहेत त्यांपैकीं अमुक गण अमुक ठिकाणीं

अवश्य यावेत, अमुक गण अमक्या जागीं विकल्पें चालतील व अमुक गण अमुक ठिकाणीं त्याज्य आहेत अशा खुलाशानें लक्षणें सांगण्याची पद्धत सोयीची, सुबोध व स्मरणसुलभ होईल.

पद्य–रचनेंत मात्रा–गणाप्रमाणेंच स्वतंत्र शब्द असले पाहिजेत असें नाहीं. कारण तसे शब्द मिळणें नेहमींच शक्य नाहीं. स्वतंत्र शब्द पडले नसले तरी योजलेल्या शब्दांचा उच्चार 'यति' सांभाळून करतां यावा अथवा 'यति' सांभाळण्याकरितां शब्द किंचित् तोडल्यासारखा म्हणावा लागल्यास त्यामुळें अर्थहानि वा कर्णकटुत्व उत्पन्न होऊं नये म्हणजे पुरें. या बाबतींत प्रो. पटवर्धन यांनींच पान ३५३ यांत सांगितल्याप्रमाणें असेंहि म्हणतां येईल कीं गणान्तीं पद–समाप्ति न झाली तरी अक्षरसमाप्ति मात्र व्हावयालाच हवी. एखाद्या गणाची अन्त्य मात्रा आणि पुढील गणाची आद्य मात्रा मिळून एक द्विमात्रिक गुरू अक्षर चालणार नाहीं किंवा गणान्तींची मात्रा 'पराश्रिता' असूं नये, असें पूर्वाचार्यांच्या भाषेंतहि सांगतां येईल.

असो ! आवर्तनांतील 'यति' आणि पोटगण यांचा बोध प्रो. पटवर्धन यांच्या जाति–लक्षणावरून होत नसल्यामुळें त्यांचा सर्व जाति–विचार घोंटाळ्याचा होऊन बसला आहे. वर जे मात्रा–गण दिले आहेत, त्यांची योजना करून मात्रावृत्ताचीं लक्षणें बनवून सांगणें शक्य आहे व तें सोयीस्कर होईल असें खासगीवाले यांच्याप्रमाणें मलाहि वाटतें. पंडित शिवरामशास्त्री शिंत्रे यांनीं 'सार्थ पिंगल छंदःसूत्र' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं प्राकृत मात्रा–वृत्तांच्या लक्षणांसंबंधीं अभिप्राय दिला आहे. तो आमच्या म्हणण्यास पुष्टिकारक असल्यानें येथें उद्धृत करून हा लेख पुरा करतों.

चौथ्या अध्यायांत मात्रावृत्तांचें विवेचन केल्यावर ते म्हणतात कीं, " हीं ( आतांपर्यंत ) दिग्दर्शन केलेलीं मात्रावृत्तें साकी, दिंडी, दोहा, पदें वगैरे सर्व प्राकृत प्रसिद्ध वृत्तांचीं उपलक्षकच

होत. म्हणून गण व मात्रा यांच्या नियमांनीं दिंडी, साकी, व इतर प्राकृत पदें यांचींहि लक्षणें पठणाच्या सोयीप्रमाणें कल्पना करून बांधावीं. ”

ज्ञानप्रकाश ता. १६ जून १९३९

---

**टीपः**—नागपूर महाराष्ट्रसाहित्य संमेलन रिपोर्टमध्यें सौ. शारदाबाई परांजपे यांचा लेख आहे त्यांत त्यांनीं गणासंबंधीं खालील विचार प्रकट केलेले आहेत.

“ साकी, दिंडी व संगीत चालीवरील पद्यें हीं मात्रा–वृत्तांत असून श्लोक गण–वृत्तांत पडतात. वृत्तांत जर अक्षरांची आणि मात्रांची परिसंख्या असते तर मात्रावृत्तांत निव्वळ मात्रांचाच हिशेब ठेवावयाचा असतो; तरीसुद्धां हें विसरून चालावयाचें नाहीं कीं, मात्रावृत्तांत किंवा संगीत पद्यांतसुद्धां म्हणण्याच्या पद्धतींप्रमाणें मात्रा–गण पडलेले असतात. X X X जेथें ऱ्हस्व अक्षर असावयास पाहिजे तेथें दीर्घ अक्षर घालणें व दीर्घाच्या ठिकाणीं ऱ्हस्वाची योजना करणें हेंसुद्धां संगीतांत नियमबाह्य ठरतें. कारण असें करण्यानें पद्याची चाल जरी चुकत नसेल तरी भलत्या ठिकाणीं शब्द तुटून यतिभंग होतो, व त्यामुळें श्रोत्यांचे मनाचा रस–भंग होतो. गणवृत्तांत व मात्रावृत्तांत फरक असेल तर इतकाच आहे कीं, मात्रावृत्तांतील गण चुकला तरी तो ठळकपणें लोकांच्या नजरेला येत नाहीं.”

**टीपः**—प्रो. माधवराव पटवर्धन हे चिन्हांनीं लक्षणें देतात परंतु पंडित शिंत्रे शास्त्री यांनीं नमुन्याकरितां उदाहरणें देऊन गणांनीं लक्षणें सांगावींत असें म्हटलें आहे.

“ हल्लीं प्रचलित असलेलें आनंदगीत ( प्रो. माधवराव “ आनंद कंद ” म्हणतात ) व गज्जल ( प्रो. माधवराव “ वियद्‌गंगा ” म्हणतात ) यांचीं सूत्रें व वृत्तवर्णिका ( प्रस्तार ) खालीं दिल्याप्रमाणें होतील.

“ आनंदं तरगाः ” S S I S I S S

“ गज्जलं यरगगाः ” I S S S I S S S

याचप्रमाणें सर्व अभिनव वृत्तांचा सूत्रभाषेनें संग्रह करितां येतो.

( सार्थ पिंगल छंदः सूत्र उपोद्‌घात पान ७. )

# ' भूपति ' जाति-लक्षण

मात्रा-गण कोणते मानावेत व किती मानावेत याबद्दल चर्चात्मक एक लेख कांहीं दिवसांपूर्वी ज्ञानप्रकाशमध्यें प्रसिद्ध केला आहे. प्रस्तुत लेखांत ' भूपति ' या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या मात्रा-वृत्ताच्या लक्षणांविषयीं विवेचन करण्याचें योजलें असलें तरी त्या बरोबरच चतुर्मात्रिक, त्रिमात्रिक व द्विमात्रिक मात्रा-गणांची उपयुक्तता आणखी एकवार विशद करून दाखविण्याचाहि हेतु आहे.

कै. गोडबोले यांच्या वृत्त-दर्पणांत ( आवृत्ति २२ वी ) ' भूपति-वैभव ' याचें लक्षण म्हणून सांगितलें आहे तें असें:—

' या छंदाच्या चरणांत बावीस मात्रा असतात, दहाव्या मात्रे-वर व पादान्तीं यति असतो. '

हें लक्षण अपुरें व सदोष आहे. वृत्तदर्पणांतील आणखी कांहीं मात्रा-वृत्तांचीं लक्षणें अशींच अपुरीं व सदोष असलेलीं दिसून येतात. तूर्त आपणास सदर ' भूपति ' या वृत्ताबद्दलच मुख्यतः विचार कर्तव्य आहे.

सदर लक्षणांत चरणांतील दहाव्या मात्रेवर फक्त यति सांगून चरणाचे दोन विभाग दाखविले आहेत. परंतु आरंभींच दुसऱ्या मात्रेवर एक यति असून पुढें दहाव्या मात्रेवर यति आहे तो दुसरा आहे. चरणाची नुसती मात्रासंख्या भरून जातिरचना योग्य झाली असें म्हणतां येत नाहीं, हें स्पष्ट होण्यासाठीं प्रो. जोग यांनीं उदाहरणादाखल दिलेले ' भूपति ' वृत्तांतील दोन चरण पुढें देत आहे.

॥ ठेवुनि मन केलें

उघडे हलकें माझें ॥

॥ वदलों त्या हो मज
ध्येयपथीं सांगाती ॥

वरील चरणांत दहाव्या मात्रेवरील यति साधला आहे. म्हणजे त्या ठिकाणीं शब्द पूर्ण केले आहेत व चरणाच्या एकंदर बावीस मात्राहि भरपूर भरल्या आहेत असें असून दुसऱ्या मात्रेवर यति घेण्यासारखी रचना नसल्यामुळें सदर दोन्ही चरण सदोष झाले आहेत, हे ‘ भूपती ’च्या रूढ चालीवर सदर दोन चरण म्हणून पाहिले असतां कोणासहि कळून येईल. अर्थात् दुसाऱ्या मात्रेवर यति सांगणें आवश्यक होतें, तो न सांगितल्यामुळें सदर लक्षणांत मोठा दोष राहून गेला आहे.

सदर वृत्त अष्टमात्रिक आवर्तनाचें असल्यामुळें आवर्तन दृष्ट्या चरणाच्या एकंदर बावीस मात्रांचे विभाग पडतात ते खालील-प्रमाणें:—

२ । ८ । ८ । ४

प्रो. माधवराव पटवर्धन यांनीं असेच विभाग दाखविले आहेत. सदर विभाग मान्य केले तरी त्या त्या विभागांत लघुगुरू अक्षरें कोणत्या क्रमानें पडलीं तर चालतील व कोणत्या क्रमाचीं चालणार नाहींत याचाहि खुलासा लक्षणांची पूर्तता होण्याकरितां सांगावयास पाहिजे. परंतु तो खुलासा वर दिलेल्या लक्षणांत केलेला नाहीं.

लघुगुरूचा विशिष्ट क्रम कां लागतो याची स्पष्ट कल्पना आणून देण्याकरितां वृत्तदर्पणांत दिलेल्या उदाहरणांतील दोन चरण थोडे शब्द फिरवून घेऊं.

शुद्ध चरण:—

॥ नव पुष्प उगवलें
क्षणांत परि कोमजलें ॥
॥ तें बहार सरतां
सुकुनी गळुनी गेलें ॥

शब्द फिरवून

॥ नव उगवलें पुष्प
क्षणांत परि कोमजलें ॥
॥ ते सरतां बहार
सुकुनी गळुनी गेलें ॥

वरील फिरविलेल्या चरणांतील ‘ उगवलें पुष्प ’ आणि ‘ सरतां बहार ’ हे शद्व नियमाप्रमाणें अष्टमात्रिक असूनसुद्धां नीट म्हणतां येत नाहींत. यावरून आवर्तन अष्टमात्रिक असो अथवा षण्मात्रिक असो आवर्तनाच्या पोटांतील विशिष्ट लघुगुरूक्रम म्हणजेच मात्रागण साधावे लागतात हें उघड होईल.

संस्कृत छंदःशास्त्रकारांनीं मात्रावृत्तांना उपयुक्त असें चतुर्मात्रिक मात्रागण पांच सांगून ठेविले आहेत.

( – – म गण, ⏑ ⏑ – स गण, ⏑ – ⏑ ज गण, – ⏑ ⏑ भ गण, ⏑ ⏑ ⏑ ⏑ न गण ) व हेच गण वृत्तदर्पणांतहि दिले आहेत. या गणांचा उपयोग फक्त गीति व साकी यांचीं लक्षणें सांगतांना वृत्तदर्पणकारांनीं केला आहे; त्याप्रमाणें ‘ भूपति ’ वृत्ताचें लक्षण सांगतांना सदर चतुर्मात्रिक गणांचा उपयोग करितां येईल; परंतु त्यावरच सर्व निर्वाह मात्र होणार नाहीं.

चतुर्मात्रिक गणांच्या मोडणीनें ‘ भूपती ’ चे एकंदर बावीस मात्राचे गण पडूं शकतात ते म्हणजे, प्रथम दोन मात्रांचा एक गण व पुढें चार चार मात्रांचे पांच गण असे सहा गण पडतात. पैकीं तिसऱ्या व पांचव्या गणांच्या ठिकाणीं ‘ ज ’ गण चालत नाहीं. उदाहरणार्थ पहा—

॥ ऋतु[१] येता[२] वसंत[३] सकला[४] प्रमोद[५] होई[६] ॥

या चरणांत ‘ वसंत ’ व ‘ प्रमोद ’ हे ‘ ज ’ गणाचे शब्द तिसऱ्या व पांचव्या गणाच्या ठिकाणीं पडल्यानें म्हणतांना अडथळा होतो. अर्थात् सदर ठिकाणीं ‘ ज ’ गण त्याज्य आहे. शेवटच्या सहाव्या गणाचें ठिकाणीं ‘ स ’ गण किंवा ‘ म ’ गण

पाहिजे. इतके विशिष्ट गण संभाळून इतरत्र कोणताहि चतुर्मात्रिक गण चालेल.

ही व्याख्या चतुर्मात्रिक गणांच्या द्वारें सांगितली. आतां केवळ चतुर्मात्रिक गणावरच सर्व निर्वाह होणार नाहीं, असें जें वर विधान केलें आहे तें कसें योग्य, याचा खुलासा करूं.

वृत्तदर्पणांत उदाहरणाकरितां दिलेल्या चरणांपैकींच

॥ हा देह आपला
क्षणभंगुर टिकणारा ॥
॥ क्षण एक संपता
अंधकारही झाला ॥

हे दोन चरण विचारार्थ घेतले तर या चरणांतील ‘ देह आपला ’ ‘ एक संपता ’ या अष्टमात्रिक शब्द-विभागाचे चतुर्मात्रिक गण पाडतांच येत नाहींत, ( ‘ देह ’ या शब्दाच्या तीन मात्रा, ‘ देह आ ’ असा तुकडा घेतला तर त्याच्या पांच मात्रा, तसेंच ‘ एक ’ या शब्दाच्या तीन मात्रा, ‘ एक सं ’ या तुकड्याच्या पांच मात्रा, याप्रमाणें मात्रा भरतात. म्हणजे चार मात्रांची बेरीज होईल अशीं लघुगुरू अक्षरें क्रमानें आलेलींच नाहींत. ) हें उघड दिसतें. म्हणून अशा प्रसंगीं त्रिमात्रिक ( – ⌣ गुरूलघु, ⌣ – लघु गुरू, ⌣ ⌣ ⌣ तीन लघु, हे त्रिमात्रिक गण ) आणि द्विमात्रिक ( – एक गुरू किंवा ⌣⌣ दोन लघु हे द्विमात्रिक गण ) गणच पाडावे लागणार आहेत.

आतां यानंतर प्रो. माधवराव पटवर्धन यांच्या छंदोरचनेंतील ‘ भूपती ’चें लक्षण घेऊन त्यांत कांहीं अपुरेपणा अथवा दोष आहे कीं काय हें पहावयाचें.

प्रो. पटवर्धन यांचें ‘ भूपती ’चें लक्षण असेः—

$[\overset{२}{-} \mid \overset{८}{\text{प}} \mid \overset{८}{\text{प}} \mid \overset{२}{-} \mid \overset{२}{+}]$

या लक्षणांतील प्रत्येक चिन्हाची मात्रासंख्या कळण्यासाठीं प्रत्येक चिन्हाचें डोक्यावर त्यांची मात्रा-संख्या मांडली आहे.

तसेंच ' प ' चिन्हाचा अर्थ ( – – – – ) ( ⏑ – – ⏑ – – ) ( ⏑ – – – ⏑ – ) ( – ⏑ – – ⏑ – ) ( – – – ⏑ – ⏑ ) या पांच प्रकारांपैकीं कोणताहि अष्टमात्रिक विभाग ' प ' चिन्हाच्या ठिकाणीं चालतो असा समजावयाचा आहे.

वरील प्रकारांपैकीं पांचवें प्रकारांत ( – – – ⏑ – ⏑ ) शेवटीं ' ज ' गण असल्यानें त्या प्रकारची शब्दरचना चालत नाहीं, हें पूर्वीं उदाहरणासहित दाखविलेंच आहे.

इतर प्रकारांसंबंधानें आक्षेप घेऊन असें म्हणतां येईल कीं, त्यांचा लघुगुरू–क्रम योग्य असला तरी त्यांत यति कोठें आहे, याची स्पष्टता करून ठेविलेली नाहीं, ही महत्त्वाची उणीव आहे. पोटयति न पहातां शब्द–योजना केल्यास ती रचना चुकीची होते, ही गोष्ट उदाहरणानेंच स्पष्ट करितों.

निज ही तनू नसे
चिरकालिक टिकणारी ॥

या चरणामध्यें ' ही तनू नसे ' हा अष्टमात्रिक विभाग प्रो. पटवर्धन यांच्या चवथ्या प्रकारांत नीट बसतो म्हणजे त्यांनीं सांगितलेला योग्य असा ' प ' गण साधलेला आहे. परंतु सदर चरण सरळपणें मुळींच म्हणतां येत नाहीं. तेव्हां असें कां होतें ? याचा विचार केला तर पोट–यतीच्या दृष्टीनें शब्द योग्य ठिकाणीं पडले नाहींत, हेंच अनुमान निघूं शकतें. ' सूत्रोक्त यतीशिवाय पद्य म्हणण्यास व ऐकण्यास सुखकारक असे अधिक यति ( जुन्या व नव्या ) वृत्तांतून मानण्यास हरकत नाहीं, ' असा अभिप्राय श्री. शिंत्रेशास्त्री यांनीं दिला आहे, तो येथें विचारांत घेण्याजोगाच आहे.

वरील एकंदर विवेचनावरून असें निष्पन्न होतें कीं, ' भूपति ' सारख्या ' पद्मावर्तनी ' वृत्ताचें लक्षण केवळ चतुर्मात्रिक गणांनीं सर्वच प्रसंगीं सांगतां येणार नाहीं. प्रो. पटवर्धन यांच्याप्रमाणें

अष्टमात्रिक आवर्तन-विभाग दाखवूनहि तें पूर्ण होत नाहीं. सदर ‘ भूपति ’ वृत्ताच्या चरणांतील दुसरा व तिसरा हे दोन विभाग मोठे म्हणजे अष्टमात्रिक आहेत व त्या विभागांतच पोटयतीचा प्रश्न येतो. त्याचा खुलासा म्हणजे त्यांत पोटयति चवथ्या मात्रेवर संभवतो किंवा तसा तो न संभवेल, त्या प्रसंगीं तिसऱ्या व सहाव्या मात्रेवर यति संभवतो. म्हणून लक्षण सांगण्यासाठीं चतुर्मात्रिक, त्रिमात्रिक व द्विमात्रिक गण आवश्यक व उपयुक्त ठरतात. ‘ भृंगावर्तनी ’ जातींतील दिंडीच्या चरणांत प्रथम त्रिमात्रिक व शेवटीं चतुर्मात्रिक असेच गण यावे लागतात, यावरून भृंगावर्तनी जातीलाहि सदर गणांचा उपयोग असल्याचें दाखवितां येतें.

सदर मात्रा–गणांनीं ‘ भूपती ’ चें लक्षण कसें सांगता येईल तें आतां पाहूं.

चरणाच्या चार विभागांत प्रत्येकीं अनुक्रमें मात्रा आहेत त्या:–

२ । ८ । ८ । ४

यांतील पहिल्या विभागांत दोन मात्रांचा एक गण पाहिजे, हें स्पष्टच आहे. दुसऱ्या व तिसऱ्या अष्टमात्रिक विभागांत चतुर्मात्रिक गण योजावयाचे झाल्यास त्यांतील प्रत्येक उत्तरार्धांत फक्त ‘ ज ’ गण चालणार नाहीं, त्याखेरीज कोणतेहि चतुर्मात्रिक गण चालतील. या दुसऱ्या व तिसऱ्या विभागांमध्यें त्रिमात्रिक व द्विमात्रिक गण सांगतां येतील; ते असे कीं, प्रथम त्रिमात्रिक दोन गण घेऊन पुढें द्विमात्रिक एक गण यावा. ( याच्याउलट म्हणजे प्रथम द्विमात्रिक एक गण व पुढें त्रिमात्रिक दोन गण चालत नाहींत. ) शेवटचा चवथा विभाग चार मात्रांचा आहे. त्या ठिकाणीं ‘ म ’ गण किंवा ‘ स ’ गण यावयास पाहिजे.

पोटयतीचा विचार करून सदर मात्रागण सांगितले आहेत. त्याबद्दल फक्त एकच खुलासा करून ठेवणें जरूर आहे कीं, गणाप्रमाणेंच स्वतंत्र शब्द पडले पाहिजेत असें नाहीं. तथापि जे शब्द

पडतील ते गणांच्या दृष्टीनें यति सांभाळून उच्चारतां येण्यासारखे असावेत व तशा उच्चारामुळें कर्णकटुत्व उत्पन्न न व्हावें व अर्थालाहि कांहीं वैगुण्य प्राप्त होऊं नये.

मात्रा-वृत्तांचीं लक्षणें चतुर्मात्रिक, त्रिमात्रिक व द्विमात्रिक गणांनीं सांगण्याची रीत विशेष उपयुक्त व अधिक सुबोध ठरेल हेंच निदर्शनास आणून देण्याचा या लेखाचा उद्देश असल्यामुळें नमुन्याकरितां ' भूपती ' हें मात्रा-वृत्त घेऊन वरील विवेचन केलें आहे. त्याचा विचार छंदःशास्त्रज्ञाकडून व्हावा अशी इच्छा प्रदर्शित करून वाचकांचा निरोप घेतों.

ज्ञानप्रकाश ता. २९।९।१९३९, ता. ६।१०।१९३९.

---

टीपः—छंदोलंकारकर्ते गणेश विष्णु देशपांडे यांनीं छंदोलंकार पुस्तक पान ९५ यांत " यति " संबंधीं विवेचन करतांना " भूपती " याच पद्याचें उदाहरण दिलें आहे. तसेंच तालाचाहि विचार केला आहे.

# ‘ छंदा ’चें स्थान स्वतंत्रच कां ?

सह्याद्रि मासिकाच्या डिसेंबर १९४० च्या अंकांत “ छंदोरचना नि छंदाचें स्थान ” या नांवचा एक लहानसा लेख श्रीयुत ना. ग. जोशी यांनीं लिहिला आहे. त्यांतील विषय विवाद्य आहे.

प्रो. पटवर्धन यांनीं पद्य–रचना ही वृत्त-जातिछंद:स्वरूप अशी त्रिविध मानली आहे. अक्षरगणनियत पद्य-प्रकार म्हणजे ‘ वृत्त ’ मात्रानियत पद्यरचना म्हणजे ‘जाति’ आणि केवळ अक्षरसंख्यानियत पद्य म्हणजे ‘ छंद ’ अशा संज्ञा देण्यांत आल्या आहेत. श्री. ना. ग. जोशी यांची शंका अशी आहे कीं, छंदांतील प्रत्येक अक्षर गुरूच समजण्याचें असल्यानें छंद हे वृत्तांना अधिक जवळचे आहेत. अर्थात् प्रो. पटवर्धन यांनीं छंदाचें जें स्थान ( स्वतंत्र ) ठरविलें आहे तें किंचित् तर्कदुष्ट आहे. छंद हे वृत्त आणि जाति यांच्यामध्यें तरी बसविले पाहिजेत किंवा वृत्तांचा एक विशेष प्रकार म्हणून तरी ते मानले पाहिजेत.

वरील शंका एका दृष्टीनें योग्य आहे, म्हणजे छंदामध्यें अक्षरसंख्या नियमित असून, प्रत्येक अक्षराचा दीर्घ उच्चार करावयाचा असल्यामुळें जितकीं अक्षरें त्याच्या दुप्पट मात्रा अशी वस्तुस्थिति निर्माण होते. आणि वृत्तामध्यें तर अक्षरसंख्या व मात्रासंख्या नियमित असते. तेव्हां छंद व वृत्त यांमध्यें तत्त्वतः भेद उरत नाहीं. हें उघडच ठरतें. आणि ह्याच कारणाकरितां छंद म्हणून निराळा प्रकार मानूं नये, असें श्री. ना. ग. जोशी हे म्हणतात. त्यांनीं दाखविलेली अडचण खरीच आहे. परंतु छंदांतील प्रत्येक अक्षराचा दीर्घ उच्चारच करावयाचा अथवा प्रत्येक अक्षर दीर्घ समजावयाचें हा जो नियम त्यांनी गृहीत धरला आहे तोच मुळांत मान्य करण्या-

सारखा नाहीं. तो नियम चमत्कारिक आहे. × त्या नियमाच्या बाबतींत प्रो. पटवर्धन यांच्याशीं श्री. ना. ग. जोशी हे सहमत दिसतात. परंतु सदर नियमच चूक मानल्यावर छंद म्हणून निराळा प्रकार दाखविण्याची जरूरी पडते असें मला वाटतें. म्हणून प्रो. पटवर्धन यांनीं निराळा प्रकार ठरविला, तो तसा असण्यास हरकत नाही.

अभंग, ओव्या इत्यादींची गणना छंदांत केली आहे. ही रचना वृत्त नि जाति, ह्या प्रकारांहून भिन्न आहे, याबद्दल वाद नाही. मात्र अभंग, ओव्या यांतील प्रत्येक अक्षराचा दीर्घच उच्चार केला जातो असा प्रत्यक्ष अनुभव नाहीं. अभंग, ओव्या ह्या बहुजन-समाजाच्या नित्य परिचयांतील आहेत. बायकामुळेंसुद्धां अभंग नि ओंव्या गावूं शकतात. तें त्यांचें गाणें ऐकल्यास प्रत्येक अक्षराचा सरसकट दीर्घ उच्चार त्यांच्याकडून केला जातो असें म्हणवत नाहीं. वादाकरितां तसा दीर्घ उच्चार केला, तरी तो कानाला गोड वाटणार नाहीं व माधुर्यपोषक होणार नाहीं. तो उच्चार अस्वाभाविक आहे. उच्चार कसा करावा या बाबतींत श्रीयुत न. चिं. केळकर यांचें मत विचारासाठीं पुढें ठेवतों. ते म्हणतात कीं, " अक्षर म्हटलें कीं, ऱ्हस्व किंवा दीर्घ असेल तसें उच्चारलें किंवा

---

× श्री. मो. स. मोने यांनीं प्रो. पटवर्धन यांच्या छंदाचे लक्षणावर आक्षेप घेतला आहे तो या बाबतींत विचारांत घेण्यासारखाच आहे. ' ज्ञानप्रकाश ' मध्यें " पद्य–प्रकाश " या पुस्तकावर अभिप्राय देतांना ते म्हणतात कीं,

" लगत्वभेदातीत प्रकाराला छंद म्हणतात " त्याचप्रमाणें " ज्या पद्यांत सारीं अक्षरें गुरूच मानावयाचीं असतात त्याला छंद म्हणतात " या व्याख्यांचें अवलोकन केल्यास एकदां " लघुगुरू नाहीं अशी अक्षररचना " असें म्हणावयाचें आणि नंतर पुनः " सारी अक्षररचना गुरूच मानावयाची " असें म्हणावयाचें, ही भाषा चमत्कारिक वाटते. तें सोडून दिलें तरी ' ओवी-अभंगा ' दिकांत सर्वच स्थळीं उच्चारणांत म्हणणारा मनुष्य सर्वच अक्षरें गुरू मानतो असें म्हणवत नाहीं.

लिहिलें पाहिजे हा निर्बंध टळत नाहीं; आणि हा निर्बंध राहील तोंपर्यंत ऱ्हस्व अक्षराचा उच्चार सोयीकरिता दीर्घ व दीर्घांचा ऱ्हस्व केला, तरी ती चूकच मानली पाहिजे; मग ती चूक विद्वानहि करो. चुकीला चूक म्हणूनच तिचा निर्देश केला पाहिजे. लघु किंवा गुरू अक्षरें हीं जशीं लिहिलीं जातात, तसाच त्यांचा उच्चार करणें हें शुद्ध व विहित मानलें, तर अक्षरगण किंवा मात्रागण यांच्याशिवाय तिसरा गण संभवत नाहीं. ”

वरील मतावरून पाहतां अक्षराचा उच्चार स्वाभाविकपणेंच केला पाहिजे. तो कृत्रिम करतां उपयोगी नाही, हें कोणीहि मान्य करील. सरसकट दीर्घच उच्चार प्रत्येक अक्षराचा बळेंच करावयाचा म्हटल्यास निरुपाय आहे. उच्चाराच्या बाबतींत कांही तरी नियम उभय पक्षीं मान्य असा धरूनच वाद अथवा चर्चा केली पाहिजे. नाही तर “ शिथिल रचना ” या शब्दाला कांही अर्थच राहणार नाही.

ओंव्या अगर अभंग तालावर गावयाचे झाल्यास कांही ठिकाणीं ऱ्हस्वाचा दीर्घ व दीर्घांचा ऱ्हस्व उच्चार केला जातो, नाही असें नाही. पण त्यालाहि मर्यादा पडते. सरसकट सर्वच अक्षरांचा उच्चार दीर्घ करतां येत नाहीं. सर्वत्र दीर्घ उच्चार केल्याशिवाय एखादा अभंग विशिष्ट तालांत बसत नसल्यास दीर्घ उच्चार करण्याची आपत्ति टाळून त्या अभंगांतील अक्षरास जमेल असा योग्य निराळा ताल लावणेंच श्रेयस्कर होय. तालाच्या दृष्टीनें अभंगाची रचना शिथिल असते. ज्यांत अक्षरसंख्येचेंसुद्धा बंधन पाळलेलें नाहीं, अशा ओव्या तर तालातीतच मानल्या पाहिजेत. उच्चाराच्या दृष्टीनें कांहीं मर्यादा संभाळूनच अभंग तालांत बसवून म्हणणें योग्य ठरतें. कोणताहि अभंग घे व वाटेल त्या तालांत बसव किंवा वाटेल त्या संगीत पदाच्या चालीवर म्हण, असा प्रकार केल्यास तें इष्ट ठरणार नाहीं. अभंग “ सताल ” आहेत असें कित्येकांचें मत आहे तेंच शास्त्रशुद्ध

नाहीं. जातिदृष्ट्या अभंगाची रचना पुष्कळ शिथिल असते इतकें तरी मान्यच केलें पाहिजे व म्हणून जातिरचनेहून भिन्न अशा अभंगादि रचनेस " छंद " या स्वतंत्र प्रकारांत मापलें पाहिजे हें ओघानेंच प्राप्त होतें.

प्रत्येक अक्षराचा उच्चार दीर्घ मानावयाचा म्हटला, तर अभंगादि रचनेची मात्रासंख्या नियमित झाली व तशी झाल्यानें त्यांची गणना वृत्तांत किंवा जातींत करावयास हरकतच राहत नाहीं, म्हणून श्री. ना. ग. जोशी यांना आलेली शंका त्यांच्या दृष्टीने बरोबर आहे. परंतु उच्चाराच्या बाबतींत वरील आमचें म्हणणें विचारांत घेतल्यास अभंगादि रचनेस स्वतंत्र स्थान द्यावें लागणारच. प्रो. पटवर्धन यांनीं कोणत्या कां कारणानें होईना, दिलेलें छंद हें नांव आमच्या दृष्टीनेसुद्धा असण्यास हरकत नाही, इतकेंच सुचवावयाचें आहे. वृत्त व जाति या प्रकारांहून तिसरा वर्ग करून त्यांत अभंगादि रचना निर्दिष्ट करावयास पाहिजे, यांत संशय नाहीं. आतां त्या तिसऱ्या वर्गास " छंद " म्हणा अगर आणखी कांही संज्ञा द्या, पण स्वतंत्र स्थान देण्यासारखी ती वेगळी पद्यरचना आहे ही गोष्ट सत्य.

——— सह्याद्रि फेब्रुवारी १९४१

# मुक्तछंद हें प्रगतीचें लक्षण काय ?

मुक्तछंदाविषयीं चर्चा पुष्कळ दिवस चालूच आहे. मुक्तछंदाची उपयुक्तता व शास्त्रीयता सिद्ध करतांना त्याचे अभिमानी समर्थनाच्या अभिनिवेशांत असेंहि विधान करतात कीं " मुक्तछंद हें प्रगतीचें लक्षण आहे " परंतु हें त्यांचें विधान मनाला पटण्यासारखें नसून धाडसाचेंच वाटतें म्हणून त्यासंबंधीं थोडक्यांत विवेचन येथें करण्याचें योजिलें आहे.

" मुक्तछंद हें प्रगतीचें लक्षण " याचा स्पष्टार्थ असा समजावा लागतो कीं, पद्यवाङ्मय प्रथमच निर्माण झालें तें अक्षरगणवृत्तांत म्हणजे ज्यांत लघुगुरूक्रमाचें व अक्षरसंख्येचें बंधन असतें अशा वृत्तात झालें. पुढें सोयीच्या व सवलतीच्या कारणास्तव मात्रा-वृत्तांत रचना होऊं लागली. त्यानंतर पुढें मात्रांचें बंधन सुटून अभंगादि अक्षर-छंद अस्तित्वात आले आणि आतां मुक्तछंदाचा मार्ग स्वीकारला जात आहे.

याप्रमाणें मुक्तछंदाच्या निर्मितीचा ऐतिहासिक क्रम ठरवावा लागतो व तसा ठरविला किंवा मानला तरच " मुक्तछंद हे प्रगतीचें लक्षण आहे " असें म्हणणें योग्य समजतां येईल.

परंतु वर जो क्रम सांगितला किंवा गृहीत धरला तो स्वाभाविक असेल असें विचारान्तीं वाटण्यासारखें नाहीं.

कोणत्याहि बाबतींतली समाजाची प्राथमिक अवस्था पाहिली तर ती बंधन-रहितच असते. उदाहरणार्थ, विवाहाची गोष्ट घेतली तर प्रथमतः स्त्रीपुरुषसंबंधांत कोणताच विधिनिषेध नव्हता. खाद्यपेयाचेविषयीं तीच अवस्था. पशुहिंसा करावी किंवा करूं नये हा प्रश्न रानटी अवस्थेंतून प्रगत झालेल्या समाजापुढें आलेला

आहे. व्याकरणशास्त्र निर्माण झालें तेंहि भाषेस स्थैर्य आल्यावरच. याच दृष्टीनें छंदःशास्त्राबद्दल नीट विचार केल्यास अगदीं प्रथमारंभीची पद्य-रचना "अक्षरछंद" स्वरूपाचीच असली पाहिजे. कदाचित् त्यावेळीं तालावर ( किंवा ठेक्यावर असें समजावें ) पद्य म्हटलें जात असल्यास त्याकरितां ऱ्हस्वदीर्घांची ओढाताण, अधिक असलेल्या अक्षरांच्या मात्रा कमी करण्याकरितां व कमी पडणाऱ्या मात्रा भरून काढण्यासाठीं उच्चारांतील ढिलाई वगैरे प्रकार अवलंबावे लागले असणारच. परंतु अशी शिथिल-रचना करणें समाज सुसंस्कृत झाल्यावर कमी होत जाते. प्राथमिक अवस्थेनंतर इतर बाबतींत जशी स्वाभाविक बंधनें पडूं लागतात त्याप्रमाणेंच पुढें पद्य-रचनेंत बरीच नियमबद्धता येऊन अक्षरगणवृत्तें व मात्रावृत्तें प्रचारांत आलीं असावींत.

प्रो. माधवराव पटवर्धन यांनीं याविषयीं आपला अभिप्राय थोडक्यांत दिला आहे तो असा:— "छंदःशास्त्राची घटना होण्याच्यापूर्वी ज्या कविता झालेल्या असतात त्यांत कवीनें उपरिनिर्दिष्ट स्वातंत्र्य घेतलेलें आढळून येतें परंतु अक्षराचें मात्रिकमापन निश्चित होऊन नागरभाषेचा प्रसार वाढला कीं, छंदोरचना नियमित व समाक्षरक होऊं लागते.

श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांनीं ( सह्याद्रि जून १९३७ ) असें म्हटलें आहे कीं, जातीपेक्षां वृत्त जुनें आणि वृत्तापेक्षांहि छंद जुना. कारण, लोक-गीतांतून छंदाचा उगम झाला आणि लोकगीतें हाच कोणत्याहि समाजांत अगदीं प्रथम निर्माण होणारा पद्य-प्रकार असतो.

आपले जुनें वाङ्मय जे वेद ते पाहिले असतां आरंभीं केवळ अक्षरछंद, पुढें अनुष्टुभासारखे धड अक्षरछंद नव्हे किंवा धड अक्षरगणवृत्त नव्हे अशा प्रकारचे मिश्र छंद किंवा वृत्तें व त्यानंतर शुद्ध अक्षरगणवृत्तांतील रचनेचा उगम वैदिक छंदांतून झाला असावा असें दिसतें. महाराष्ट्रीय ज्ञानकोशांत ( भाग ५ वा

पान १३६ ) यासंबंधीं माहिती मिळते ती अशी कीं, " अक्षरसंख्येच्या पायावर भारतीय छंदःशास्त्र रचलें गेलें. अक्षरसंख्या हीच प्राचीन छंदःशास्त्राचें मूलतत्त्व होय. मात्रांचा मुळींच हिशेब केला जात नव्हता. अक्षरांचा लघुगुरू असा भेद केला जात नव्हता. तर ती नुसती मोजलीं जात असत. ××× एक दोन अक्षरें कमी किंवा जास्त असल्यानें कांहीं बिघाड होत नाहीं असें ब-याच ठिकाणीं म्हटलें आहे.

वैदिक वाङ्मय सोडून महाकवि कालीदासादिकांचें अभिजात संस्कृत पद्यवाङ्मय विचारांत घेतलें तरी छंदोरचनेचें परिणत स्वरूपच दिसून येणार आहे."

आतां मराठीकडे वळूं. मराठीमधील "आद्य काव्य" म्हणून संबोधण्यांत येते ती ज्ञानेश्वरी ओवीछंदांत आहे. ज्ञानेश्वरींतील ओव्या पाहिल्या असतां त्यांतील चरणास अक्षरसंख्येचेंसुद्धां बंधन पाळलेलें दिसत नाहीं. ज्ञानेश्वरींतील ओव्या ह्या हल्लींच्या आवडत्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास मुक्तछंदच आहेत. ज्ञानेश्वरीनंतर आजपावेतों मराठींत फार मोठ्या प्रमाणांत विविध प्रकारची पद्यरचना झालेली आहे. त्यांपैकीं कांहीं आर्या, साकी, दिंडी, इत्यादि मात्रावृत्तांत असून वामनपंडितादिकांची रचना अक्षरगणवृत्तांतील आहे. भाषा—प्रभू मोरोपंतानें तर पद्यरचनेच्या अनेक करामती लीलेनें करून दाखविल्या आहेत. मराठी कवीवर्गापुढें पहिल्या पासूनच संस्कृत काव्यग्रंथ असल्यामुळें मराठी पद्यरचनेची स्थिति छंदःशास्त्रदृष्ट्या कांहीं अंशीं अनुकरणात्मक आहे असें वाटतें. संस्कृतप्रमाणें स्वाभाविक क्रमाची म्हणतां येण्यासारखी नाहीं. छंदःशास्त्राचा खरा विकास पहावयाचा झाल्यास संस्कृत पद्यवाङ्मयाकडेच वास्तविक दृष्टि द्यावयास पाहिजे.

मराठीमध्यें चालीवरील पद्यरचनेला आरंभ केव्हां झाला यासंबंधींचा शोध लावून प्रो. माधवराव पटवर्धन यांनीं आपल्या छंदोरचनेंत खुलासा केला आहे तो येथें देतों. ते म्हणतात कीं,

" ओवी, अभंग, आरती, घनाक्षरी वगैरे प्रकार मराठींत आले तेव्हां मराठींत लघुगुरू हा भेद नव्हता. त्यामुळें या छंदांना फक्त अक्षरसंख्येचें नियमन आहे. × × × × एकीकडे या छंदांत रचना चालू असतांना मीराबाई, कबीर इत्यादि उत्तर हिंदुस्थानांतील गीतकारांचा मराठी कवीवर परिणाम होऊं लागून चालीवरील पद्यरचनेला आरंभ झाला. एकनाथ हा महाराष्ट्रांतील पहिला मोठा गीतकार होय. × × × × × पुढें रामजोशी प्रभाकरादि शाहीरांनीं लोकप्रिय पोवाडे व लावण्या लिहिल्या. ती सारी रचना " जाती " तीलच आहे. या चालींचें पुनरुज्जीवन आण्णासाहेब किर्लोस्कर यांनीं केलें. किर्लोस्करापर्यंत छंदोरचना आर्ष आहे. परंतु गोविंदराव देवलांची पद्यें सुसंस्कृत आणि शुद्ध आहेत, (इतकेंच नव्हे तर) त्यांची रचना आदर्शभूत आहे. "

कसेंहि असो. एकंदरीत विचार करितां पद्याची मात्रावृत्तांतील अथवा अक्षरगणवृत्तांतील रचना ही प्रगत दशेंतील म्हणजेच नंतरची आहे असें म्हणावें लागतें. मग मुक्तछंद हें छंदःशास्त्रदृष्ट्या प्रगतीचें लक्षण कसें म्हणावयाचें ? माझे एक बुद्धिवादी स्नेही होते, ते वादविवाद करतेवेळीं प्रतिपक्षीयास वादांतील महत्त्वाच्या शब्दाची व्याख्या विचारून नेहमीं अडवीत असत. त्या गोष्टीची आठवण झाल्यानें व आतां खरोखरीच जरूर आहे म्हणूनहि असें विचारावेसें वाटतें कीं, तुमच्या प्रगतीची व्याख्या तरी काय आहे ?

मुक्तछंदांत रचना करणाराला कोणी नको म्हणत नाहीं व त्या रचनेंत काव्य असेल तर तें कोणीहि आनंदानेंच वाचील. कारण प्रस्तुत प्रश्न काव्यासंबंधीं नाहीं हें उघड आहे. मुक्तछंदांत यथेच्छ रचना करावी, परंतु त्यासंबंधीं भलतींच तत्त्वें प्रतिपादूं नयेत. मुक्तछंद " सताल " आहेत हें तत्त्व अशाच पैकीं होय. पूर्वींची असंख्य वृत्तें आणि जातिप्रकार सोयीचे असतांना त्यांत पद्यरचना करण्यास मोठी अडचण पडते, असेंहि म्हणण्यांत तथ्य दिसत नाहीं. मात्रासंख्येची अथवा अक्षरसंख्येचीसुद्धां अडचण

नको असली तर गद्याचा मार्ग हल्लीं मोकळाच आहे. ' हल्लीं " म्हणण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वीं गद्य प्रचारात नव्हते म्हणून त्यावेळीं ओवीसारख्या गद्यमय छंदाचा अवलंब करावा लागला. पद्य म्हटलें म्हणजे कृत्रिमता व थोडे तरी बंधन आलेंच. अशा स्थितींत मुक्तछंद रचून तें प्रगतीचेंच लक्षण आहे असें उलट अभिमानानें सांगून भूषण मिरविण्याची इच्छा करणें हें सयुक्तिक व योग्य वाटत नाहीं म्हणूनच त्याबद्दल विचारार्थ हे दोन शब्द लिहिले आहेत.

ज्ञानप्रकाश ता. ३।४।४१ इ.

---

**टीप** — बॅ. सावरकर यांनीं वैनायक वृत्ताचा विशेष या आपल्या लेखांत खालीलप्रमाणें प्रकट केलेलें मत विचारासाठीं वाचकापुढें ठेवितों.

" गद्याची पुढील आणि पद्याची पहिली पायरी म्हणजे अक्षरसंख्याक-वृत्त. वृत्तकलाविकासाची त्याच्याहि पुढील पायरी मात्रासंख्याक–वृत्त. × × × × × × बंगाल्यांत अक्षरवृत्तेंच बहुत. परंतु त्यांतीलही अव्य-वस्था रवीन्द्रबाबूसारख्या संस्कृत–श्रुतिसंपन्न कवीला पुढें पुढें इतकी कर्कश भासूं लागली कीं, त्यांनीं आपली कांहीं जुनी अक्षरसंख्याक कविता शास्त्र-शुद्ध अशा मात्रा–संख्याक स्वरूपांत वृत्तांतरितही केली आहे. हिंदींतही आतांशी मात्रा–संख्याक वृत्तेंच शिष्टतर समजतात.

# परिशिष्ट १ लें

छंदोरचनेची संक्षिप्त आवृत्ति " पद्यप्रकाश " या नावानें प्रो. माधवराव पटवर्धन यांनीं अलीकडे काढली आहे. तींत दिंडी, साकी, आर्या (गीति) इत्यादी पद्यांचीं लक्षणें सांगतांना बरेच फरक केलेले दिसतात. छंदोरचनेंतील व पद्यप्रकाशमधील लक्षणांची तुलना चौकस दृष्टीनें करणारांस फरक कोणते केले आहेत हें कळून येण्यासारखें आहे. त्यांतील कांहीं फरक महत्त्वाचे व आम्हांस इष्ट असेच घडून आले आहेत. ही गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे. सदर फरक करण्याचें कारण काय, याचा खुलासा वास्तविक देण्यास पाहिजे होता पण तसा तो आढळून येत नाहीं.

फरक झाले आहेत त्यांपैकीं कांहींचें दिग्दर्शन याखालीं करीत आहे.

## दिंडी

पद्यप्रकाश पान ८३ यांत दिंडीची व्याख्या दिली आहे ती अशी:—

[ ⏑̄ ⏑̄ । – – – । ⏑̄ ⏑̄ । – + ] मात्रा १९

दोन "य ग" (⏑ – – –) वा " र ग " ( – ⏑ – – ) या गणांच्यामध्यें एक "र" गण (–⏑–) वा "त" गण (– – ⏑) घातल्यानें दिंडीचा चरणसिद्ध होतो.

" क्रीडा " व " पुष्प " या नवीन निर्माण केलेल्या गणांचा उल्लेख या व्याख्येंतून गाळला आहे व पूर्वपरिचित " य " " र " " त " या गणांनीं लक्षण सांगितलें आहे. एवढी सुधारणा दिसते. चरणाच्या शेवटीं दोन गुरूच पाहिजेत असें पूर्वीच्या व्याख्येंत स्पष्ट म्हटलें होतें. परंतु हल्लींच्या व्याख्येंत चिन्हें देतांना शेवटीं दोन फुल्या देण्याऐवजीं ( फुली हें निश्चित गुरुचें चिन्ह

ठरविलें आहे. ) एकच फुली नमुद केली आहे, त्यावरून उपान्त्य ठिकाणीं गुरू असलाच पाहिजे ही गोष्ट सिद्ध होत नाहीं. उपान्त्य जागीं – असें चिन्ह आहे त्या चिन्हावरून तेथें दोन लघुहि चालतात असें ठरूं शकतें. हा दोष नवीन व्याख्येंत अधिक निर्माण झाला आहे. छंदोरचनेप्रमाणें पद्यप्रकाशांत दिंडीच्या दोन व्याख्या दिल्या नाहींत, हें बरें झालें. परंतु 'गण' सांगण्याची पद्धत अजून चूकच आहे. दिंडी हें पद्य भृंगावर्तनी जातींतील म्हणजे षण्मात्रिक असून गण पंचमात्रिक सांगून ठेविले आहेत याचा चमत्कार वांटतो.

## साकी

छंदोरचनेंत "प" या चिन्हाचा जो अर्थ सांगितला आहे तो अर्थ पद्यप्रकाशमध्यें नाहीं. पद्यप्रकाश पान ६२ यांत "जेथें प अशी खूण असेल तेथें पद्माच्या "मग" [– – – –] "जगग" [⏑ – ⏑ – –] "यलग" [⏑ – – ⏑ –] आणि "रलग" [– ⏑ – ⏑ –] या चार प्रकारांपैकीं कोणताहि गण चालतो." म्हणून खुलासा केला आहे. पांचवा प्रकार "तगल" [– – ⏑ – ⏑] म्हणजे उत्तरार्धांत "ज" गण असणारा गाळला आहे. ही सुधारणा इष्ट अशीच झाली असून आमचा मूळ आक्षेप अयोग्य नव्हता ही गोष्ट दिसून आली. हल्लींच्या व्याख्येंत चिन्हांच्या जोडीला "मग" "जगग" "यलग" "रलग" अशी गणयुक्त भाषा वापरली आहे. परंतु "य" गण आणि "र" गण असें पंचमात्रिक गण सांगून लक्षण बांधावयास नको होतें. कारण पद्मावर्तनी जातीमध्यें पंचमात्रिक गण संभवत नाहींत.

## गीति ( आर्या )

पद्यप्रकाश पान ३३ मध्यें गीतीचें लक्षण दिलें आहे. तें पुष्कळच सुधारून दिलें आहे. अर्थात् पूर्वीचें छंदोरचनेंतील लक्षण व

बर नव्हतें. नव्या लक्षणांत चतुर्मात्रिक गण सांगितले आहेत व तशींच चिन्हें दिलीं आहेत. " ज " गण आणि " न " गण कोठें कसे यावयास पाहिजेत ही गोष्ट पुढें खुलाशांत सांगितली आहे. पण लक्षणांचा पाल्हाळ फारच झाला आहे. पूर्वाचार्यांच्या लक्षणांचें अनुसरण केलें असतें तर सूत्ररूपानें थोडक्यांत लक्षण देतां आलें असतें. पूर्वाचार्यांनीं " गीति " जातिप्रकारांत निर्दिष्ट केली असतां प्रो. माधवराव पटवर्धन हे गीतीला वृत्तप्रकारांमध्येंच अजून डांबून ठेवीत आहेत.

## ताल

छंदोरचनेचें समालोचन करितांना श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं म्हटलें होतें कीं, " आंदोलन, लय, ताल, आघात, स्वर, आवर्तन, यति, इत्यादींच्या व्याख्या स्पष्टपणें देणें जरूर आहे. " तो आक्षेप लक्षांत ठेवून हल्लीं पद्यप्रकाशमध्यें परिशिष्टांत कांहीं पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या दिल्या असल्या तरी आंदोलन, ताल, आघात, स्वर यांच्या व्याख्या दिल्याच नाहींत. मुख्यत्वेंकरून " ताल " या वादग्रस्त शब्दाची व्याख्या देण्यास पाहिजे होती, पण तीच नेमकी गाळली आहे.

" ताल " याचा अर्थ संगीतोपयोगी ताल असा करावयाचा किंवा " ऱ्हिदम् " या अर्थी ताल हा शब्द समजावयाचा अथवा या दोन्ही अर्थांहून निराळाच अर्थ करून चालावयाचें? असा प्रश्न उत्पन्न होत असतो व अशी वस्तुस्थिति माहीत असून 'ताल' याचा अर्थ पद्यप्रकाशमध्यें कां न द्यावा हें कळत नाहीं.

" ऱ्हिदम् " याला " ताल " म्हणणें योग्य होणार नाहीं. कारण " ताल " हा संगीतशास्त्रांतील पारिभाषिक रूढ शब्द आहे. व त्याचा विशिष्ट अर्थ ठरून गेला आहे. इंग्रजींतील साघात–निराघात–उच्चार–पद्धति मराठीमध्यें नाहीं म्हणून तिकडील 'ऱ्हिदम्' जशाचा तसा मराठींत आणतां येणार नाहीं. 'ऱ्हिदम्' मराठीकडे घ्यावयाचाच असेल तर त्याच्या अर्थाचा वाचक शब्द म्हणून

" ताल " या रूढ शब्दाचा उपयोग करूं नये. म्हणजे गैर-समजास जागा राहणार नाहीं.

## छंद

पद्यप्रकाशमध्यें छंदाची व्याख्या दिली आहे ती:—

" छंद म्हणजे तो पद्यप्रकार कीं, ज्यांत लघुगुरू हा भेद दिसायला लेखनांत दिसला तरी उच्चारांत घ्यावयाचा नसल्यानें मुळींच मानावयाचा नसतो "

वरील व्याख्येप्रमाणें लघुगुरू हा भेद उच्चारांत घ्यावयाचा नाहीं तो कां ? त्या प्रकारचा उच्चार स्वाभाविक व माधुर्यास पोषक कसा म्हणतां येईल ?

" अक्षरोच्चाराच्या शिष्टसंमत व निश्चित पद्धतीस धरून नसलेलें पद्य म्हणजे शिथिल पद्य होय."

अशी शिथिलाची पुढें एक व्याख्या आहे. या व्याख्येवरून विचार करतां छंदांतील लघुगुरू भेद हा शिष्टसंमत नसतो म्हणावयाचा काय ? किंवा छंदाला शिथिल पद्य म्हणावयाचें ?

जातिप्रकारांत लघुगुरू हा भेद उच्चारांत पाळावयाचा असतो व तो माधवराव यांना मान्य आहे. मग जातिप्रकारांतील लघु-गुरूचा उच्चार एका पद्धतीनें व छंदामधील लघुगुरूचा उच्चार भिन्नप्रकारें करावयाचा, ही घरसोडच ठरणार नाहीं काय ?

पद्यप्रकाशमधील परिशिष्टांत दिलेल्या व्याख्यांचें गुणदोष–विवेचन व्हावयास पाहिजे.

---

# परिशिष्ट २ रें

## भजन-पद्धतींत सुधारणा

हल्लींचा काळ चिकित्सेचा व विचारक्रांतीचा आहे. 'जुनें तें सोनें' असें अंधश्रद्धेनें मानून चालण्याकडे प्रवृत्ति कमी होत चालली आहे. राजकीय, सामाजिक अथवा धार्मिक, बाब कोणतीही असो तींत परिस्थित्यनुरूप सुधारणा करण्याचा प्रयत्न दिसून येतो. सुधारणेच्या अनेक विषयांपैकींच 'भजन-पद्धती'तील सुधारणेबद्दल या लेखांत थोडेसें विवेचन करण्याचें योजिलें आहे.

कांहीं वर्षांपूर्वी अशी स्थिति होती, कीं भजनी-मंडळी म्हटली म्हणजे ती अमुक एका विशिष्ट वर्गांतीलच असावयाची. त्यांचें शिक्षण, त्यांचा सामाजिक दर्जा व त्यांची धार्मिक श्रद्धा काय असेल याचें अनुमान एक ठरलेलेंच होतें. परंतु अलीकडे त्या स्थितींत पालट होत असून सुशिक्षित लोकसुद्धां भजनांत भाग घेऊं लागले आहेत व भजनामध्यें कांहीं सुधारणा होऊं लागल्या आहेत.

वारकरी संप्रदायांतील भजनपद्धति ही प्रशंसनीय आणि उपयुक्त असून धर्मजागृति किंवा धर्मप्रचार करण्याचें तें एक परिणामकारक साधन आहे. वारकरी संप्रदायाचें अनुयायी वाढण्यास भजनाचा फारच उपयोग झाला आहे. भजनाच्या उपयुक्ततेचें प्रत्यंतर म्हणजे ही भजनाची पद्धति मिशनरी लोकांनींहि उचललेली कित्येक ठिकाणीं दिसून येते. ज्या साधुसंतांनीं ही प्रथा पाडली त्यांना खरोखरच धन्यवाद दिले पाहिजेत. महाराष्ट्रांतील संतमंडळींचें हें एक वैशिष्ट्य आहे असें अभिमानानें म्हणावेसें वाटतें. या भजनपद्धतीच्या उत्पादकांचें ध्येय काय असावें आणि तें ध्येय डोळ्यापुढें ठेवून भजनी मंडळी वागतात किंवा नाहीं हें सूक्ष्म

दृष्टीनें पाहिल्यास आपल्यापुढें एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो व त्याचाच थोडा विचार करावयाचा आहे.

## संगीताचें कार्य काय ?

भजनाला संगीताची जोड दिली आहे खरी, पण त्या योगानें दुधांत साखर पडल्याप्रमाणें गोडी आली पाहिजे. परंतु दुधांत साखरच जास्त घालावी त्याप्रमाणें भजन 'अर्थप्रधान' न राहातां 'गानप्रधान' होत चाललें आहे किंबहुना झालेंच आहे असें म्हटल्यास अधिक योग्य होईल. भजनांत गायनाचें वर्चस्व दिसून येत आहे तें अनाठायीं वाटतें. साहित्य व संगीत यांचा परस्पर संबंध काय आहे याच्याविषयीं कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर यांचा अभिप्राय विचारांत घेण्याजोगा आहे. ते म्हणतात, कीं 'साहित्यांत प्रासयुक्त व नादयुक्त भाषेची रचना करून संगीताची मदत घेण्यांत येते. शब्द जेथें अपुरे पडतात तेथें तें कार्य उरकण्यास संगीत पुढें सरसावतें. संगीत शब्दशक्ति वाढवितें आणि जो आशय सरळ मांडला असतां साधासुधा दिसेल तो संगीताच्या योगानें उच्च पदवीस पोचतो.' या अभिप्रायावरून साहित्याला संगीत हें साहाय्यक व पोषक झालें पाहिजे * आणि संगीतानें शब्दशक्ति वाढली पाहिजे म्हणजेच पद्यांतील अर्थाचा परिणाम श्रोत्यांवर झाला पाहिजे, या दोन गोष्टी स्पष्ट होतात.

हल्लीं प्रचलित गायनप्रकार दिसून येतात ते असे—

---

* **टीपः**—संगीतशास्त्रांत गायकाचे अनेक गुण सांगितले आहेत त्यांपैकीं एक महत्त्वाचा गुण प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें या ठिकाणीं उल्लेखनीय आहे. गायकानें स्पष्ट व योग्य वर्णोच्चार करावा आणि गीताचा अर्थ समजून घेऊन तदनुरोधानें चीज वठवावी अशी त्याजवर शास्त्रानेंच जबाबदारी टाकली आहे.

—( महाराष्ट्रीय ज्ञानकोशावरून )

अर्थबोध झाल्यावाचून काव्याचा भावनेवर परिमाण होत नाहीं. व गायन—कलेचा निम्मा अधिक हेतु फुकट जातो.

—श्री. न. चिं. केळकर

( १ ) काव्य–गायन, ( २ ) पोवाडे–गायन, ( ३ ) अभंग-गायन, किंवा भजन, ( ४ ) कीर्तनांतील गायन, ( ५ ) नाटक–सिनेमा यांतील पद्य–गायन, ( ६ ) बैठकीचें शास्त्रीय गायन.

## भजनाचें उद्दिष्ट

यांतील प्रत्येक गायनप्रकाराचें निरनिराळें वैशिष्ट्य आहे व प्रत्येकाचें स्वतंत्र उद्दिष्ट आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणून त्या त्या दृष्टीनें तें तें गायन झालें पाहिजे यांत संशय नाहीं. हें मुख्य तत्त्व विचारांत घेतलें असतां भजनामुळें श्रोत्यांच्या अन्तःकरणांत भक्तीचा प्रादुर्भाव होणें आवश्यक ठरतें. पोवाड्याचा परिणाम अर्थामुळें होतो. त्यांत गाण्याचा भाग अगदीं बेताचा असतो. कांहीं अंशीं तशीच स्थिति भजनाच्या बाबतींत आहे. अभंग म्हणतांना अवश्य तेवढेंच संगीत उपयोगांत आणावयास पाहिजे. केवळ गाणें ऐकवून श्रोत्यांचें मनरंजन करण्याचें नसून भजनास गायनाचें साह्य घेऊन श्रोत्यांच्या अन्तःकरणांतील भक्ति, वैराग्य या भावनांना जागृत केलें तरच त्या भजनाचें सार्थक होईल व उद्दिष्ट साधूं शकेल. आतां हेंहि खरें आहे, कीं पोवाड्यापेक्षां भजनांत संगीत थोडें अधिक येण्याचा संभव वाटतो. तथापि भजन करणाराची दृष्टि काय असावी हें दर्शविण्याकरितां पोवाड्याचें उदाहरण दिलें आहे.

## महत्त्वाच्या सुधारणा

भजनांत ही एक महत्त्वाची सुधारणा होणें इष्ट आणि आवश्यक आहे. त्याचप्रमाणें तदनुषंगिक आणखी कित्येक गोष्टी सुचवितां येण्यासारख्या आहेत.

( १ ) उच्चार स्पष्ट व शुद्ध करावेत. अभंग शब्दशः नीट ऐकूंच आला नाहीं, तर त्याचा अर्थ कसा कळणार ?

( २ ) शब्द वेगवेगळे म्हणावेत. त्यांचे तुकडे पाडूं नयेत.

उदाहरणार्थ— " वाट पाहे उभा । भेटीची आवडी " हा अभंग म्हणतांना "उभा" या शब्दांतील 'उ' तोडून त्यावर आलाप घेतात हें वैरस्यकारक आहे. "रडत माझें बाळ तान्हें, समजाविते राहिना " ही गौळण म्हणतांना 'समजाविते' या शब्दाचा 'समजा' असा एक तुकडा पाडून 'विते राहिना' असा वेगळा चमत्कारिक शब्द करतात. ही शब्दांची मोडतोड कानांना कशी लागेल याचें स्पष्टीकरण करावयास नकोच. " आवडे हें रूप गोजिरें " हा अभंग म्हणण्याच्या वेळीं 'सुखावलें' हा शब्द त्यांतील प्रत्येक अक्षर वेगवेगळें करून सुऽऽ खाऽऽ वऽऽ लेंऽऽऽ अशा प्रकारें प्रत्येक अक्षरावर आलाप घेऊन म्हणण्याची कित्येकांची पद्धति आढळून येते ही मोठीच चूक आहे.

( ३ ) अभंग हा अक्षरछंद आहे. अर्थात् मात्रावृत्त नसल्यानें गाण्याच्या दृष्टीनें अभंगांतील अक्षररचना झालेली नसते. यासाठीं ज्या तालांत अभंग म्हणावयाचा त्या तालाच्या मात्रा व त्याचे गण पाहून त्याला ज्या अभंगांतील अक्षरांचा लघुगुरू–क्रम अनुकूल आहे असाच अभंग निवडावा म्हणजे अक्षरांची ओढाताण पुष्कळ अंशीं कमी होईल. नाटकांतील अथवा सिनेमांतील लोकप्रिय झालेलें पद ऐकावयाचें व त्या चालीवर अभंग दडपून म्हणावयाचा, अशी हल्लीं प्रथाच पडल्यासारखी दिसते. यामुळें ऱ्हस्वदीर्घांचे शिथिल उच्चार, थोडक्या जागेंत अधिक अक्षरें कोंबणें, अर्थाचे हाल इत्यादि अनिष्ट प्रकार घडून येतात. नमुन्याकरितां दोन उदाहरणें दाखवितों.

" आवडे हें रूप गोजिरें " हा अभंग हिंदी चीज ' तुम हमसंग जिन बोल पियरवा ' या चालींत बसवून म्हणतात त्यावेळीं ऐकून पहावा. तसेंच ' कैशी जाऊं मी वृंदावना ' ही गौळण ' दे हाता शरणांगता ' या नाटकांतील पदाच्या चालीवर म्हटली जाते तेव्हां अक्षरांची कोंबाकोंबी आणि उच्चार कसे होतात हेंहि अवश्य ऐकण्यासारखें आहे.

## रस, भाव व क्रम

( ४ ) तालाच्या मात्रा व गण पाहून अभंग निवडण्याची कशी जरूरी आहे हें वर निर्दिष्ट केलें आहे. त्याचप्रमाणें ‘ रस-भावा ’ कडे लक्ष देऊन अभंगास चाल लाविली पाहिजे. ‘ नको नको मना, गुंतूं माया-जाळीं ’ हा अभंग ‘ मला मदन भासे– ’ या पदाच्या चालीवर म्हणणें रस–दृष्ट्या अनिष्ट ठरतें. अभंगा-मध्यें करुणापर, वैराग्यपर, आत्मस्थितिपर आणि उपदेशपर असे अनेक प्रकार असतात. तेव्हां जो अभंग म्हणावयास घेतला त्यांतील अर्थाच्या दृष्टीनें त्यास कोणत्या रागाचे कसे स्वर लावा-वयाचे, लय कोणती ठेवावयाची इत्यादींचा विचार न करतां तो गाइला गेल्यास अनुकूल रसाचा उठाव कसा होईल? म्हणून योग्य अशा स्वरकरणांत अभंग म्हणण्याची काळजी घेणें जरूर आहे.

( ५ ) भजनामध्यें उत्तान अर्थाच्या शृंगारिक गौळणी म्हणूं नयेत.

( ६ ) अभंगाचा अर्थ लक्षांत घेऊन व त्याच्या अर्थाशीं तादात्म्य पावून अभंग म्हटला तरच तो परिणामकारक होऊं शकतो.

( ७ ) भजनांत जे कांहीं आठदहा अभंग म्हणावयाचे अस-तील त्यांपैकीं सुरवातीचा अभंग, कीर्तनांत पूर्वरंगाला घेतात तशा-प्रकारचा निवडून त्यापुढील अभंग पहिल्या अभंगांतील सिधान्ताला पूरक होणारे असावेत. असें झाल्यास सर्व अभंगांतून एका विव-क्षित विचाराचा ध्वनि अनुस्यूत राहील व तें भजन म्हणजे एक ‘ मुकें ’ निरूपणच झाल्यासारखें होईल. पुष्कळ वेळां असें घडतें कीं, एका अभंगाचा दुसऱ्या अभंगाशीं कांहीं संबंध राहात नाहीं; किंबहुना विसंगतीच असूं शकते. हा प्रकार कोणत्याच दृष्टीनें सुखकारक होत नाहीं म्हणून अभंगांत परस्परसुसंबद्धता असावी असें वाटतें.

भजन हें प्राधान्यें करून सर्वसामान्य जनतेकरितां असतें व त्याचा हेतु केवळ मनरंजन हा मुळींच नाहीं. तेव्हां अशा प्रसंगीं

गायनावरच भर देऊं नये. तसें झाल्यानें भजनाच्या नांवाखालीं घेडगुजरी प्रकार घडून येतो व भजनपद्धतीला अनिष्ट वळण लागून भजनाचें उद्दिष्ट साधत नाहीं हें निराळेंच!

संगीताच्या मराठीकरणाबद्दल अलीकडे चर्चा चालू झाली आहे. या चर्चेवरून पाहातां 'स्वराबरोबर श्रुतीचें रंजन व्हावें, शब्दाबरोबर अर्थ कळून बुद्धीचें व शब्दार्थांतून प्रतीत होणाऱ्या रसामुळें भावनांचें रंजन व्हावें' अशी गायनापासून अपेक्षा मराठीकरणाचे पुरस्कर्ते धरतात. तसेंच 'गायक हा अर्थाचा अनर्थ करतो; हास्यास्पद यतिभंग करतो व अनुचित ठिकाणीं जोर देण्याचा रसापकर्षक धुडगूस घालतो' असे गायकाचे दोष मराठीकरणवाल्याकडून दाखविण्यांत आले आहेत. त्यांत वावगे कांहीं नाहीं. मात्र त्या दृष्टीनें असें म्हणावयाचें आहे कीं, भजनांतील अभंग हे पूर्ण मराठीच असतात. तेथें मराठीकरणाचा प्रश्न येत नाहीं. परंतु अभंग मराठी असूनहि ( मराठीकरणाची मूळचीच सोय असूनहि ) प्रचलित भजनपद्धतीमुळें वरील उद्दिष्ट साध्य होत नाहीं व वरीलसारखे दोषहि अभंगगायनांत दिसून येतात. तेव्हां मराठीकरणाच्या अभिमान्यांनीं सुद्धां भजन–पद्धतींत सुधारणा करण्याचा विचार करण्यास काय हरकत आहे? वास्तविक मराठीकरणाबरोबर किंवा त्याच्या आधीं गायकांनाच सुशिक्षित करण्याचा प्रसंग आहे!

मनोहर फेब्रुवारी १९४०

# परिशिष्ट ३ रें

## कलकत्ता ते वर्धा ( गाडींत ) ७।३।३७

श्री. तात्याबुवा,

मी पुण्डलीकना ओळखतो व त्यांचेमुळें तुमचेविषयीं सद्भाव उत्पन्न झाला आहे. पण तुमच्या स्नेहसंवर्धकसंघाशीं माझा परिचय किंवा संबंध उत्पन्न झालाच नाहीं. त्यामुळें ' संघाविषयीं आस्था आहे ' असें म्हणणें कदाचित् सत्याला सोडून होईल.

आजकाल छंदःशास्त्रांत नवीन नवीन प्रयोग पुष्कळ होतात पण त्या मानानें छंदःशास्त्राचें अध्ययन फार थोडे लोक करतात.

हिन्दी पद्यरचनेविषयीं अभ्यास करण्यास मला कधीं वेळच मिळाला नाहीं. तरी पण हिन्दीमध्यें पद्यरचना आपणाला वाटते तशी शिथिल नसते असें मी पाहिलें आहे. एका महत्त्वाच्या मुद्याकडे तुमचें लक्ष मी खेचूं इच्छितों.

मराठीमध्यें विशेषपणें संस्कृतप्रमाणें छंदाची कल्पना केली जाते. संस्कृतमध्यें स्वर, स्वरान्त व्यंजनें, आणि जोडाक्षरें हीं सर्व एक एक अक्षर समजलीं जातात आणि ऱ्हस्वदीर्घांचा किंवा मात्रांचा विचार करून वृत्तरचना केली जाते. बंगालींत आणि हिन्दींत इंग्रजी-प्रमाणें Syllables चा विचार असतो. Syllable हा निसर्गसहज गट आहे. हे गट स्वरान्तही असूं शकतात आणि व्यंजनान्तही असतात. उदाहरणार्थ, हिंदुस्तान हा शब्द घेऊं. आपण त्याचे विभाग पाडूं. हिं–दु–स्ता–न. पण याचे नैसर्गिक विभाग पडतात, हिन्–दुस्–तान्. Syllables व्यंजनान्त असूं शकतात. एका स्वराच्या आश्रयानें जीं व्यंजनें मागेंपुढें कोठें तरी बसलेलीं असतात तीं सर्व एकाच सिलेबलचीं मानलीं जातात. हिन्दीच्या छंदरचनेंत संस्कृत-प्रमाणें अक्षरमात्राविचार तर आहेत, पण आरबी, फारसी

वळणामुळें 'गजल' आदिवृत्तें आल्यामुळें Syllable चा विचार अधिक महत्त्वाचा झाला आहे, व तेथील लोकांचें उच्चारण देखील मराठीपेक्षां अधिक मोकळें (असंस्कृत) असल्यामुळें त्यांना Syllable च्या वजनाचा विचार करणेंच अपरिहार्य असतें. शब्दांचे Spelling संस्कृतमान्य आणि उच्चारण असंस्कृत असें झाल्यामुळें परस्थांना सर्वत्र अराजक दिसूं लागतें. कोठें कोठें दुसरी एक मौज असते. ते लिहितील कृपा, पण रूढ उच्चार असेल 'किरिपा.' या उच्चाराप्रमाणें वाचल्या-गायल्यास छंदोभंग होत नाहीं. म्हणून हिन्दीचें उच्चारण उत्तम रीतीनें अधिगत केलें पाहिजे व मगच हिन्दीच्या छंदःशास्त्राला हात घातला पाहिजे.

मराठीमध्यें देखील किती तरी अक्षरें लिहितांना स्वरान्त असून उच्चारतांना हलन्त होतात. कवितेमध्यें आपण त्यांना स्वरान्त करून घेतो. पण माधव-ज्युलियनसारखे त्यांना केव्हां केव्हां उच्चाराप्रमाणें व्यंजनान्त समजून छंदोरचना करतात. गजली-सारख्या वृत्तांमध्यें हेंच विशेष शोभतें. जुन्या लावण्यांमधून आणि पोवाड्यांमधून syllable चा नैसर्गिक नियम अधिक दिसून येतो. एक पक्ष सयुक्तिकपणें म्हणतो कीं संस्कृतचा सासुरवास संपला म्हणजे हिंदुस्थानांतील सर्वच प्रांतीय भाषा syllable च्या धोरणावर प्रतिष्ठित होतील. त्यांचें हें म्हणणें उपेक्षा करणाजोगें नाहीं. दरेक भाषेचें उच्चारणशास्त्र छंदःशास्त्रासाठीं प्रमाण समजलें पाहिजे.

आतां मराठींतील छंदांमध्यें जी क्रांति होऊं लागली आहे तीविषयीं:—

पूर्वीं छापण्याची कला बोकाळली नव्हती तेव्हां साहित्य लिहून काढावें लागे किंवा कंठाग्रीं ठेवावें लागत असे. त्यामुळें चांगलें घोंटीव साहित्यच टिकत असे. आतां वर्तमानपत्रयुगांत अर्धेमुर्धे वाचून फेंकून देण्याच्या लायकीचें साहित्यहि मुबलक तयार होतें. त्यामुळें त्यांत शिथिलता ही यावयाचीच, व शिथिल आणि नीरस

कवितादेखील प्रसिद्ध व्हावयाचीच. पुढें काळाच्या चाळणींतून जी उरेल ती उरेल. पूर्वी गद्य आणि पद्य हे दोन विभाग दोन बेटांप्रमाणें अगदीं अलग अलग असत. आतां मुक्तछंद, गद्यकविता, तालबद्ध गद्य, वगैरे प्रकारांचा सेतु निर्माण झाला आहे. आतां गद्य काव्य आणि गेयगद्यदेखील आपल्याला स्वीकारलीं पाहिजेत. विकासवादानें जसें सिद्ध केलें कीं, पशुकोटि कोठें संपते आणि मनुष्यकोटि कोठें सुरू होते हें ठरविणें कठिण आहे. वनस्पतिकोटि कोठें संपली आणि प्राणिकोटि कोठें सुरू झाली हेंहि ठरविणें सोपें नाहीं. जडसृष्टि आणि चेतनसृष्टि यांतील भेदहि मावळला, अशा काळीं गद्य आणि पद्य यांतील भेदहि पुसून गेल्यास आश्चर्य नाहीं.

आपली ओवी तसें पाहिल्यास तालबद्ध गद्यच आहे. ज्या देशांत साक्षर लोक थोडे आणि संस्कारवांच्छु निरक्षर लोक अधिक, तेथें एकानें वाचावें व पुष्कळांनीं ऐकावें ही श्रावणपद्धति आपोआप उत्पन्न होते व त्यामुळें पुराणिकांचा वर्ग उत्पन्न होऊन बळावतो. आपल्याला यापुढें असा श्रावकवर्ग कदाचित् पुन्हा उत्पन्न करावा लागेल. इतिहास, राजकारण वगैरे विषयांवरील निबंध देखील जुन्या नागनरसोबाच्या गोष्टींप्रमाणें तालांत म्हणण्याजोगें तयार करणें कदाचित् इष्ट होईल. अभंग, ओवी आणि कटाव हे प्रकार लोकभोग्य गद्यसाहित्यासाठींच निर्माण झालेले आहेत असें माझी मति मला सांगते. भविष्यकाळीं यांचा असा उपयोग होणार आहे या अर्थानें वरील विधान मी केलें आहे.

मानसशास्त्राच्या दृष्टीनें तालाचें आणि यमकाचें महत्त्व फार आहे. जर reasoning शिथिल असेल तर rhyme च्या योगानें त्याला दुजोरा देतां येतो. अशा अनुभवामुळेंच इंग्रजींमध्यें 'There is neither rhyme nor reason in what he says' अशाप्रकारचा वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे.

एकादशी दिवशीं । खाई जो सुपारी ।
होई तो भिकारी । जन्मोजन्मीं ॥

आपल्या महाराष्ट्रसमाजांतील लोकधर्म–सिंधूतील वरील शास्त्रवचनांत सुपारी आणि भिकारी यांतील यमक हेंच त्या विधानाला विश्वसनीय बनवितें. नाहींतर सुपारी खाणाऱ्यानें भिकारीच काय म्हणून व्हावें ? याला कांहीं आध्यात्मिक शास्त्राचा दुसरा आधार नाहीं.

यमकाचें एवढें थोर महत्त्व असल्यामुळें मराठीनें कवितेमध्यें यमकाचा आग्रह धरला होता. संस्कृतला त्याची आवश्यकता भासली नव्हती. काव्यांत जर काव्यगुण नसेल, प्रतिभा नसेल, तर शहाण्या माणसानें यमक कधींहि सोडूं नये. पण हल्लींच्या अहंमन्य युगांत हें शहाणपण कसें टिकावें ? तेव्हां निर्यमक कविता ही होणारच. आणि यमकाचें दुर्दैव हें कीं निर्यमक कविता केव्हां केव्हां निर्यमकपणामुळेंच भारदस्त होते. एखाद्या प्रौढ पुरंध्रीनें पायांमध्यें घुंगूर घातले म्हणजे जसें तें हास्यास्पद दिसतें तसें कांहीं भारदस्त विषय आणि भारदस्त छंद यमकाच्या जोडीनें ' बुढ्ढी घोडी लाल लगाम ' असे दिसूं लागतात. तेव्हां निर्यमक, सयमक, अनुप्रासयुक्त, लाटानुप्रासयुक्त, अश्वधाटी, वगैरे सर्वच प्रकार भाषेंत चालणार आणि चालले पाहिजेत असा माझा अभिप्राय आहे.

* * * *

रवींद्रनाथांची इंग्रजी गीतांजलि हें घोटीव गद्याचें उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांतील सूक्ष्म तालबद्धता इतकी कांहीं मोहक आहे कीं पुनः पुनः वाचत असतांना तिचा कैफ चढतो. गुजरातमध्यें कवि नानालालनीं वाक्यरचना आलटून पालटून वाक्यामध्यें एक प्रकारचें ओजस् आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. या प्रकाराला तेथें अपद्यागद्य असें टवाळ नांव दिलें गेलें आहे. त्यांत अक्षरांचा किंवा मात्रांचा नियम नसतो; पण डोलनगुंजन असतें व त्यामुळें अशा रचनेला गद्यहि म्हणतां येत नाहीं आणि पद्यहि म्हणतां येत नाहीं म्हणून अपद्य+अगद्य हें नांव द्यावें लागलें. या प्रकारांत जर

काव्यगुण, विचाराचें ओजस्, शब्दयोजनेंत संयम आणि लावण्य हीं नसलीं तर हा प्रकार इतका हास्यास्पद होतो कीं गल्लींतील पोरें-सोरेंदेखील त्याचें अनुकरण करूं लागतात आणि त्याची एकदां खोड लागली म्हणजे पुढें पुढें त्याच शैलींत ' बोलावयाला होतें. ' गीतांजलीचें अनुकरण पुष्कळांनीं केलें. तसलें rhythmic prose हिंदींत दर महिन्याला गाडाभर तयार होतें. मराठींतहि केव्हां केव्हां आढळतें. आणि जे लोक नेभळट काव्यवृत्तीचे आश्रक असतात त्यांच्यामध्यें तसलें गद्य फारच माजतें. असा प्रकार फार झाला म्हणजे चांगले चांगले लेखक लाजून त्या शैलीला टाळतात आणि अतिरेक होऊं न देतां घोटीव आणि बंदिस्त गद्य लिहितात.

गद्यांतील ताल अगदीं गुप्तपणें काम करीत असावा. उत्कृष्ट गद्य मोठ्यानें वाचत असतांना गळ्याला, श्वासाला आणि कानांला आल्हाद देत असतें. पुनः पुनः वाचत असतांना त्यांत एक प्रकारची लज्जत येते. जरी तें मादक नसलें तरी तें हुरूप आणणारें असतें. अशा गद्यांतील शब्दरचना खण्याप्रमाणें आटीव असते. त्यांतील शब्द बदलणें, कमी करणें किंवा फिर-विणें शक्यच नसते. अनेक वेळां वाचल्यानंतर असें गद्य आपो-आप तोंडपाठ होतें, त्याचें अवतरण देणें सोपें जातें, व अशा गद्याचें सेवन करणाऱ्या वाचकांची लेखनशैली आणि भाषण-शैलीहि आपोआप अभिजात बनते. अशा गद्याला साहित्यक्षेत्रांत संस्कार-गुरू म्हटलें पाहिजे. त्यांतील भावदेखील जर उन्नत असेल तर अशा गद्याला ' ऋषिवाणी ' म्हटलें पाहिजे. इतकी त्याची योग्यता असते.

अशा गद्यांत बहुतकरून जो कांहीं संवृत ( लपलेला ) ताल असतो तो वारंवार बदलतो व त्यामुळें वाचनाला एक प्रकारचा तकवा येतो. पण जर ताल वारंवार न बदलला तर तें तालप्रधान गद्य होतें. केव्हां केव्हां त्याचें अगदीं गेयगद्य बनतें. व शेवटीं त्याला पद्य म्हणावें लागेल. ज्याची तालबद्ध पदें पडतात तेंच पद्य.

इंग्रजींतील Walt Whitman, Edward Carpentor, रवींद्रनाथ ठाकूर, खलिल जिब्रान यांच्यासारख्यांची लेखनशैली तुम्ही तपासून पहावी अशी माझी शिफारस आहे. ज्यांना तुम्ही मराठींतील उच्छृंखल सुधारक म्हणतां ते बिचारे वरील लोकांचे केवळ अनुयायीच आहेत. स्वयंभू बंडखोर होण्याइतकें वीर्य फारच थोड्या लोकांत असतें. त्यांपैकीं कांहीं लोक अगदीं अक्कलशून्य असतात, आणि कांहीं आपल्या पिढीच्या फार पुढें गेलेले असतात. या दोहोंना अलग करणें आवश्यक असल्यानें समाजानें त्यांचेवर आग पाखडलीच पाहिजे. अग्नीवांचून परीक्षा कशी होणार? तावून, सुलाखून पाहतां जे खरे ठरतील तेच अमर होतील.

छंदःशास्त्र हा माझा विषय नव्हे. तुम्ही विचारलें म्हणून माझा अभिप्राय कळविला. तुम्ही तज्ज्ञांनाच विचारलें पाहिजे. हिन्दी-विषयीं श्री. रामनरेश त्रिपाठी हिन्दी-मंदिर, अलाहाबाद यांचेकडून बरीच माहिती मिळेल.

आपला,
काका कालेलकर.

REFBK-0006259

# सूची

प्रस्तुत पुस्तकांत ज्या लेखकांचा उल्लेख आला आहे त्यांच्या नांवां-बद्दल—नांवापुढें पृष्ठांक दिले आहेत.


आण्णासाहेब किर्लोस्कर ९०

आत्माराम रावजी देशपांडे ७।११।१५।१६।१९।२१।२२।२३।२५।२६।२७ २८

इगर्टन स्मिथ १

एडवर्ड कार्पेन्टर १०७

एनिड हेमर २

खलिल जिब्रान १०७

गोडबोले ( वृत्तदर्पणकार ) २४।३४।३८।५०।५६।५७।५८।६८।७६।७८

गोविंदराव देवल ९०

गोविंदराव खाजगीवाले ३।१३।१४।१७।१८।३९।४२।४४।४६।४७।७१ ७२।७४

गंगाधर ग. घनवटे २६

चिन्तामणी कवि ६३।६४

चन्द्रशेखर ४७

जोग ( प्रोफेसर ) ७६

देशपांडे छंदोलंकारकर्ते ३८।८२

न. चिं. केळकर ४९।६६।८४।८८।९४।९७

नाटेकर ५६

नानालाल कवि १०५

ना. ग. जोशी ११।१२।८३।८४।८६

पिंगल ८।९।१५

बाळाचार्य खुपेरकर शास्त्री ७०
भवानीशंकर पंडित २०।२१।२३।३२।३३।३५।३७
मायदेव ( प्रोफेसर ) ६४
मो. स. मोने ३४।८४
मोरोपन्त ५८।५९।८९
महाराष्ट्रीय ज्ञानकोशकार ८८।९५
य. ग. फफे ५३
रघुनाथ पंडित ६५
रवीन्द्रनाथ टागोर ९१।९७।१०५।१०७
र. श्री. जोगळेकर ३०
रा. म. आठवले ६१।६२।६३।६४।६५
वामन नारायण देशपांडे ११।२१।२३।२४।२५।२७।२८।३४
वॉल्ट व्हिटमन १०७
विश्वनाथ रा. डोंगरे २०
श्रीधर कृष्ण गोखले ४७
शिवरामशास्त्री शिंत्रे ७४।७५।८०
साधुदास २७
सावरकर ( बॅरिस्टर ) २१।२२।२३।२४।२५।९१
सिद्धेश्वरशास्त्री चित्राव २९
सौ. शारदाबाई परांजपे ७५
ज्ञानेश्वर ८९

प्रो. माधवराव पटवर्धन यांच्या नांवाचा उल्लेख ५०।६० वेळां आला असल्यानें त्यांचें नांव वरील यादींत स्वतंत्र असें नमुद केलें नाहीं.